विकास समर्पित मासिक

ISSN-0971-8397

# योजना

विशेषांक

वर्ष ४४ अंक ८ पाने ७६ मार्च २०१७ मूल्य ३० रु.

# अर्थसंकल्प २०१७-१८

केंद्रीय अर्थसंकल्प : व्यापक विश्लेषण
एन आर भानुमूर्ती आणि श्री हरी नायडू

वास्तववादी केंद्रीय अर्थसंकल्प
प्रा.चरणसिंग

महसूल जमा करण्याचे प्रयत्न आणि अर्थसंकल्प
मालिनी चक्रवर्ती

अर्थसंकल्पाचे रोजगार आणि औद्योगिक विकासावर होणारे परिणाम
अरूप मित्रा

(विशेष लेख)
रेल्वे अर्थसंकल्पाचा नवा अवतार
श्री अरुणेंद्र कुमार

(फोकस)
रेल्वे वगळून पायाभूत सुविधांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद
कृष्णा देव

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्‌जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product
येथे ऑनलाईन भरावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४४ ❖ ❖ अंक ८ ❖ ❖ मार्च २०१७ ❖ ❖ मूल्य ३० रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**

संपादक
**उमेश उजगरे**

उप संपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**

**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

**जाहिरात दर पत्रक**

| | |
|---|---|
| ब्लॅक अॅड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक अॅड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |

## अनुक्रमणिका


- **केंद्रीय अर्थसंकल्प : व्यापक विश्लेषण** — एन आर भानुमूर्ती आणि श्री हरी नायडू ५
- **वास्तववादी केंद्रीय अर्थसंकल्प** — प्रा.चरणसिंग १०
- **ग्रामीण कृषी क्षेत्र - चमकदार कामगिरीच्या दिशेने मार्गक्रमण** — निरेंद्र देव १९
- **केंद्रीय अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राला जोरदार प्रोत्साहन** — लक्ष्मी जोशी आणि व्ही.पी. आहुजा २४
- **तरुणांसाठीचा अर्थसंकल्प** — डॉ एस एस मंथा २६
- **रेल्वे अर्थसंकल्पाचा नवा अवतार (विशेष लेख)** — श्री अरुणेंद्र कुमार ३०
- **अर्थसंकल्पाचे रोजगार आणि औद्योगिक विकासावर होणारे परिणाम** — अरूप मित्रा ४२
- **महसूल जमा करण्याचे प्रयत्न आणि अर्थसंकल्प** — मालिनी चक्रवर्ती ४७
- **रेल्वे वगळून पायाभूत सुविधांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद (फोकस)** — कृष्णा देव ५१
- **विमुद्रीकरण आणि केंद्रीय अर्थसंकल्प** — प्रा. डॉ. अशोक पुरभाजी टिपरसे ५४
- **अर्थसंकल्पातील नवे बदल : संरचनात्मक आणि प्रक्रीयात्मक** — हॅप्पी पंत ५९
- **केंद्रीय अर्थसंकल्प एक मूल्यमापन** — सुभाष राठोड ६२
- **दुर्बल घटकांचे कल्याण आणि विकास** — श्रीकर नाईक ६६
- **अर्थसंकल्पात आरोग्य तरतुदीत वाढ** — राजीव आहुजा ७१


योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

संपादकीय

# सर्वसमावेशक अर्थसंकल्प

यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प अनेक अनिश्चिततांच्या पार्श्वभूमीवर संसदेत मांडण्यात आला. निश्चलीकरण, वस्तू व सेवा कर कायदा आणि अमेरिकेत झालेला सत्ताबदल अशा अनेक कारणामुळे यावर्षी अर्थसंकल्प मांडणे आव्हानात्मक बनले होते. हा अर्थ संकल्प ऐतिहासिकही म्हणावा लागेल, कारण फेब्रुवारीच्या शेवटच्या दिवशी अर्थसंकल्प मांडण्याची परंपरा यंदा मोडण्यात आली, रेल्वे अर्थसंकल्प स्वतंत्रपणे न मांडता यंदा प्रथमच सर्वसाधारण अर्थसंकल्पातच मांडण्यात आला तसेच योजना आणि योजनाबाह्य खर्च असे प्रतिवर्षी होणारे वर्गीकरण यंदा टाळण्यात आले.

निश्चलीकरणामुळे गरीब तसेच श्रीमंत दोन्ही वर्गांना त्रास सहन करावा लागला होता, त्यामुळे यंदाच्या अर्थसंकल्पात काही लोकप्रिय घोषणा करून लोकांना खुश करण्याचा प्रयत्न केला जाईल असा अंदाज होता. परंतु, अर्थसंकल्पामध्ये सरकारचे प्राधान्य राहिलेल्या गरीब, ग्रामीण भाग आणि शेतकरी वर्गाला झुकते माप देण्याचा प्रयत्न कायम ठेवण्यात आला. याशिवाय आर्थिक वृद्धीला चालना देण्याचे दीर्घकालीन धोरण पुन्हा एकदा आले. बदलता, चैतन्यदायी आणि स्वच्छ भारत हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये ग्रामीण विकास, कृषी, पायाभूत सुविधा, कौशल्यविकास, उत्पादन आणि रोजगार निर्मिती यावर विशेष भर देत बहुआयामी धोरण आखण्यात आले आहे.

सरकारच्या प्राधान्यक्रमाच्या यादीत ग्रामीण जनता आणि आणि शेतकरी यांना खूप वरचे स्थान असल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न पाच वर्षात दुप्पट करण्यासाठी अनेक उपाययोजनांची घोषणा या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. कृषी पतपुरवठा १० लाख कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आला आहे. नैसर्गिक आपत्तीपासून नुकसान कमी करण्यासाठी 'प्रधानमंत्री फसल बीमा योजने'चे लक्ष्य वाढवून लागवडीखालील क्षेत्राच्या ४० टक्क्यांपर्यंत करण्यात आले आहे. याशिवाय दीर्घमुदतीच्या सिंचन योजनांसाठी निधीत वाढ करून तो ४० हजार कोटी इतका करण्यात आला आहे.

ग्रामीण रोजगारांच्या संधी वाढविण्यासाठी आणि तेथील मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी ग्रामीण युवकांना कुशल बनविण्याच्या अनेक उपाययोजना अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आल्या आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेसाठी आतापर्यंतची म्हणजे ४८ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सुमारे ३०० ऑनलाईन अभ्यासक्रमांचा समावेश असलेली स्वयंम योजना आणि बाजार निगडित कौशल्य शिकवण्यासाठी संकल्प योजनेसाठी जवळपास ४००० कोटी रुपयांची तरतूद करून देशाला कुशल मनुष्यबळाचा प्रमुख पुरवठादार बनविण्याकडे वाटचाल सुरु करण्यात आली आहे. अंत्योदय योजनेअंतर्गत एक कोटी नागरिक आणि ५० हजार ग्रामपंचायतींना गरिबीच्या फेऱ्यातून बाहेर काढण्याचा संकल्प करण्यात आला आहे. १ मे २०१८ पर्यंत देशातील सर्व गावांचे विद्युतीकरण,ग्रामीण भागातील रस्ते बांधणीचा वेग वाढवून तो १३३ किमी प्रतिदिन करणे, गावांमध्ये नळाद्वारे पाणी पुरवठ्याला प्राधान्य आणि हागणदारीमुक्त गाव आदी योजनांसाठी मोठ्या प्रमाणावर तरतूद करण्यात आली आहे.

कोणत्याही आर्थिक विकासासाठी चांगल्या पायाभूत सुविधा गरजेच्या असतात ही बाब ओळखून याक्षेत्रासाठी तब्बल ३.९६ लाख कोटी रुपये इतकी विक्रमी तरतूद करण्यात आली आहे. याचप्रमाणे रेल्वेसाठी १.३ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून प्रवाशांची सुरक्षितता, स्वच्छता आणि विकास कामांवर विशेष जोर देण्यात आला आहे. स्थावर मालमत्ता क्षेत्राला नवी उभारी देण्यासाठी गृहनिर्माण क्षेत्राला 'पायाभूत क्षेत्राचा' दर्जा बहाल करण्यात आला आहे.

भारतामध्ये उद्योग-व्यवसाय करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी आणि विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामुळे थेट विदेशी गुंतवणुकीच्या सुमारे ९० टक्के गुंतवणूक थेट पद्धतीने आली आहे. विदेशी गुंतवणूक प्रोत्साहन मंडळ -एफआयपीबी बरखास्त करण्यात आले आहे. लहान उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० कोटींहून कमी वार्षिक उलाढाल असलेल्या कंपन्यांसाठी कॉर्पोरेट इन्कम टॅक्स कमी करून २५ टक्क्यांपर्यंत आणण्यात आला आहे.

डिजिटल अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी 'भारत नेट' उपक्रमासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद, 'आधार-पे' ची सुरुवात, सायबर गुन्हे रोखण्यासाठी विशेष टास्क फोर्सची स्थापना अशा अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

काळ्या पैशाच्या समस्येचा सामना करण्यासाठी आणि राजकीय व्यवस्थेची स्वच्छता करण्यासाठी राजकीय पक्षांना रोखीने देणग्या देण्याची मर्यादा दोन हजार रुपयांवर आणण्यात आली आहे. या मर्यादेच्या पुढील देणग्या धनादेशाद्वारे, डिजिटल पद्धतीने किंवा विशेष निवडणूक रोख्याद्वारे देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

अशा रितीने सन २०१७-१८ या वर्षाचा अर्थसंकल्प प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हसू उमटवणारा आणि पारदर्शकता आणणारा, भ्रष्टाचार घटविण्यास साह्यभूत तसेच जलद आर्थिक विकासाला प्रोत्साहन देणारा ठरणार आहे.

■■■

# केंद्रीय अर्थसंकल्प : व्यापक विश्लेषण

एन आर भानुमूर्ती आणि श्री हरी नायडू



***मोठ्या प्रमाणात असलेल्या अनिश्चिततेच्या या पार्श्वभूमीवर, अर्थव्यवस्थेला संजीवनी देऊन व्यापक रोजगार निर्मिती करणाऱ्या उपाययोजनांची या अर्थसंकल्पाकडून मोठी अपेक्षा होती. हा अर्थसंकल्प जाणून घेण्याचा त्याचबरोबर त्याचे विश्लेषण करण्याचा, त्याचा अर्थव्यवस्थेवर होणार परिणाम जाणून घेण्याचा हा प्रयत्न. वित्तमंत्र्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे या वर्षीच्या अर्थसंकल्पाच्या केंद्रस्थानी होता*** "TEC India ***(कायापालट,चैतन्यमय आणि स्वच्छ भारत) हा कार्यक्रम.***

राज्यघटनेच्या कलम ११२ ,११३, ११४(३) आणि ११० (a) नुसार अर्थसंकल्प सादर करणे केंद्रसरकारसाठी बंधनकारक आहे. आधीच्या काळात अर्थसंकल्प म्हणजे केवळ प्रस्तावित ताळेबंद असे स्वरूप असले तरी सध्याच्या काळातली सरकारे, महत्वाचे धोरणात्मक निर्णय, विशेषत: कर प्रस्ताव जाहीर करण्यासाठी अर्थसंकल्पाचा उपयोग करतात. काळानुसार या वार्षिक कार्यक्रमात बरेच बदल होत गेले.या वर्षी सुद्धा यात तीन महत्वाचे बदल होते : रेल्वे अंदाजपत्रक स्वतंत्रपणे सादर न करता त्याचा केंद्रीय अर्थसंकल्पातच समावेश; आधीच्या प्रथेपेक्षा महिनाभर आधी अर्थसंकल्पाचे सादरीकरण; आणि नियोजित आणि नियोजित नसलेले खर्च अशी खर्चाची रद्द केलेली वर्गवारी. या बदलांमुळे या अर्थसंकल्पाची, आधीच्या अर्थसंकल्पाशी तुलना करायला कमी वाव राहतो. तथापि, हा अर्थसंकल्प मांडला गेला त्यावेळी असलेली परिस्थिती जाणून घेणे महत्वाचे आहे. अर्थसंकल्पापूर्वी दोन महत्वाचे धोरणात्मक बदल झाले: विमुद्रीकरण आणि वस्तू आणि सेवा कर विधेयकाला संसदेची संमती. जागतिक आघाडीवर पाहायचे झाल्यास अमेरिका आणि यूरोप मध्ये जागतिकीकरणाच्या बाजूने नसणारा कल, कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि जागतिक अर्थव्यवस्था पूर्वपदावर येण्याचा मंद वेग यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या अनिश्चिततेवर भर पडली.

मोठ्या प्रमाणात असलेल्या अनिश्चिततेच्या या पार्श्वभूमीवर, अर्थव्यवस्थेला संजीवनी देऊन व्यापक रोजगार निर्मिती करणाऱ्या उपाययोजनांची या अर्थसंकल्पाकडून मोठी अपेक्षा होती. हा अर्थसंकल्प जाणून घेण्याचा त्याचबरोबर त्याचे विश्लेषण करण्याचा, त्याचा अर्थव्यवस्थेवर होणार परिणाम जाणून घेण्याचा हा प्रयत्न. वित्तमंत्र्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे या वर्षीच्या अर्थसंकल्पाच्या केंद्रस्थानी होता "TEC India (कायापालट,चैतन्यमय आणि स्वच्छ भारत) हा कार्यक्रम.

**सद्य विस्तृत कल**

२०१६-१७ या वर्षासाठी भारताचा GDP अर्थात सकल राष्ट्रीय उत्पादन विकास दर, सुधारित अंदाजानुसार ७.१ % राहील असे केंद्रीय सांख्यिकी कार्यालयाने म्हटले आहे. मात्र या अंदाजात विमुद्रीकरणाचा परिणाम समाविष्ट नाही, असे केंद्रीय सांख्यिकी कार्यालयानेच सांगितले आहे. विमुद्रीकरणामुळे जीडीपी १ ते २ टक्क्यांनी कमी होईल

असे बरेचसे विश्लेषक सुचवत आहेत. जीडीपी अंतर्गत, उत्तम पाऊसमानामुळे कृषी क्षेत्राचा विकास चांगला होण्याची अपेक्षा आहे तर सेवा क्षेत्राचा विकास ९% च्या जवळपास अपेक्षित आहे. औद्योगिक क्षेत्र ५.२% (तक्ता-१ पहा) इतकी माफक वृद्धी नोंदवेल. ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित चलनवाढीचा दर डिसेंबरमध्ये ३.४%, रिझर्व बँकेच्या उद्दिष्टपेक्षा बराच खाली होता. व्यापार आघाडीवर पाहता मंदावलेली आयात आणि निर्यात ही चिंतेची बाब आहे. चालू खात्यातल्या तुटीमधे, २०१६-१७ या वर्षाच्या पहिल्या सहामाहीत घट होऊन ती ०.३% झाली. वित्तीय बाजू पाहता, महसुलात चांगली परिस्थिती दिसली. वित्तीय तूट, एप्रिल-नोव्हेंबर मधे ८६% उद्दिष्ट गाठेल अशी अटकळ आहे. या आधारावर २०१६-१७ मधे सरकार ३.५% वित्तीय तुटीचे उद्दिष्ट गाठू शकेल अशी अपेक्षा आहे.

बँकिंग क्षेत्रात, विमुद्रीकरणानंतर, बँकेतल्या जमा रकमेत वाढ झाल्याने बँकांनी कर्ज आणि ठेवींवरच्या व्याज दरात कपात केली. यामुळे पतकर्ज मागणीत मोठी वाढ अपेक्षित असून त्यातून विकास वृद्धी साधेल. सध्या गुंतवणूक (GFCF) विकास दर उणे ०.२ असून ते चिंतेचे कारण आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवर देखरेख ठेवणाऱ्या सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी, CMIE च्या आकडेवारीनुसार, विमुद्रीकरणाच्या सुमारे ५० पुढच्या-मागच्या दिवसाशी तुलना करता, नवे प्रकल्प जाहीर होण्यामध्ये २२७ वरून १७७ प्रकल्प एवढी मोठी घट झाली.

**तक्ता- १ : मॅक्रो इकोनॉमिक्सच्या काही निर्देशकांचा सध्याचा कल**

| संकेतक / वर्ष | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ पीई | २०१६-१७ SF& |
|---|---|---|---|---|---|
| जीव्हीए, मूळ किमतीत (विकास दर) | ५.४ | ६.३ | ७.१ | ७.२ | ७.१ |
| जीएफसीएस (विकास दर) | ४.९ | ३.४ | ४.९ | ३.९ | ०.२ |
| सकल राष्ट्रीय बचत (जीडीपीच्या %) | ३३.८ | ३३ | ३३ | ञ | -- |
| कृषी (विकास दर) | १.५ | ४.२ | -०.२ | १.२ | ४.१ |
| उद्योगक्षेत्र (विकास दर) | ३.६ | ५ | ५.९ | ७.४ | ५.२ |
| सेवा (विकास दर) | ८.१ | ७.८ | १०.३ | ८.९ | ८.८ |
| चलनवाढ- ग्राहक किंमत निर्देशांक वार्षिक सरासरी | १० | ९.४ | ५.८ | ४.९ | ३.४१ॐ |
| चालू खात्यातली तूट (जीडीपीच्या %) | ४.८ | १.७ | १.३ | १.१ | ०.३ङ |
| निर्यात (विकास दर) | ६.७ | ७.८ | १.७ | -५.२ | २.२ |
| आयात (विकास दर) | ६ | -८.२ | ०.८ | -२.८ | -३.८ |
| महसुली तूट (जीडीपीच्या %) | ३.७ | ३.२ | २.९ | २.५ | २.३ |
| वित्तीय तूट(जीडीपीच्या %) | ४.९ | ४.५ | ४.१ | ३.९ | ३.५ |

स्रोत: आर्थिक सर्वेक्षण,२०१६-१७ .* २०१६ च्या पहिल्या सहामाहीतली चालू खात्यातली तूट, # डिसेंबर २०१६ ची आकडेवारी

**अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये**

गेल्या वर्षी, दिवाळखोरी विधेयक,लवचिक चलनवाढ उद्दिष्ट आणि आर्थिक धोरण समिती, आधार कायदा,वस्तू आणि सेवा कर, यासारख्या अनेक सुधारणा हाती घेतल्यानंतर, या वर्षी, अर्थसंकल्पात,अनेक क्षेत्रात, आणखी काही धोरणात्मक बदल आणण्यात आले.

**पारंपरिक विभाग:**

शेतकऱ्यांच्या समस्यांची तीन टप्प्यात विभागणी करता येईल. सुगी अर्थात कापणी पूर्व, कापणी, आणि कापणी नंतरचा टप्पा. सुगी पूर्वीच्या मुद्द्यात पत पुरवठा, खते आणि सिंचनाचा समावेश होतो. दुष्काळ किंवा पूर स्थिती, यासाठीचे विमा छत्र, या बाबी सुगीमधल्या समस्यांत मोडतात. पणन, शेतमालाच्या भावाबाबतची जोखीम आणि वाहतूक यांचा समावेश कापणी नंतरच्या मुद्द्यात होतो. गेल्या वर्षीच्या जमीन मालकी डिजिटलायझेशन,ग्रामीण विद्युत्तीकरण आणि ग्रामीण ऑप्टिकल फायबर केबल, या उपक्रमांना जोडून यंदाच्या मृदा पत्रिका,पीक विमा योजना,दीर्घ आणि सूक्ष्म सिंचन निधी आणि ई NAM म्हणजे इलेक्टॉनिक राष्टीय कृषी बाजार यांची सुयोग्य अंमलबजावणी झाल्यास भारतीय कृषी क्षेत्रातली जोखीम कमी राहण्याची शक्यता आहे. २०१७-१८ या वर्षासाठी, या अर्थसंकल्पात कृषी पतपुरवठ्यासाठी आधीच्या वर्षाच्या तुलनेत वाढ करून तो १० लाख कोटी करण्यात आला. २०१६-१७ या वर्षात तो ९ लाख कोटी रुपये होता. सूक्ष्म आणि दीर्घ सिंचन निधीसाठी अतिरिक्त २०००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कृषी बाजारपेठांमधली मक्तेदारी मोडीत काढून संपूर्ण भारतातल्या कृषी बाजारपेठांच्या एकीकृततेसाठी ई राष्ट्रीय कृषी बाजारपेठांचा सध्याच्या २५० वरुन ५८५ पर्यंत विस्तार करण्यात येईल. कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगसाठी, विशेषत: दूध आणि फळे, भाजीपाला यासाठी आदर्श कायदा सरकारने प्रस्तावित केला आहे.

**पायाभूत क्षेत्र**

सुमार पायाभूत सुविधा हा भारतातल्या खाजगी आणि परदेशी गुंतवणुकीसाठी महत्वाचा प्रश्न राहिला आहे. यातले अडथळे दूर करण्यासाठी, अर्थसंकल्पात, रस्ते, वीज, डिजिटल पायाभूत सुविधा यावर आवश्यक लक्ष पुरवण्यात आले आहे. १ मे २०१८ पर्यंत १००% ग्रामीण विद्युतीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा सरकारचा निश्चय आहे. दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत ४८१४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत, (PMGSY) २०१६-१७ मधे प्रति दिवशी १३३ किलोमीटरची रस्तेबांधणी होत आहे. २०११-२०१४ या काळात ही आकडेवारी सरासरी ७३ किलोमीटर होती. या अर्थसंकल्पात या योजनेसाठीच्या तरतुदीत १९००० कोटी रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. रेल्वे विस्तारासाठी अर्थसंकल्पात ५५००० कोटी रुपयांची तरतूद आहे. सर्वसाधारण वाहतूक क्षेत्रासाठी अर्थसंकल्पात २.४१ लाख कोटींची तरतूद आहे. वाहतूक क्षेत्राच्या विस्ताराद्वारे, विकासाला चालना देण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे हे यातून सूचित होत आहे. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या शक्यता असल्याने तसेच इतर क्षेत्राशीही, हे क्षेत्र जोडले गेले असल्याने या क्षेत्राच्या खर्चात वाढ म्हणजे सर्वसमावेशक विकास साध्य करण्यासाठीची मदत होय.

**तक्ता - २ पायाभूत सुविधांसाठी तरतुदीचा कल**

| विषय | २०१५-१६ | २०१६-२०१७ | २०१७-२०१८ |
|---|---|---|---|
| मनरेगा कार्यक्रम | ३८५०० | ४७४९९ | ४८००० |
| प्रधानमंत्री आवास योजना | २००७५ | २०९३६ | २९०४३ |
| प्रधानमंत्री ग्रामसडक योजना | १९००० | १९००० | १९००० |
| अमृत | ७२९६ | ९५५९ | ९००० |
| संरक्षण सेवेसाठी ऑप्टिकल फायबर केबल नेटवर्क | २७१० | ३२१० | ३००० |
| भारतनेट | ० | ६००० | १०००० |
| मेट्रो प्रकल्प | १०००० | १५७०० | १८००० |
| दीन दयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना | ८५०० | ७८७४ | १०६३५ |
| सागरमाला | ४५० | ४०६ | ६०० |

| | | | |
|---|---|---|---|
| गरीब कुटुंबाना स्वयंपाकासाठी सिलेंडर जोडणी | २००० | २५०० | २५०० |
| रेल्वेसाठी अर्थसंकल्पीय तरतूद | ३०१२१.२ | ३५००७.९ | ५५००० |
| **एकूण** | **१३८६५२.२** | **१६७६९१.९** | **१८७६७८** |

स्रोत :अर्थसंकल्पविषयक कागदपत्रे, भारत सरकार,२०१७-१८ आणि पत्र सूचना कार्यालय(पीआयबी)

**अर्थसंकल्प आणि मॅक्रो इकॉनॉमिक्स**

अर्थसंकल्पातील सर्वात मोठा धोरणात्मक निर्णय म्हणजे वित्तीय/महसुली तुटीचे उद्दिष्ट. आंतरराष्ट्रीय पतमानांकन संस्थांचा दबाव लक्षात घेता,सध्याच्या एफआरबीएम म्हणजे वित्तीय जबाबदारी आणि अर्थसंकल्प नियोजन नियमावलीनुसार, सरकार ३% वित्तीय तुटीवर कायम राहील अशी अपेक्षा होती. गुंतवणुकीला चालना देण्यासाठी नव्या एफआरबीएम समितीने कोणत्या वित्तीय मार्गाची शिफारस केली आहे, हे स्पष्ट नाही, अर्थसंकल्पात वित्तीय तुटीच्या उद्दिष्टात किरकोळ बदल करून ते ३.२% करण्यात आले आहे. (उद्दिष्ट ३% होते) इथे सगळ्यात महत्वाची बाब म्हणजे महसुली तूट खाली आणून ती २.३% वरून १.९% वर आणण्यात आली आहे. त्याचबरोबर भांडवली खर्चात १.१%वरून १.३% पर्यंत वाढ, आमच्या दृष्टिकोनातून, विस्तारीकरण आणि वित्तीय दृढीकरणाशी सुसंगत आहे. एफआरबीएम समितीने मध्यम मुदतीच्या कर्जासाठी, सरकारसाठी २०२३ पर्यंत, ६०% (केंद्र ४०% आणि राज्य २०%) सुचवल्याचे दिसत असून, त्याचे, भानुमूर्ती आणि इतरांनी (२०१५) केलेल्या अंदाजाशी साधर्म्य आणि निकटता आहे.मध्यम काळासाठी विकास आणि विकासाची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी वित्तीय अवकाश पुरवणारा असा वित्तीय मार्ग हवा.

**महसूल चालनेसाठी धोरण**

वस्तू आणि सेवा कर लागू करण्यात येणार असल्याच्या आणि विमुद्रीकरणाच्या पार्श्वभूमीवर करविषयक भरणा आणि पालन वाढण्याची अपेक्षा आहे. यामुळेच कर महसुलात स्वाभाविकपणे वृद्धी अपेक्षित आहे. TIN (टॅक्स इन्फॉर्मेशन नेटवर्क) लागू झाल्यानंतर २००३-२००७ या काळात भारताने अनुभवलेल्या वृद्धीशी हे साधर्म्य दर्शवते. भांडवली प्राप्तीबाबत, गेल्या काही वर्षांच्या प्रमाणेच, या अर्थसंकल्पात, इतर प्राप्ती अंतर्गत (प्रामुख्याने निर्गुंतवणूक) ७२५०० कोटी अंदाजित आहेत, मात्र ही कामगिरी कठीण भासत आहे. प्रत्यक्ष कर आघाडी कडे पाहता १०० पैकी केवळ ७ जणच करदाते आहेत याकडे आर्थिक सर्वेक्षणात लक्ष वेधण्यात आले आहे. करविषयक पाया विस्तारण्यासाठी, अर्थसंकल्पात खालच्या स्तरासाठीच्या कर दरात ५% घट करण्यात आली आहे.यामुळे आणखी लोक कर जाळ्यात येतील असे आमचे मत असून त्यामुळे वास्तविक कर दर अस्थिर होतील.कर विवरणपत्र आणि ई फायलिंग सुलभ करणे यासारख्या उपाययोजनाही आहेत.

**बँकिंग पेच आणि बुडीत कर्ज :**

भारतात खाजगी गुंतवणुकीच्या अभावाचे मुख्य कारण आहे ट्विन बॅलन्सशीट, विशेषत: बँकिंग क्षेत्रात. विमुद्रीकरणामुळे, ठेवींना चालना मिळाली असली आणि बँकांचा ताळेबंद सुरळीत होण्यासाठी मदत झाली असली तरी पुनर्भांडवलीकरणाद्वारे, बँकांना, या अर्थसंकल्पातुन, मदतीची अपेक्षा होती. गेल्या वर्षाच्या २५००० कोटीशी तुलना करता, यावर्षी केवळ १०००० कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकाच्या एनपीए म्हणजे अनुत्पादक मालमत्तामध्ये वाढ नोंदवली असूनही इतकीच तरतूद असून त्याचा बँकांना मोठा फायदा होणार नाही. मात्र, गेल्या वर्षांपासून दिवाळखोरी संदर्भातले विधेयक, कर्ज वसुली लवाद, SARFESI कायदा, बँक बोर्ड ब्युरो आणि इंद्रधनुष योजना यासारखी पाऊले उचलली गेली,ज्याचा बँकांना दीर्घ काळात लाभ होईल.

**विमुद्रीकरण आणि अर्थसंकल्प**

विमुद्रीकरणानंतर, अर्थव्यवस्थेच्या काही विभागात आकुंचन झाल्याचे तर काही विभागात थोडा व्यत्यय आढळून आला. विभागवार स्तरावर,एसआयएएम आकडेवारीनुसार २०१६च्या डिसेंबर महिन्यात वाहन क्षेत्रातल्या विक्रीमध्ये १८.६६% घट नोंदवण्यात आली. मोठ्या प्रमाणावर रोखीने खरेदी केल्या जाणाऱ्या दुचाकी आणि तीन चाकी वाहन विक्रीत अनुक्रमे २२.०४ आणि ३६.२३ टक्के घट दिसून आली. नाईट फ्रँक आकडेवारीनुसार,२०१६ च्या शेवटच्या तिमाहीत स्थावर मालमत्ता विक्री ५०% जास्त घसरली होती. सकल राष्ट्रीय उत्पादनावर, विमुद्रीकरणाचा, ०.२५

ते १% प्रतिकूल परिणाम जाणवेल असा अंदाज आर्थिक सर्वेक्षणात व्यक्त करण्यात आला आहे. दुसरीकडे,सकल राष्ट्रीय उत्पादन विकास मंदावला तरी, विमुद्रीकरणानंतर, कर महसुलात वाढ झाल्याचे दिसून येते, पालिका कर (४.४%), प्राप्ती कर (२४.६%) केंद्रीय अबकारी कर (४३%), सेवा कर (२३.९%)आणि सीमा शुल्क (४.१%). विमुद्रीकरणानंतर कराचा पाया विस्तृत झाला हे याचे एक कारण असू शकते. याआधी ज्या व्यवहारांची नोंद होत नसे, अशा व्यवहारांची विमुद्रीकरणामुळे नोंद होऊ लागल्याने कर टाळणे आणि कर चुकवेगिरीला आळा बसल्याने हे व्यवहार्य ठरू शकते. आर्थिक सर्वेक्षण आणि नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) नुसार, POS यंत्राद्वारे केल्या जाणाऱ्या व्यवहारात, रु पे आधारित इलेक्ट्रॉनिक व्यवहारात १३००० कोटी आणि ई कॉमर्स मधे २००० कोटी वाढ झाली, गेल्या काही महिन्यात ३००-४०० टक्के वाढ नोंदली गेली.

याशिवाय, रोखीने व्यवहार केले जात नाहीत, तोपर्यंत काळा पैसा बाळगणे शक्य नसल्याचा सर्वसाधारण मतप्रवाह आहे. म्हणूनच अतिरिक्त उपाययोजना म्हणून,३ लाखापेक्षा जास्त रोखीच्या व्यवहारावर कर लावण्याचा या अर्थसंकल्पात प्रस्ताव आहे. याद्वारे, दीर्घ कालावधीत, रोखीशिवाय व्यवहाराच्या यंत्रणेकडे अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर वळेल, परिणामी काळ्या पैशाला आळा बसेल.

**अर्थसंकल्प आणि डिजिटल अर्थव्यवस्था**

अर्थव्यवस्थेचा रोख, कॅश कडून लेस कॅश अर्थात रोकड व्यवहाराकडून, रोखीचे व्यवहार कमी करण्याकडे वळवायचा असेल, तर पेमेंट अर्थात बिलाची रक्कम चुकती करण्याच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्याची मोठी गरज आहे. या क्षेत्रात भारतासमोर सध्या तीन महत्वाची आव्हाने आहेत: सायबर सुरक्षा, डिजिटल पायाभूत सुविधा आणि डिजिटल व्यवहारांसाठीचा खर्च. यातल्या दोन मुद्द्यांचे काही प्रमाणात, निराकरण करण्याचा प्रयत्न अर्थसंकल्पात करण्यात आला आहे.

**सायबर सुरक्षा**: वाढत्या सायबर हल्ल्यापासून, वित्तीय क्षेत्राच्या अखंडतेचे आणि स्थैर्याचे रक्षण करण्यासाठी,, आपल्या वित्तीय क्षेत्रासाठी, कॉम्प्यूटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम अर्थात संगणकावर सायबर हल्ला झाल्यास त्यावर तात्काळ प्रतिसाद देणारे पथक, अर्थसंकल्पात प्रस्तावित आहे.(CERT - Fin).

डिजिटल पायाभूत सुविधा: डिजिटल पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी,भारत नेट, डिजि गाव, सुधारीत विशेष प्रोत्साहन योजना (M-SIPS) यासारख्या कार्यक्रमासाठी तरतूद वाढवून त्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या धोरणामुळे डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण होणे अपेक्षित आहे.

**अर्थसंकल्प समावेशी विकासाकडे नेईल का?**

मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करणारा विकास कसा साध्य करायचा हे भारतासमोरचे एक आव्हान आहे. उत्पादन क्षेत्राचा हिस्सा २५% पर्यंत नेण्याचे मध्यम काळाचे उद्दिष्ट जिथे आहे तिथे सध्याच्या उत्पादन क्षेत्रातल्या नकारात्मक कलामुळे मोठे आव्हान निर्माण होते. या पार्श्वभूमीवर, गृहनिर्माण, पर्यटन,रस्ते आणि इतर पायाभूत सुविधा यासारख्या मजूर प्रभावित क्षेत्राकडे अधिक लक्ष पुरवून, या मुद्द्याचे अंशत: निराकरण करण्याचा अर्थसंकल्पात प्रयत्न करण्यात आला आहे. तथापि ज्याची आत्यंतिक गरज आहे अशा संरचनात्मक कायापालटासाठी जमीन, कामगार यासारख्या इतर पैलूबाबत धोरणात्मक सुधारणांची गरज आहे. अर्थसंकल्पात या मुद्द्यांचा उल्लेख नाममात्र आढळतो.

**निष्कर्ष**

सर्वसाधारणपणे पाहता, देशांतर्गत आणि बाह्य आर्थिक वातावरणात असलेला अनिश्चिततेचा संदर्भ लक्षात घेता, देशातल्या विकासाला चालना देतील अशा अनेक मुद्द्यावर केंद्रीय अर्थसंकल्पात लक्ष पुरवण्यात आले आहे. विशेषत: प्रोत्साहनाच्या, दीर्घ कालीन आणि अल्प यशस्वी धोरणाऐवजी, विकासाच्या प्रक्रियेवर जास्त लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. मात्र या उपाययोजनांना काही आणखी सर्वसमावेशक धोरणाची जोड, गरजेची आहे. मध्यम काळासाठीचा विकास आणि विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यात याचा जास्त नसला तरी समान वाटा निश्चितच आहे.

■■■

*लेखक, नवी दिल्लीतल्या, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स अँड पॉलिसी संस्थेसाठी कार्यरत आहेत.*

e-mail: nrbmurthy@gmail.com; hari.nayudu@nipfp.org.in

# वास्तववादी केंद्रीय अर्थसंकल्प

प्रा.चरणसिंग



***देशात आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत मोठी कठीण परिस्थिती असताना नुकताच केंद्रीय अर्थसंकल्प सादर करण्यात आला. भारतात 8 नोव्हेंबर,2016 रोजी निश्चलनीकरणाचा निर्णय घेण्यात आला.त्याच्या परिणामांचा अभ्यास अजून झालेला नाही.खरे तर निश्चलनीकरणाअंतर्गत एकूण किती रोख रक्कम जमा झाली याची नेमकी माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेकडून अद्याप जाहीर केली गेलेली नाही. भारतीय उद्योग व्यापारावर याचा काय परिणाम झाला हे ही अजून स्पष्ट झालेले नाही.***

अर्थसंकल्प हा आर्थिक धोरणाचा महत्वाचा घटक आहे. समष्टी अर्थव्यवस्थेच्या कोणत्याही धोरणाचे उद्दिष्ट सातत्याने होणारी वाढ आणि विकास हे असते. आर्थिक आणि नाणे निधीविषयक धोरणाची अंमलबजावणी करून हे उद्दिष्ट साध्य करता येऊ शकते.रोजगारात वाढ करणे आणि शाश्वत विकास हे आर्थिक धोरणाचे उद्दिष्ट असते तर चलनवाढ नियंत्रणात ठेवून अर्थव्यवस्थेची भरभराट होण्यासाठी उपयुक्त वातावरण निर्माण करणे हे नाणेविषयक धोरणाचे उद्दिष्ट असते.विकास आणि रोजगाराला चालना देणे या उद्दिष्ट पूर्तीसाठी आर्थिक धोरणामध्ये विविध साधनांचा वापर केला जातो.चांगले शिक्षण,कौशल्य विकास यांची हमी, कार्यक्षम सार्वजनिक आरोग्य संस्थांच्या माध्यमातून निरोगी कार्यदलाची उभारणी,व्यापाराला चालना देण्यासाठी मजबूत पायाभूत सुविधांची उभारणी, समर्पित सुरक्षा दलांकडून मालमत्तेचे संरक्षण,प्रशासन आणि न्यायव्यवस्था आदींचा आर्थिक धोरणामध्ये समावेश असतो. या अत्यंत आवश्यक बाबींवरील खर्चाची जबाबदारी पार पाडण्यासाठी सरकारला मोठी आर्थिक तरतूद करावी लागते .सरकार ही रक्कम प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांकडून लाभांश आणि नफा वसूल करणे या मार्गांनी उभी करते.शेवटचा पर्याय म्हणून सरकारला देश आणि बाह्य स्त्रोतांकडून दीर्घ आणि अल्प मुदतीची कर्जे घ्यावी लागतात. अशा प्रकारे आर्थिक साधनसंपत्तीची उभारणी आणि खर्च यासाठी सरकारला जो काम, वापर, बचत, फुरसतीचा वेळ आणि गुंतवणूक यांचा ताळमेळ घालावा लागतो,त्याचा समावेश आर्थिक धोरणामध्ये होतो.तेच सरकारचे कार्य क्षेत्र असते.

देशात आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत मोठी कठीण परिस्थिती असताना नुकताच केंद्रीय अर्थसंकल्प सादर करण्यात आला.भारतात ८ नोव्हेंबर,२०१६ रोजी निश्चलनीकरणाचा निर्णय घेण्यात आला. त्याच्या परिणामांचा अभ्यास अजून झालेला नाही.खरे तर निश्चलनीकरणाअंतर्गत एकूण किती रोख रक्कम जमा झाली याची नेमकी माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेकडून अद्याप जाहीर केली गेलेली नाही. भारतीय उद्योग व्यापारावर याचा काय परिणाम झाला हे ही अजून स्पष्ट झालेले नाही. याशिवाय स्वातंत्र्योत्तर काळानंतर देश एका महत्त्वाच्या टप्प्यावर उभा आहे.देशात वस्तू आणि सेवा कर अर्थात जी एस टी लागू करून कर पद्धती मध्ये महत्त्वाच्या सुधारणा आणण्याचा

सरकारचा विचार आहे.त्याचवेळी आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील परिस्थितीही विचार करण्यासारखी आहे.जगामध्ये आर्थिक वाढीचा वेग मंद आणि कुंठीत झाला आहे. तेलाच्या किंमती वाढत आहेत आणि संरक्षणात्मक धोरणांना पाठबळ मिळत आहे. अमेरिकेत जागतिकीकरणाच्या विचारसरणीमध्ये बदल झाला आहे. इंग्लंडमध्ये ब्रेक्झिटमुळे अस्थिरता आली आहे.याशिवाय युरोपमध्ये घडत असलेल्या राजकीय घडामोडी,या सर्व कारणांमुळे सातत्यपूर्ण वाटचालीचे नियोजन करण्यातील अडचणींमध्ये भरच पडत आहे.

अलिकडेच मांडण्यात आलेल्या या अर्थसंकल्पाचा उद्देश परिवर्तनशील,उर्जेने प्रेरित आणि स्वच्छ भारत बनवणे असा होता.अर्थसंकल्पाच्या प्रस्तावांची- शेतकरी, ग्रामीण लोकसंख्या, युवक,गरीब आणि वंचित,पायाभूत सुविधा, आर्थिक क्षेत्र, डिजिटल अर्थव्यवस्था, सार्वजनिक सेवा,दूरदर्शी आर्थिक व्यवस्थापन आणि कर प्रशासन अशा दहा प्रमुख विषयांमध्ये विभागणी करण्यात आली होती.

अनेक अडचणी असूनसुद्धा अर्थसंकल्पामध्ये आर्थिक एकत्रीकरणाचा पाठपुरावा करण्यात आला आहे. तसेच सर्व प्रकारची तूट कमी होताना दिसत आहे(तक्ता क्रमांक १).

तक्ता क्रमांक १ : प्रमुख तूट

संदर्भ : जमा होणाऱ्या रकमेचा कल,केंद्रीय अर्थसंकल्प २०१७-१८, भारत सरकार

सरकारने महसुली तूट आणि एकूण वित्तीय तूट यशस्वीपणे कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.तरीसुद्धा सकल देशांतर्गत उत्पन्नाच्या (जी डी पी) टक्केवारी संदर्भात भांडवली खर्च कमी आहे तर महसुली खर्चात महसुली जमा रकमेपेक्षा मोठी वाढ झाली आहे. (तक्ता क्र. १).

***तक्ता क्र. १ : सारांश रुपात केंद्रीय अर्थसंकल्प***

| जमा | २०१६-१७ (RE) | २०१७-१८ (BE) | खर्च | २०१६-१७ (RE) | २०१७-१८ (BE) |
|---|---|---|---|---|---|
| महसुली जमा | ९.४ | ९.० | महसुली खर्च | ११.५ | १०.९ |
| महसुली खर्च - महसुली जमा = महसुली तूट | | | | २.१ | १.९ |
| भांडवली जमा | ३.९ | ३.८ | भांडवली खर्च | १.९ | १.८ |
| एकूण खर्च - महसुली जमा = एकूण वित्तीय तूट | | | | ३.२ | ३.२ |

*संदर्भ: केंद्रीय अर्थसंकल्प २०१७-१८, भारत सरकार*

कल विश्लेषणातून असे दिसून आले आहे की देशाच्या नियोजनाच्या सुरुवातीपासून भांडवली खर्चाने इतर बदलणाऱ्या घटकांच्या संदर्भात आघात प्रतिबंधक व्यवस्था (बफर) म्हणून काम केले आहे आणि त्यामुळे तो १९६०पासून कमी होत चालल्याचे दिसत आहे.(तक्ता क २)

**तक्ता क्र. २ : *एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार महसुली आणि भांडवली खातेनिहाय घटकांची मांडणी***

| वर्ष | महसुली जमा | भांडवली जमा | महसुली खर्च | भांडवली खर्च |
|---|---|---|---|---|
| १९५०-५१ | ३.९० | १.१६ | ३.३४ | १.७६ |
| १९६०-६१ | ४.८९ | ६.४४ | ४.६० | ५.७४ |
| १९७०-७१ | ६.९१ | ४.२९ | ६.५७ | ५.२४ |
| १९८०-८१ | ८.२७ | ५.२९ | ९.६३ | ५.५९ |
| १९९०-९१ | ९.३७ | ६.६५ | १२.५४ | ५.४२ |
| २०००-०१ | ८.८५ | ६.१६ | १२.७६ | २.१९ |
| २०१०-११ | १०.१३ | ५.१७ | १३.३७ | २.०१ |
| २०११-१२ | ८.६० | ६.५१ | १३.१२ | १.८२ |
| २०१२-१३ | ८.८४ | ५.८५ | १२.५० | १.६८ |
| २०१३-१४ | ९.०० | ५.०० | १२.१७ | १.६६ |
| २०१४-१५ | ८.८२ | ३.८८ | ११.७५ | १.५७ |
| २०१५-१६ | ८.७५ | ३.९७ | ११.२६ | १.८५ |
| २०१६-१७ (RE) | ९.४४ | ३.५३ | ११.५१ | १.८६ |
| २०१७-१८ (BE) | ९.०० | ३.६६ | १०.९० | १.८४ |

संदर्भ: १) भारतीय अर्थव्यवस्थेवरील संख्याशास्त्र हस्तपुस्तिका,भारतीय रिझर्व्ह बँक

२) केंद्रीय अर्थसंकल्प २०१७-२०१८,भारत सरकार

महसुली खात्यात व्याज देयके,अर्थसहाय्य(सबसिडी) आणि निवृत्तीवेतन यावर होणारा खर्च महसुली जमा रकमेच्या निम्म्यापेक्षा जास्त आहे. (तक्ता क्र.३)

**तक्ता क्रमांक : ३**

***महसुली अंदाजपत्रक (सकल देशांतर्गत उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार)***

| महसुली जमा | | | महसुली खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| **घटक** | **२०१६-१७ (RE)** | **२०१७-१८ (BE)** | **घटक** | **२०१६-१७ (RE)** | **२०१७-१८ (BE)** |
| महानगरपालिका कर | ३.३ | ३.२ | व्याज देयके | ३.२ | ३.१ |
| प्राप्तिकर | २.३ | २.६ | अर्थसहाय्य (सबसिडी) | १.७ | १.६ |
| सीमाशुल्क (जकात) | १.४ | १.५ | निवृत्तीवेतन | ०.९ | ०.८ |
| अबकारी कर | २.६ | २.४ | | | |
| सेवा कर | १.६ | १.६ | | | |
| लाभांश आणि नफा | १.० | ०.८ | | | |
| **एकूण** | **९.४** | **९.०** | **एकूण** | **११.५** | **१०.९** |

संदर्भ: जमा रकमेचा कल, केंद्रीय अर्थसंकल्प,२०१७-१८,भारत सरकार

महसुलाचे कर विश्लेषण केल्यास १९७०-७१पासून लाभांशासहित बिगर-कर महसूल मंद झाल्याचे दिसून येत आहे तर कर महसुलात नको असलेली वाढ दिसून येत आहे (तक्ता क्र.४).

**तक्ता क्र. ४ : निवडक वित्तीय निदर्शक (सकल देशांतर्गत उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार)**

| वर्ष | निव्वळ कर महसूल | बिगर कर महसूल | महसुली जमा |
|---|---|---|---|
| १९७०-७१ | ५.२ | १.८ | ६.९ |
| १९८०-८१ | ६.३ | २.० | ८.३ |
| १९९०-९१ | ७.३ | २.० | ९.४ |
| २०००-०१ | ६.३ | २.६ | ८.९ |
| २०१४-१५ | ७.२ | १.६ | ८.८ |
| २०१५-१६ | ६.९ | १.८ | ८.८ |
| २०१६-१७ (RE) | ७.२ | २.२ | ९.४ |
| २०१७-१८ (BE) | ७.३ | १.७ | ९.० |

संदर्भ: जमा रकमेचा कल, केंद्रीय अर्थसंकल्प,२०१७-१८,भारत सरकार

**इतर देशांशी तुलना**

भारत अनेक समस्यांना तोंड देत असूनही जागतिक अर्थव्यवस्थेत त्याने स्वत:चे असे वित्तीय स्थान निर्माण केले आहे (तक्ता क्र.५)

***तक्ता क्र.५ : सकल देशांतर्गत उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार एकूण कर्ज***

| देश | २०१३ | २०१४ | २०१५ | २०१६ | २०१७ | २०१८ | २०१९ | २०२० | २०२१ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ब्राझील | ६०.४ | ६३.३ | ७३.७ | ७८.३ | ८२.४ | ८५.२ | ८७.९ | ९०.८ | ९३.६ |
| चीन | ३६.९ | ३९.८ | ४२.९ | ४६.३ | ४९.९ | ५२.६ | ५४.६ | ५६.१ | ५७.२ |
| फ्रान्स | ९२.४ | ९५.३ | ९६.१ | ९७.२ | ९७.८ | ९७.९ | ९७.४ | ९५.९ | ९३.८ |
| जर्मनी | ७७.१ | ७४.५ | ७१.० | ६८.२ | ६५.९ | ६३.६ | ६१.१ | ५८.९ | ५६.७ |
| भारत | ६८.० | ६८.३ | ६९.१ | ६८.५ | ६७.२ | ६५.६ | ६३.५ | ६१.४ | ५९.२ |
| इंडोनेशिया | २४.८ | २४.७ | २७.३ | २७.५ | २८.२ | २९.२ | २९.९ | ३०.४ | ३०.९ |
| रशिया | १३.१ | १५.९ | १६.४ | १७.१ | १७.९ | १८.६ | १९.१ | १८.९ | १८.५ |
| दक्षिण आफ्रिका | ४४.० | ४६.९ | ४९.८ | ५१.७ | ५३.३ | ५४.६ | ५५.४ | ५५.९ | ५६.२ |
| इंग्लंड | ८६.० | ८७.९ | ८९.० | ८९.० | ८८.८ | ८८.६ | ८६.६ | ८४.३ | ८२.१ |
| अमेरिका | १०४.६ | १०४.६ | १०५.२ | १०८.२ | १०८.४ | १०७.९ | १०७.८ | १०७.९ | १०८.३ |

संदर्भ : जागतिक आर्थिक परिस्थिती अहवाल - ऑक्टोबर २०१६,आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

केंद्रीय अर्थसंकल्पाचे परिणाम

तक्ता क्र.६मध्ये विश्लेषण केल्याप्रमाणे केंद्रीय अर्थसंकल्प हा वाढ आणि विकासाभिमुख असून रोजगार निर्मिती करणारा आहे.

***तक्ता क्र.६ : अर्थसंकल्पाचे परिणाम***

| तपशील | वाढ | रोजगार | वापर | गुंतवणूक |
|---|---|---|---|---|
| कृषी पत पुरवठा १० लाख कोटी रुपये | ✔ | | | ✔ |
| दीर्घकालीन जलसिंचन निधी ४०,००० कोटी रुपये | ✔ | | | ✔ |
| मनरेगा ४८,००० कोटी रुपये | ✔ | ✔ | ✔ | ✔ |
| ग्राम सडक योजना २७,००० कोटी रुपये | ✔ | ✔ | | ✔ |
| आवास योजना २३,०००कोटी रुपये | ✔ | ✔ | | ✔ |
| रेल्वे १ लाख ३०,०००कोटी रुपये | ✔ | ✔ | | ✔ |
| रस्ते क्षेत्र - महामार्ग ६४,९००कोटी रुपये | ✔ | ✔ | | ✔ |
| वाहतूक क्षेत्र २ लाख ४०,००० कोटी रुपये | ✔ | ✔ | | ✔ |
| मुद्रा योजना लक्ष्य २लाख ४०,००० कोटी रुपये | ✔ | ✔ | | ✔ |

संदर्भ: केंद्रीय अर्थसंकल्प भाषण २०१७-१८,भारत सरकार

जागतिक संदर्भात वाढीचा विचार करताना देशाला परिवर्तनशील बनवणे,ऊर्जा देणे आणि देश स्वच्छ बनवणे या उद्दिष्टपूर्तीसाठी सरकार पाठपुरावा करत आहे असा विश्वास देशातील नागरिकांमध्ये निर्माण होणे महत्त्वाचे आहे.असा विश्वास बाजारपेठेत निर्माण होण्यासाठी सरकारने अनेक उपाययोजना जाहीर केल्या आहेत,त्या तक्ता क्र.७ मध्ये देण्यात आल्या आहेत.

***तक्ता क्र.७ : विश्वास निर्मितीसाठी अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या उपाययोजना***

| तपशील | वाढ | बेहिशेबी पैसा | विश्वास |
|---|---|---|---|
| शेअर बाजारात रेल्वेचे समभाग | ✔ | | ✔ |
| बँकांचे पुनर्भांडवलीकरण १०,००० कोटी रुपये | ✔ | | ✔ |
| एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या ६० टक्के कर्ज | ✔ | | ✔ |
| पुढील तीन वर्षांत ३% वित्तीय तूट | ✔ | | ✔ |
| वार्षिक उलाढाल ५० कोटी रुपये असणाऱ्यांना प्राप्तिकरात सवलत | ✔ | | ✔ |
| मार्च,२०१७ पर्यंत १० लाख नवी विक्री केंद्रे | ✔ | ✔ | ✔ |
| रोख व्यवहारांना ३ लाख रुपयांपर्यंतची मर्यादा | ✔ | ✔ | ✔ |
| राजकीय निधीवर मर्यादा | ✔ | ✔ | ✔ |

संदर्भ : केंद्रीय अर्थसंकल्प भाषण २०१७-१८,भारत सरकार

**काही महत्त्वाचे प्रश्न**

केंद्रीय अर्थसंकल्प म्हणजे केवळ विविध खात्यांच्या आकडेमोडीचे निवेदन नव्हे तर आर्थिक धोरणाच्या कार्यक्षेत्रातील ते एक महत्त्वाचे दस्तऐवज असते. नुकत्याच सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

**भारत - कर पालन न करणारा देश**

भारत हा मुख्यत: कर पालन न करणारा देश आहे (तक्ता क्र.८ आणि ९ ),असा उल्लेख केंद्रीय अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात केला.गेल्या काही वर्षांमध्ये केंद्र आणि राज्य सरकारांकडे एकूण जमा झालेला कर(यामध्ये वेगवेगळ्या राज्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांकडे किती कर जमा झाला याबाबतची एकसमान माहिती उपलब्ध नाही) हा सकल देशांतर्गत उत्पन्नाच्या (जीडीपी) १८ टक्क्यांपेक्षा कमी आहे. बहुतेक प्रगत देशांमध्ये हे प्रमाण ३० टक्क्यांपेक्षा जास्त आहे.मात्र, भारतातील आर्थिक स्थिती भिन्नआहे.आपल्या देशात ३० टक्के लोक हे दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहेत तर सुमारे ६० टक्के लोक हे ग्रामीण भागात राहात असून कृषी उत्पन्नावर अवलंबून आहेत त्यामुळे त्यांना करातून सूट दिलेली असते.त्यामुळे आर्थिक साधन संपत्ती उभारण्यावर मर्यादा येतात. याशिवाय, ज्या वस्तूंनी अबकारी कर भरणे अपेक्षित आहे त्यांना कर माफ केला जातो. तसेच,कर हा उत्पन्नावर आधारित असल्याने,श्रीलंका,मेक्सिको,इंडोनेशिया आणि फिलिपाईन्स यांसारख्या गरीब आणि विकसनशील देशांमधील जमा होणारा कर हा प्रगत देशांमधील जमा होणाऱ्या करापेक्षा लक्षणीयरीत्या कमी असणे अपेक्षित आहे.

***तक्ता क्र.८ : भारतातील करपालन तक्ता - सर्वसाधारण***

| वर्गवारी | संख्या |
|---|---|
| संघटीत क्षेत्रात काम करणारी व्यक्ती | ४.२ कोटी |
| प्राप्तिकर भरणाऱ्या पगारदार व्यक्ती | १.७ कोटी |
| | |
| अनौपचारिक क्षेत्र वैयक्तिक उद्योजक | ५.६ कोटी |
| विवरणपत्र भरलेल्यांची संख्या | १.८ कोटी |
| | |
| नोंदणीकृत कंपन्या | १३.९ लाख |
| कंपन्यांनी दाखल केलेली विवरणपत्र | ५.९लाख |
| स्वत:चे उत्पन्न शून्य जाहीर करणाऱ्या किंवा तोटयात दाखवण्यात आलेल्या कंपन्या | २.८ लाख |
| < १कोटी रुपयांपर्यंत नफा जाहीर करणाऱ्या कंपन्या | २.८ लाख |
| १ <१० कोटी रुपयांदरम्यान नफा दाखवणाऱ्या कंपन्या | २८,६६७ |
| १० कोटी रुपयांपेक्षा जास्त नफा दाखवणाऱ्या कंपन्या | ७,७८१ |

संदर्भ : केंद्रीय अर्थसंकल्प भाषण २०१७-१८,भारत सरकार

*तक्ता क्र.९ : भारतातील करपालन तक्ता - वैयक्तिक*

| वर्गवारी | संख्या |
|---|---|
| वैयक्तिक कर विवरणपत्र दाखल करणारे | ३.७ कोटी |
| कर सवलत मर्यादेच्या खाली असणारे | ९९ लाख |
| २.५ ते ५ लाख रुपयांदरम्यान उत्पन्न असणारे | १.९ कोटी |
| ५ ते १० लाख रुपयांदरम्यान उत्पन्न असणारे | ५२ लाख |
| १० लाख रुपयांपेक्षा जास्त | २४ लाख |
| ५ लाख रुपयांपेक्षा जास्त | ७६ लाख |
| त्यापैकी नोकरदार (पगारदार) वर्ग | ५६ लाख |
| ५० लाख रुपयांपेक्षा जास्त | १.७ लाख |
| *संदर्भ : केंद्रीय अर्थसंकल्प भाषण २०१७-१८,भारत सरकार* | |

स्वच्छ भारत संकल्पना राबवण्याचा सरकारचा उद्देश यातून व्यक्त होतो. त्यामुळे उपलब्ध झालेल्या माहितीनुसार ज्यांनी आरामदायी मोटारगाड्या खरेदी केल्या आहेत किंवा जे परदेश प्रवास करतात त्यांच्याबाबत कर प्रशासनाने विशेष दक्ष आणि कार्यक्षम राहणे गरजेचे आहे. जपानसारख्या देशांमध्ये कर पालन करणाऱ्यांना प्रोत्साहन दिले जाते. तर, अमेरिकेत कर बुडवणाऱ्यांना कडक शिक्षा केली जाते.

काही प्रगत देशांमध्ये, जिथे सकल देशांतर्गत उत्पन्न कर जास्त असतो तिथे सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, परिवहन आणि नागरी सेवा अति उच्च दर्जाच्या असतात. याशिवाय, पुरुष आणि महिला यांची जीवन सुरक्षा, काम करणाऱ्या महिलांसाठी सुरक्षित वातावरण आणि वादविवाद, भांडणांची वेळेवर सोडवणूक करण्यासाठी न्याय व्यवस्था, यांसारख्या सुविधा असल्याने तिथे कर जास्त असला तरी तो भरण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहन मिळते.कर पालन चांगल्या प्रकारे केले जाते.

लोकसंख्येच्या दृष्टीने बघितले तर आपल्या देशाची लाभदायक बाब म्हणजे आपल्याकडे ६६ टक्के लोकसंख्या ही ३४ वर्षांपेक्षा कमी वयोगटातील आहे. त्यामुळे आपल्या पुढील पिढीसाठी भ्रष्टाचारमुक्त भारत हा विचार योग्य ठरणार आहे.त्यांना सहजपणे स्वत:चा व्यवसाय सुरु करण्यासाठी स्टार्ट-अप आणि स्टँड-अप इंडिया सारख्या योजना चालना देणाऱ्या ठरणार आहेत. स्वेच्छेने संपत्ती जाहीर करणे, सर्वसाधारण माफी यांसारख्या योजना आणि याशिवाय इतरही अनेक प्रयत्न सरकारने बेहिशेबी पैसा उजेडात आणण्यासाठी केले. मात्र, भ्रष्टाचार खणून काढण्यासाठीचे हे प्रयत्न तितकेसे प्रभावी न ठरल्याने सरकारला खिन्न करणारे होते. म्हणूनच बेहिशेबी पैसा उजेडात आणण्यासाठी दीर्घकाळ चिकाटीने प्रयत्न करणे जरुरीचे आहे.हा प्रयत्न करताना सर्वंकष दृष्टिकोन ठेवून सर्वांना सहभागी करून घ्यायला हवे.मग ते सनदी लेखापाल असोत की विधीज्ञ, समाजशास्त्रज्ञ असोत की धर्मगुरू असोत, तसेच प्रसारमाध्यमे आणि राजकारणातील सामाजिक नेत्यांचाही यात सहभाग हवा.

**आर्थिक क्षेत्र**

आधीच्या वर्षांप्रमाणेच सरकारने बँकांचे पुनर्भांडवलीकरण करण्याचा कल यावर्षीही जाहीर केला.ही मदत सर्व बँकांना सरसकट आणि नियमित रुपात मिळणार की काही अटींवर म्हणजे काही सुधारित कामगिरी निदर्शकानुसार मिळणार यावर विचार होणे महत्त्वाचे आहे.व्यापारी बँका व्यावसायिकदृष्ट्या व्यवहार्य ठरतील की नाही हे पाहून त्यांचा तोटा भरून काढण्यासाठी काही मालमत्ता विकून टाकणे,काही निवडक शाखा बंद करणे, किंवा त्यांचे दर कमी करता येतील का, यांसारख्या उपाययोजनांवर विचार होणे गरजेचे आहे. याशिवाय, सार्वजनिक क्षेत्रातील सर्व बँकांनी, त्या तोटयात चालोत किंवा नफ्यात,त्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या पगारात सारखीच वाढ करायला हवी. म्हणजेच, निरुपद्रवी करदात्यांकडून घेण्यात येत असलेल्या साधनसंपत्तीचे महत्त्व लक्षात घेऊन व्यापारी बँकांनी त्याचा दुरुपयोग होऊ नये यासाठी कडक उपाययोजना करणे जरुरीचे आहे.व्यापारी बँकांना सातत्याने

भांडवलाचा ओघ चालू ठेवणे हे नैतिकदृष्ट्या धोकादायक ठरू शकते.

**नेहमीच्या वेळेआधी सादर करण्यात आलेला केंद्रीय अर्थसंकल्प**

इतक्या वर्षांत प्रथमच केंद्रीय अर्थसंकल्प २८ ऐवजी १ फेब्रुवारीला म्हणजे बराच आधी सादर करण्यात आला.उद्देश हा की मार्च महिन्या अखेरपर्यंत त्याला संसदेची मंजुरी मिळेल आणि मंत्रालयांना एक एप्रिल पासून विकासकामांसाठी साधनसंपत्ती,निधी मिळायला सुरुवात होईल. भारतात, जूनमध्ये मान्सूनला सुरुवात होते.निधी आधी मिळाल्याने तो कसा खर्च करायचा, योजनांची अंमलबजावणी कशी करायची याचे नियोजन पावसाळ्यापूर्वी करण्यासाठी मंत्रालयांना यामुळे वेळ मिळणार आहे. अर्थसंकल्प आधी सादर केल्यामुळे आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच महसुलाची जमवाजमव आणि भांडवली खर्च करता येईल अशी अपेक्षा आहे. दुसरा असाही युक्तिवाद करता येईल की अर्थसंकल्प सादरीकरणाची तारीख एक फेब्रुवारी म्हणजे सुमारे एक महिनाभर अलीकडे, प्रजासत्ताक दिनाच्या जवळ घेतल्याने दिल्लीमध्ये यासंबंधीच्या सल्ला-मसलतीला वेळ मिळाला. याशिवाय, अर्थसंकल्प फेब्रुवारी महिन्याच्या कोणत्याही कामाच्या दिवशी सकाळी सादर करण्यात यावा किंवा एक दिवस ठरवून घ्यावा, उदाहरणार्थ, फेब्रुवारीच्या पहिल्या शुक्रवारी,दुपारी २ वाजता किंवा पहिल्या शनिवारी सकाळी ११ वाजता, यावरही विचार होणे गरजेचे आहे.

**आर्थिक धोरण - वार्षिक असावे का?**

प्रगत देशांमध्ये अर्थसंकल्प ही सर्वसाधारण, नेहमीची घटना मानली जाते. भारतात मात्र तो एक महिनाभर चालणारा सोहळा असतो.उद्योग,शेअर बाजार तसेच

***इतक्या वर्षांत प्रथमच केंद्रीय अर्थसंकल्प २८ ऐवजी १ फेब्रुवारीला म्हणजे बराच आधी सादर करण्यात आला.उद्देश हा की मार्च महिन्या अखेरपर्यंत त्याला संसदेची मंजुरी मिळेल आणि मंत्रालयांना एक एप्रिल पासून विकासकामांसाठी साधनसंपत्ती,निधी मिळायला सुरुवात होईल. भारतात, जूनमध्ये मान्सूनला सुरुवात होते.निधी आधी मिळाल्याने तो कसा खर्च करायचा, योजनांची अंमलबजावणी कशी करायची याचे नियोजन पावसाळ्यापूर्वी करण्यासाठी मंत्रालयांना यामुळे वेळ मिळणार आहे.***

नागरिक या अर्थसंकल्परुपी सोहळ्याची मोठया काळजीने वाट बघत असतात. आर्थिक धोरण तयार करणे आणि सातत्यपूर्ण सुनिश्चित वाटचाल यांच्यात यामुळे तफावत पडण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.कारण गुंतवणूकदारांना आपल्याला काही वेळ मिळावा असे वाटत असते.आणखीही एक मुद्दा विचारात घेण्यासारखा आहे,तो म्हणजेआर्थिक निवेदन दरवर्षी सादर करण्यात यावे पण आर्थिक धोरण मात्र मध्यम ते दीर्घकालीन साधारण पाच वर्षांनी जाहीर करण्यात यावे.

**रेल्वे अर्थसंकल्प**

ब्रिटीश रेल्वे अर्थशास्त्रज्ञ विल्यम ॲकवर्थ यांनी केलेल्या शिफारशींनुसार १९२४ पासून रेल्वे अर्थसंकल्प स्वतंत्रपणे मांडण्यास सुरुवात झाली. त्यानंतर १९४९ पासून अनेक समित्यांनी रेल्वे अर्थसंकल्प स्वतंत्र सादर न करता तो केंद्रीय अर्थसंकल्पात विलीन करण्यात यावा,अशा सूचना केल्या होत्या.पण राजकीय कारणांमुळे या सूचना प्रत्यक्षात येऊ शकल्या नाहीत.यावर्षी मात्र तो केंद्रीय अर्थसंकल्पात विलीन झाल्याने ग्राहकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. रेल्वेच्या कार्यपद्धतीत व्यावसायिकता यावी,सेवांच्या दर्जात सुधारणा व्हावी,आधुनिक साधनसामग्रीचा वापर आणि सुरक्षा उपाय योजले जावेत, बाजारपेठेला अनुसरून गतिशील आणि स्पर्धात्मक असे तिकीट दर असावेत, अशा स्वरूपाच्या ग्राहकांच्या अपेक्षा आहेत.रेल्वेची कायमच संसदीय छाननीमधून सुटका झाली आहे.पण आता मात्र, रेल्वेने कोकण रेल्वेच्या यशस्वी धर्तीवर तांत्रिकदृष्ट्या सर्वोत्कृष्ट अशी संघटनात्मक रचना उभारणे गरजेचे आहे.

**अर्थसंकल्पीय तरतुदींचे सुसूत्रीकरण आवश्यक**

यावेळच्या केंद्रीय अर्थसंकल्पात करण्यात आलेली महत्त्वाची सुधारणा म्हणजे योजना आणि योजनाबाह्य अशी विभागणी काढून टाकण्यात आली. सामाजिक-आर्थिक कल्याणकारी कार्यक्रम असा फरक करत असताना 'योजना' ही संज्ञा काढून टाकण्याचा धोरणात्मक निर्णय झाल्याने ही सुधारणा करण्यात आली. योजना या विभागात होणारा खर्च हा उपयुक्त आणि योजनाबाह्य खर्च हा अपव्यय असा सर्वसाधारण विचार लोकप्रिय आहे.हा विचार इतका प्रबळ झाला की योजनाबाह्य खर्च या

विभागाखाली येणाऱ्या मालमत्तेची देखभाल यांसारख्या महत्त्वाच्या विषयाकडे दुर्लक्षच करण्यात आले.यामुळे झाले असे की केंद्र आणि राज्ये दोन्हीकडे योजना या विभागात मोठया प्रमाणावर खर्च दाखवण्याची प्रवृत्ती वाढीस लागली. योजना आणि योजनाबाह्य असा फरकच आता काढून टाकल्याने खर्च आणि परीणाम यांच्यात थेट संबंध प्रस्थापित होऊ शकतो,आणि सार्वजनिक खर्चाच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन करण्यास ते उपयुक्त ठरू शकेल.तसेच राज्यघटनेमध्ये ज्याचा मूलत: विचार करण्यात आला आहे,त्यावर म्हणजे अंदाजपत्रकाचे मुख्य लक्ष महसुली आणि भांडवली खर्चावर केंद्रित होईल.विश्लेषणात्मक,पारदर्शी आणि कार्यक्षम निर्णय घेण्यासाठी महसुली आणि भांडवली खर्च यात स्पष्टपणे फरक करणे गरजेचे आहे. सरकारला कार्यवाहीसाठी किती रक्कम लागली आणि सरकारने किती गुंतवणूक केली याचे मूल्यमापन करण्यास या फरकामुळे मदत होणार आहे.

महसुली खात्यावर किती खर्च झाला आणि इतर खात्यावर किती खर्च झाला,याचा वेगळा स्पष्ट उल्लेख,वार्षिक आर्थिक निवेदनात नमूद करावा, असे राज्यघटनेतील ११२ व्या कलमात म्हटले आहे. खर्चाचा अंदाज देताना इतर खर्चापेक्षा महसूल खात्यावर किती खर्च होणार यासंबंधीच्या तरतुदीचा वेगळा स्वतंत्र उल्लेख करणे आवश्यक आहे,असे सरकारच्या, सन २००५ च्या सर्वसाधारण आर्थिक नियमांमध्ये नमूद करण्यात आले आहे.या इतर खर्चामध्ये भांडवली खात्यावर होणारा खर्च,सरकारने घेतलेली कर्जे, कर्जांची केलेली परतफेड आणि अल्पकालीन कर्जे इत्यादीचा समावेश आहे.

खर्चामध्ये असा फरक करणे अतिशय गरजेचे आहे,असे आंतरराष्ट्रीय अनुभवातून सूचित होताना दिसत नाही. खरे तर अनेक प्रगत देशांमध्ये त्यांच्या राज्य म्हणून उदयाला येण्याच्या काळात/ ते विकसित होत असताना साधनसंपत्तीच्या योग्य वाटपासाठी महसुली आणि भांडवली खर्चात फरक केला जात असे. यापैकी काही देशांनी ही पद्धत आजही सुरु ठेवली आहे,तर काही देशांनी असे वेगळे वर्गीकरण करण्याची पद्धत बंद केली आहे.


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :
**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**
(Circle the period of subscription)

DD / MO No. ______________________ date ____________

Name (in block letters) : ______________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ______________________

Phone No. / email : ______________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**
**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

**समारोप**

जागतिक अस्थिर परिस्थिती आणि निश्चलनीकरणातून बाहेर येणे या दोन घडामोडींच्या पार्श्वभूमीवर सादर करण्यात आलेला हा अर्थसंकल्प वास्तववादी होता, असेच समारोप करताना म्हणावे लागेल.तरीही, निश्चलनीकरणाचा मार्ग स्वीकारल्यानंतर, भ्रष्टाचारमुक्त भारत अभियान प्रभावी बनवण्यासाठी सरकारकडून काही धाडसी उपाययोजना जाहीर केल्या जातील अशी अपेक्षा होती. मात्र, रोख आर्थिक व्यवहारांची मर्यादा तीन लाख रुपयांपर्यंत ठेवणे आणि बेहिशेबी राजकीय निधीला मर्यादा घालणे, यांसारखे सौम्य उपक्रम सरकारकडून हाती घेण्यात आले. सामान्यत: अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे कराचा पाया भक्कम होण्यास मदत होईल.हा अर्थसंकल्प वाढ,विकास आणि रोजगाराभिमुख आहे.मात्र,अर्थसंकल्पात जोरदारपणाचा आणि दूरदृष्टीचा अभाव दिसून येतो.लोकसंख्येच्या दृष्टीने फायदेशीर ठरतील अशा योजनांचे आणि भारताचे डिजिटलायझेशन करण्याचे नियोजन आणि त्यासाठी दीर्घकालीन स्वरूपाच्या आर्थिक क्षेत्र सुधारणा हाती घेतल्याचे अर्थसंकल्पात दिसून येत नाही.

■■■

*लेखक बंगळुरू येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेमध्ये अर्थशास्त्र आणि सामाजिक शास्त्रे या क्षेत्रात अध्यापन करतात.*

e-mail: charansingh60@gmail.com

## आगामी अंक

**एप्रिल २०१७**

**'कामगार सुधारणा'**

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting**
**Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

# ग्रामीण कृषी क्षेत्र - चमकदार कामगिरीच्या दिशेने मार्गक्रमण

निरेंद्र देव



***दशकानुदशके कृषी मालाला अपूरी किंमत हा विषय चर्चिला जात आहे. शेतकऱ्यांना मिळणारा मोबदला हा गंभीर विषय आहे. विस्कळीत स्वरुपाच्या विपणन केंद्रामुळेही हे घडत आहे. यामुळेच शासनाने अशा काही योजना पुढे आणल्या आहेत की, ज्याच्या माध्यमातून ही दरी कमी-कमी करता येईल. शेतकऱ्यांनाही बाजारपेठ उपलब्ध होईल. एकात्मिक विक्री केंद्रे, भविष्यकालीन सौदे बाजार ही त्याचीच काही उदाहरणे.***

कृषीक्षेत्रासाठी रोजगाराच्या संधी आणि कामगारांचे कल्याण आणि उन्नती हे शासनासाठी नेहमीच प्राधान्यक्रम राहिले आहेत. या प्राधान्यक्रमात अधिक वाढ व्हावी वा सुधारणा व्हावी याकरिता चालू अर्थसंकल्पात विशेष लक्ष दिले गेले आहे.

हे खरे आहे की, काहीही झाले तरी भविष्याच्या दृष्टीने कृषी अर्थव्यवस्था आणि ग्रामीण विकासाने अनेकांनी अभ्यासल्याप्रमाणे, भारतात भरीव असे काही करुन दाखवले नाही. एका किंवा अनेक दृष्टीने हा २०१७-१८चा अर्थसंकल्प मात्र आमुलाग्र बदल घडविताना दिसेल. यामध्ये व्यापक तरतूदी आहेत. योग्य प्रकल्पांची निवड केलेली आहे. पारदर्शी आराखडा तयार केलेला आहे. या साऱ्यांचा परिपाक म्हणजे एक भव्य दिव्य असे कृषी क्षेत्राचे चित्र व्यापक दृष्टीकोनातून पाहू शकणार आहोत. त्याचप्रमाणे मानवनिर्मित किंवा नैसर्गिक अडथळयांवर आपण मात करु शकणार आहोत. या वर्षीच्या अर्थसंकल्पाचे महत्व यातच आहे की कृषी विभागाचा योग्य असा 'समतोल' राखला गेला आहे. कृषी क्षेत्रावर लक्ष केंद्रीत करुन संयोग प्रक्रियेत समतोल राखताना, कृषी आधारित समाजाला मदतगार ठरेल. शिवाय भारतातील शहरी भागांना त्याचा फायदा होईल असे अर्थसंकल्पातील चित्र आहे.

प्रथमत: गेल्यावर्षीच्या तुलनेत २४% अधिक तरतूद अर्थसंकल्पात आहे. आर्थिक वर्ष २०१७-१८ या वर्षात, ग्रामीण, कृषी तसेच त्याच्या अनुषंगाने असणाऱ्या क्षेत्रात एकूण तरतूदींपैकी केलेली तरतूद १,८७,२२३ कोटी इतकी उच्चांकी आहे.

या ठिकाणी हे समजून घेणे अनिवार्य आहे की, देशाच्या विकासात होत असलेली प्रगती , त्याचबरोबर सर्वंकश अशा विकास योजनांतून, 'सबका साथ - सबका विकास' या घोषवाक्यातून - ग्रामीण तसेच कृषी क्षेत्राकडे अधिकाधिक लक्ष वेधणे महत्वपूर्ण आहे.

दशकानुदशके कृषी मालाला अपूरी किंमत हा विषय चर्चिला जात आहे. शेतकऱ्यांना मिळणारा मोबदला हा गंभीर विषय आहे. विस्कळीत स्वरुपाच्या विपणन केंद्रामुळेही हे घडत आहे. यामुळेच शासनाने अशा काही योजना पुढे आणल्या आहेत की, ज्याच्या माध्यमातून ही दरी कमी-कमी करता येईल. शेतकऱ्यांनाही बाजारपेठ उपलब्ध होईल. एकात्मिक विक्री केंद्रे, भविष्यकालीन सौदे बाजार ही त्याचीच काही उदाहरणे.

**कृषी मालाला वाजवी किंमत**

शेतकऱ्यांना मदत करण्याच्या दृष्टीने अर्थमंत्र्यांनी, राज्यांना राबवण्यासाठी तयार केलेल्या करारात शेतीसाठीचे नाविन्यपूर्ण कायद्यांबद्दलचे दूरदृष्टींचे विचार सामान्यांबरोबर साधले. याकरिता हे लक्षात घेण्याजोगे आहे की, शासन इ-नाम (e-NAM) च्या माध्यमातून म्हणजेच राष्ट्रीय कृषीबाजारच्या माध्यमातून एका व्यासपीठावर येतील. शासनाने तसा निर्धार व्यक्त केला आहे.

इ-नाम म्हणजेच 'राष्ट्रीय कृषी बाजार' ची व्याप्ती वाढविण्यात आली असून सध्या ती २५० कृषीबाजारावरुन ती ५८५ राष्ट्रीय कृषी बाजार इतकी करण्यात आलेली आहे. अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्री म्हणाले की, मालाच्या साफसफाई, वर्गवारी तसेच पॅकिंग आदी करिता प्रत्येक बाजाराला अधिकतम ७५लाख रुपये इतके अनुदान देण्यात येईल.

सन २०१६ मध्ये, सुरुवात केलेल्या 'इलेक्ट्रॉनिक व्यापार पध्दती' (इ-नाम) बदलाने आमुलाग्र क्रांती घडविली आहे. (बिग गेम चेंजर)

शेतकऱ्यांना सातत्याने तोंड द्यावे लागत असल्याने चंचल अशा कृषीकिंमतींवरती इ- नाम हे प्रभावी उत्तर आहे. शासनाच्या कृषी विभागातील अधिका-यांनी चंचल अशा कृषीदरांबद्दल आपल्याला पुरेशी कल्पना आहे असे म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या आव्हानांची माहिती आहेच मात्र कृषी मालातील मध्यस्थांचा प्रश्न सोडविणे गरजेचे आहे. मध्यस्थाला हटवून अधिकाधिक पारदर्शीपणा आणण्याच्या दृष्टीने शासन पुढाकार घेत आहे. देशपातळीवर एकच 'विशिष्ट किंमत' (बेंचमार्क प्राइस) देण्याकरिता शासन प्रयत्नशील आहे आणि अशा त-हेने इ-नाम ही बाजारप्रणाली खूप मोठी भूमिका भविष्यामध्ये बजावणार आहे.

केंद्रीय कृषीमंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार ''राष्ट्रीय पातळीवर प्राकृतिक बाजार व्यवस्था निर्माण करणे महत्वाचे आहे.'' खरेतर, याची सुरुवात गेल्यावर्षी पासूनच झाली आहे. ''ऑनलाइन बाजार आणि प्रस्थापित अशा बाजार व्यवस्थेला समांतर बाजारव्यवस्था अशी गल्लत करु नये.''

***शेतकऱ्यांना सातत्याने तोंड द्यावे लागत असल्याने चंचल अशा कृषीकिंमतींवरती इ- नाम हे प्रभावी उत्तर आहे. शासनाच्या कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी चंचल अशा कृषीदरांबद्दल आपल्याला पुरेशी कल्पना आहे असे म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या आव्हानांची माहिती आहेच मात्र कृषी मालातील मध्यस्थांचा प्रश्न सोडविणे गरजेचे आहे. मध्यस्थाला हटवून अधिकाधिक पारदर्शीपणा आणण्याच्या दृष्टीने शासन पुढाकार घेत आहे. देशपातळीवर एकच 'विशिष्ट किंमत' (बेंचमार्क प्राइस) देण्याकरिता शासन प्रयत्नशील आहे***

असे स्पष्टीकरण केंद्रीय कृषीमंत्रालयाने दिले आहे.

राष्ट्रीय पातळीवरील 'इ-नाम' पध्दती प्रस्थापित बाजार व्यवस्थेला पोषक ठरणार असून ''ऑनलाइन ट्रेडिंग पोर्टलच्या माध्यमातून बाहेरील राज्यातील व्यापारी स्थानिक बाजारपेठेशी संलग्न होऊ शकतील.''

२१ कृषीमालाआधारित बाजारांवर लक्ष केंद्रीत करुन त्यामध्ये उत्तर प्रदेशमधील ६, गुजरातमधील ३, तेलंगणामधील ५, राजस्थान १, मध्यप्रदेश १, हरियाणा २, झारखंड १ आणि हिमाचल प्रदेश २,कार्यक्रमांचा समावेश आहे.

असे असून सुध्दा काही बाबींवर लक्ष ठेवणे मात्र गरजेचे आहे. प्रामुख्याने शेतकऱ्यांनी दलालांपासून सावध राहायला हवे. शासनाला या दलालांची मक्तेदारी संपवून कृषी मालावर अधिकाधिक पारदर्शीपणा आणायचा आहे.

अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्री पुढे म्हणाले की, ''बाजारांमध्ये सुधारणा घडवून आणण्यात येईल. त्याचप्रमाणे राज्यांनी नाशवंत मालाला कृषीउत्पन्न बाजार समिती तून डिनोटीफाय करायला हवे.'' अर्थमंत्री भविष्याचा वेध घेताना योग्य ते मार्गक्रमण करत असताना आपले विचार प्रकट करत होते. ''शेतकऱ्यांना त्यानी पिकवलेल्या मालाला, योग्य त्या किंमतीमध्ये विकण्याकरिता ही एक संधी असेल '' असे ते म्हणाले.

अर्थसंकल्पामध्ये एकात्मतेचा मंत्र पुन्हा एकदा स्पष्ट करण्यात आला आहे. जे शेतकरी फळे आणि भाज्या पिकवतात त्यांनी कृषीमालावर प्रक्रिया करणाऱ्या कारखान्यांजवळ उत्पादन करावे. जेणे करुन किंमतीत तूट येणार नाही. त्याचप्रमाणे आदींवरचा खर्चही वाचू शकेल असे त्यामध्ये स्पष्ट करण्यात आले.

शेतकऱ्यांकरिता शासनाने घोषणा केली आहे की, नाबार्डतर्फे 'सूक्ष्म सिंचन निधी' स्थापना केली जाईल.

'सूक्ष्म सिंचन - भरघोस उत्पादन' हे मिशन राबवले जाईल. याकरिता शासनाने ५००० कोटींच्या शाश्वत निधीची स्थापना केली आहे. त्याचप्रमाणे

दुग्धव्यवसायाच्या मुलभूत विकासासाठी ८०० कोटींचा निधी नाबार्ड स्थापन करत आहे. गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक आदी राज्यांनी दुग्धव्यवसायात लक्षणीय प्रगती केली आहे.

जे शेतकरी मुदतीआधी कर्जफेड करतील अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्याकरिता ३% इतकी अतिरिक्त रक्कम अनुदान म्हणून दिली जाणार आहे.

येत्या आर्थिक वर्षात कृषी विभाग ४.१% इतका विकास गाठू शकेल असा विश्वास अर्थमंत्र्यानी व्यक्त केला आहे. येथे एक गोष्ट नमूद करायला हवी की, दोन्ही खरीप (पावसाळी) तसेच रब्बी (हिवाळी) लागवडीमध्ये उत्तम वाढ झाली आहे.

बिकट स्थितीतील शेतकऱ्यांना मदत करण्याच्या दृष्टीने शासन गंभीर आहे. हे जाणवते ते शासनाने उचललेल्या एका महत्वपूर्ण पावलाद्वारे म्हणजे '' प्रधानमंत्री पीक विमा योजने'' द्वारे. ही योजना गतवर्षी सुरु झाली. या करिता अर्थसंकल्पीय तरतूद होती ५५०० कोटी रुपये . या आर्थिक वर्षात ही तरतूद १३२४० कोटी रुपये. यात नोंद घेण्यासारखे असे आहे, की यातील ९००० कोटी रुपये राखून ठेवले आहेत. पीकव्याप्त क्षेत्राचा विचार करता २०१६-१७ मध्ये ३०%, २०१७-१८ मध्ये ४०% तर २०१८-१९ मध्ये ५०% इतकी तरतूद केली गेली आहे.

शासनाच्या या पीकविमायोजनेच्या निर्णयाचे स्वागत सर्वच स्तरावर , संसदेमध्ये तसेच संसदेबाहेर देखील केले गेले. राजकीय स्तरावरही याची नोंद घेण्यात आली.

या वर्षीच्या अर्थसंकल्पातील अजून एक नोंद घेण्यासाठी योजना म्हणजे ''प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना''. ही योजना सिंचनाचा कार्यक्रम राबवते.

जमीन सुधारणासाठी - जमिनीचे आरोग्यकार्ड. ही एक शासनाची नाविन्यपूर्ण कल्पना असून अर्थमंत्र्यानी आपल्या अर्थसंकल्पीय तरतूदींबद्दल असे म्हटले आहे की, शेतकऱ्यांना त्याच्या कष्टाचे फळ तेव्हाच मिळेल जेव्हा लवकरात लवकर ते आपल्या जमिनीची आरोग्य तपासणी करुन जमिनीची मूलभूत द्रव्यांची माहिती करुन घेतील. त्यांचे प्रमाण समजून घेतील.

---

***बिकट स्थितीतील शेतकऱ्यांना मदत करण्याच्या दृष्टीने शासन गंभीर आहे. हे जाणवते ते शासनाने उचललेल्या एका महत्वपूर्ण पावलाद्वारे म्हणजे '' प्रधानमंत्री पीक विमा योजने'' द्वारे. ही योजना गतवर्षी सुरु झाली. या करिता अर्थसंकल्पीय तरतूद होती ५५०० कोटी रुपये . या आर्थिक वर्षात ही तरतूद १३२४० कोटी रुपये. यात नोंद घेण्यासारखे असे आहे, की यातील ९००० कोटी रुपये राखून ठेवले आहेत.***

---

या करिता शासन, कृषीविज्ञान केंद्राच्या माध्यमातून १००% सहभाग मिळवण्याकरिता छोट्या छोट्या प्रयोगशाळा उभारण्याचा प्रयत्न करत आहे. ६४८ विज्ञान केंद्रावर स्थानिक पदवीधर उद्योजकाच्या मदतीने १००० छोट्या प्रयोगशाळा निर्माण करता येणार आहेत.

नाबार्डच्या माध्यमातून दीर्घ कालावधी करिता 'सिंचन निधी' यापूर्वीच उभारण्यात आला आहे.

केंद्रीय कृषी मंत्रालयातील अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार ग्रामीण भारतातील पायाभूत सुविधा आणि विकासाकडे एका वेगळ्या दृष्टीनेही पाहता येईल. पावसाळ्यातील पाण्याला कायदेशीररित्या तळ्यामध्ये साठवून सिंचनासाठी त्यातही अवर्षणग्रस्त भागात वापर करण्यालाही विकास म्हणता येईल. यासाठी अनेक राज्यांनी तसे कायदेच दोन्ही शहरी व ग्रामीण भागांसाठी तयार केले असून अस्तित्वातील पाणी पुरवठ्याला ते पोषक ठरतील. सन २०१४ मध्ये 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना' सुरु झाली असून विद्यमान सरकार योग्य दिशेने जोरदार मार्गक्रमण करत आहे.

सन २०१६-१७ च्या आर्थिक वर्षात मांडल्या गेलेल्या अर्थसंकल्पामध्ये शासनाने कृषी आणि अ-कृषी विभागात सन २०२२ पर्यंत शेतक-यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा मनोदय आणि निर्धार व्यक्त केला आहे.

फक्त बोलघेवडेपणा करुन आपण ग्रामीण विकास साधणार आहोत का? त्यासाठी आपल्याला ग्रामीण भागात अधिकाधिक खर्च करावाच लागेल. २०१४ पासूनच्या अर्थसंकल्पीय तरतूदीबद्दल अर्थमंत्र्यांनी यावर स्पष्ट भाष्य केले आहे.

ग्रामीण विभागात अधिकाधिक खर्च करा असे मंत्रीमहोदय म्हणतात. पायाभूत विकास, ग्रामीण रस्ते उभारणी, ग्रामीण विद्युत उभारणी आदीबद्दल बोलताना गरिबीकडेही त्यांनी लक्ष वेधले. योग्य ती टिप्पणी करताना ते म्हणाले, मी आर्थिक सुधारणांचा वेग कायम ठेवीन, गुंतवणुकीला अधिक प्रोत्साहन देईन, विकासाला अधिक गती देईन.''

देशातील ग्रामीण क्षेत्रावर दर साल ३ लाख कोटी रुपये खर्च केले जातात. याबाबत शासनामध्ये स्पष्टता

आहे. लोकांना या कामी विश्वासात घेत असताना, शासनाचा भर हा उत्तरदायित्व, फलनिष्पत्ती आणि व्याप्तीवर आहे. एक कोटी दारिद्र्यरेषेखालील जनतेला सन २०१९ पर्यंत गरीबीमुक्त करण्याचा इरादा पूर्ण होईलच.

गांधीजींना ग्रामीण भारताचा चेहरा बदलवायचा होता. हा योग म. गांधीजींच्या १५० व्या जयंती निमित्ताने जुळवून आणला आहे. म. गांधींना खेड्यांबद्दल आत्मियता होती. हे 'गांधी-दर्शन' मधून पाहावयास मिळते. त्यांची दूरदृष्टी यातून पाहावयास मिळते.

स्त्रोतांचा परिणामकारक वापर करण्याचा त्यातील वार्षिक वाढीचा विचार करण्याचा शासनाचा मानस आहे. हा विचार हलाखीचे जीवन जगणाऱ्या लोकांसाठी शाश्वत आणि सुस्थितीत ठेवण्यासाठी सूक्ष्म पातळीवर नियोजन करण्यासाठी उपयोगी पडेल. अर्थमंत्री म्हणतात की, गरीबी मुक्त ग्रामपंचायतींना दिलेल्या निर्देशांकाच्या आधारे ही प्रगती जोखली जाईल व त्यावर लक्ष ठेवले जाईल.

बहुचर्चित अशा ग्रामीण रोजगार योजने(महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना) बद्दल अर्थमंत्री म्हणाले, ''शासन सातत्याने याबद्दल प्रयत्नशील असून नवीन स्वरुपात ही योजना आणून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुपटीने वाढविण्याच्या दृष्टीनेही याचा उपयोग होईल. १०० दिवस प्रतिकुटुंब प्रतिवर्ष रोजगार पुरवण्याच्या कार्यक्रमाबरोबरच मनरेगाकडून उत्पादित मालमत्तेच्या निर्मितीची अपेक्षा असून कृषीवाढ होईल आणि उत्पन्नातही भर पडेल.

गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये ५ लाख शेततळी आणि १० लाख सेंद्रीय खतांसाठी खर्च करण्याची घोषणा केली होती. मनरेगाच्या माध्यमातून यासाठी निधी उपलब्ध केला गेला होता. प्रत्यक्षात या ५ लाख शेततळ्यांऐवजी १० लाख शेततळी मार्च २०१७ अखेर पुर्णत्वास जातील अशी शक्यता आहे. वर्ष २०१७-१८ साठी पुन्हा ५ लाख शेत तळयांचे उद्दीष्ट्य ठरवण्यात आले आहे. हा एक माप दंडाचा विचार केला तर ग्रामपंचायतीना दुष्काळ निवारण्याच्या कामी किती मदत होऊ शकते याची कल्पना येईल.

---

***ग्रामीण भारतातील लोकांना आणि कृषीआधारित समाजाला मदत करताना ''सबका साथ-सबका विकास'' या घोषवाक्याची साक्ष पटते. २०१७-१८ या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये अर्थमंत्र्यांनी मुली आणि महिलांप्रती आदर व्यक्त केला आहे. 'महिला शक्ती केंद्र'- ही ग्रामीण पातळीवर प्रत्येक अंगणवाडी येथे सुरु केलेली नवी योजना आहे. या करिता १४ लाख अंगणवाड्यांसाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.***

---

गेल्यावर्षीच्या तुलनेत मनरेगाच्या कार्यक्रमातील महिलांचा सहभाग ४८% वरुन ५५% पर्यंत गेला आहे.

अर्थमंत्र्यांनी मनरेगाच्या संदर्भात कागदपत्रे स्पष्ट करताना, अर्थसंकल्पीय तरतूदी सांगितल्या. सन २०१६-१७ ला ३८५०० कोटींची तरतूद ४८०००कोटीपर्यंत गेली आहे. अर्थमंत्री म्हणाले'' ही आतापर्यंतची सर्वोच्च रक्कम राखून ठेवली आहे.''

संगणकीय माध्यमातून सारी माहिती जनतेच्या पटलावर मांडल्यामुळे यामध्ये पारदर्शीपणा आला आहे.

ग्रामीण भारतातील लोक आणि कृषी क्षेत्रात काम करणाऱ्यांबरोबर राहून, शासन त्यांचे जीवनमान व परिस्थिती सुधारण्यासाठी कटीबध्द असल्याचे अर्थ मंत्र्यांनी सांगितले आहे. आपली महत्वाकांक्षा स्पष्ट करताना 'हा एक अलिखित करार' असल्याचे ते म्हणाले.

शासनाने सुरु केलेल्या जुन्या तसेच नवीन कार्यक्रमांची सांगड घालताना या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये ग्रामीण भारतातील लोकांसाठी 'कौशल्य' कार्यक्रमासंदर्भात भाष्य केले आहे. यासंबंधी धोरणात्मक कार्यक्रमही आखला गेला आहे.

याचा एक भाग म्हणून सन २०२२ पर्यंत ५ लाख ग्रामीण युवकांना गवंडी कामाचे प्रशिक्षण देण्यात येणार असून यावर्षी २०१७-१८ या वर्षात किमान २०००० युवक प्रशिक्षीत केले जातील.

विकास कामांचे कार्यक्रम राबविताना पंचायतराज सारख्या संस्थांमध्ये प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची वानवा असणे हा अडथळा आहे. हा अडथळा दूर करण्यासाठी 'मनुष्यबळविकास कार्यक्रम' हा कार्यक्रम २०१७-१८ या काळात राबवला जाईल.

ग्रामीण भारतातील लोकांना आणि कृषीआधारित समाजाला मदत करताना ''सबका साथ-सबका विकास'' या घोषवाक्याची साक्ष पटते. २०१७-१८ या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये अर्थमंत्र्यांनी मुली आणि महिलांप्रती आदर व्यक्त केला आहे.'महिला शक्ती केंद्र'- ही ग्रामीण पातळीवर प्रत्येक अंगणवाडी येथे सुरु केलेली नवी योजना आहे. या करिता १४ लाख अंगणवाड्यांसाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या महिला शक्ती केंद्राद्वारे - महिला सबलीकरणाचा प्रयत्न करुन, ग्रामीण

महिलांसाठी संधी, कौशल्य विकास कार्यक्रम, रोजगार संगणकीय साक्षरता, आरोग्य आणि आहार आदींवर भर दिला जाणार आहे.

पंतप्रधानांनी ३१ डिसेंबर २०१६ रोजी गर्भवती महिलांना आर्थिक सहाय्याच्या राष्ट्रीय पातळी वरील कार्यक्रमाचा शुभारंभ केला. या कार्यक्रमांतर्गत गर्भवती महिलांच्या खात्यात रु.६००० जमा केले जातील. महिलांची प्रसूती ही शासनमान्य रुग्णालयात करावी लागेल. त्याचबरोबर बाळांचे लसीकरणही करण्यात येईल. ग्रामीण महिलांना याचा फायदा होईल.

या योजना सोडून आणखी एका योजनेचा उल्लेख आपल्याला करावा लागेल तो म्हणजे - प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY). याचा उद्देश्य देशातील ग्रामीण भारताला शहरांच्या दिशेने जोडणे होय. राज्यांच्या साहाय्याने केंद्राचा प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचा भांडवली खर्च आहे २७०००कोटी रुपये. अर्थमंत्र्यांच्या म्हणण्याप्रमाणे २०११-१४ या काळात प्रतिदिनी ७३ किमी इतकी रस्ते बांधणी होत होती. आता सन २०१६-१७ मध्ये ती १३३ किमी प्रतिदिनी इतकी आहे. रस्ते बांधणीच्या बरोबरीने गृहनिर्माण हा ही महत्वाचा विषय आहे. प्रधानमंत्री आवास योजनेसाठी २०१७-१८करिताच्या निधीत ४४% वाढ करुन २३०००कोटी राखून ठेवले आहेत. यातून १ कोटी घरे बांधणीचा शासनाचा मानस आहे. याच्या जोडीला पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना आहे - हा कार्यक्रम ग्रामीण विद्युतीकरणाकरिता राबवला जातो. त्यामध्ये गतवर्षीच्या तुलनेत ४३% वाढ करुन सन २०१७ - १८ करिता ४८१४ कोटी इतकी तरतूद केली आहे.

**समारोप-**

हे समजण्यासारखे आहे की, पायाभूत सुविधांना उभारी देणे तसेच भारतीय कृषकांना मदत देणे या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या बाबी आहेत.

कृषीविकासाच्या दृष्टीने, ग्रामीण भारतातील पायाभूत विकास योजना योग्य दिशेने तसेच जोरकसपणे राबविल्या जात आहेत. त्या दृष्टीने पावले टाकली जात आहेत. यापूर्वी असे घडताना दिसत नव्हते. घेल्या दोन अडीच वर्षात गावागावामध्ये रोजगार निर्मितीचे प्रयत्न चालू आहेत. प्रत्येक कुटुंबाला काम मिळेल हे पाहिले जात आहे.कृषी विकास साधला जात आहे. कृषी इतर बाबींचा विचार केला जात आहे. ग्रामीण भाग आनंदात राहावा त्यांची भरभराट व्हावी, असा प्रयत्न केला जात आहे.

सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पामध्ये एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की, शासनाच्या प्राधान्यक्रमामध्ये ग्रामीण विद्युतीकरण हे अत्युच्च पातळीवर आहे. राजीव गांधी ग्राम्य विद्युतीकरण योजनेमध्ये प्रयत्न केले गेले परंतु अनेक ग्रामीण भारतात वीज पोहोचलीच नाही. या संदर्भात बोलताना ऊर्जामंत्री दि. ९ फेब्रुवारी २०१७ला प्रश्नोत्तर तासामध्ये म्हणाले की, २९ पैकी २८ राज्यांनी केंद्राच्या प्रकल्पात सहभागी होऊन १००% ग्रामीण विद्युत करण्यास मान्यता दिली आहे.

ग्रामीण विद्युतीकरणाला व्यापक प्रमाणात शासन प्राधान्य देत आहे. सन २०१४-१५ मध्ये ग्रामविकास मंत्रालयाने मल:निस्सारण प्रकल्पावर प्रक्रिया करुन त्याद्वारा जलविद्युत निर्मिती करण्याच्या योजनेला मान्यता दिली असून दिल्ली येथे तसा प्रकल्प सुरु केला आहे.

शासन ऊर्जा निर्मितीच्या दिशेने प्रयत्न करताना सौरउर्जेचा वापर व्यापक प्रमाणात करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

**अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये**

- ✔ कृषी पतपुरवठा १० लाख कोटी इतक्या उच्चांकी पातळीवर असणे
- ✔ कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून शासन लहान प्रयोगशाळेच्या तर्फे जमीन आरोग्य सुधारणा कार्ड विस्तारीकरण करणार आहे.
- ✔ दीर्घकालीन सिंचन निधीची सुमारे ४००००कोटींचा निधी नाबार्ड च्या साहाय्याने उभारणार
- ✔ 'करार शेती' विषयक आधुनिक कायदा- सर्व राज्यांना माहिती करता पाठवला जाणार आहे.
- ✔ ८००० कोटींचा 'दुग्ध विकास निधी' स्थापला जाणार आहे.
- ✔ 'अंत्योदय' योजना दारिद्र्य रेषेवरील १ कोटी कुटुंबांपर्यंत पोहोचवली जाणार आहे.
- ✔ म. गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेसाठी (मनरेगा) ४८००० कोटी राखीव ठेवण्यात आले
- ✔ राज्यांच्या साहाय्याने प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेसाठी १९००० कोटी राखीव ठेवले असून राज्ये २७००० कोटी खर्च करणार आहेत.
- ✔ प्रधानमंत्री आवास योजनेसाठी २३००० कोटी राखीव आहेत.
- ✔ मे २०१८ पर्यंत ग्रामीण विद्युतीकरण पूर्ण केले जाणार आहे.

■■■

*लेखक नवी दिल्लीस्थित वरिष्ठ पत्रकार आहेत. ग्रामीण विकास व कृषी अर्थ शास्त्राचे अभ्यासक आहेत.*

e-mail: nirender1@gmail.com

# केंद्रीय अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राला जोरदार प्रोत्साहन

लक्ष्मी जोशी आणि व्ही.पी. आहुजा



***कृषी क्षेत्राच्या वाढीचा 2 टक्के इतका घटलेला दर आता 4.1 टक्के इतकी मोठी वाढ नोंदवेल, असे अनुमान आहे. कृषी क्षेत्रातील बाजारपेठ सुधारणांना अर्थसंकल्पात गती देण्यात आली असून पीक विमा योजनेचा निधी वाढवण्याबरोबरच कृषी कर्जाचे उच्च उद्दिष्ट राखण्यात आले आहे. जास्तीत जास्त पाटबंधारे योजनांचा लाभ होण्यासाठी योजनेची अंमलबजावणी करणे आणि दुग्धोत्पादन क्षेत्राचा विकास यांची जबाबदारी सर्वोच्च ग्रामीण बँक म्हणजे राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेकडे (नाबार्ड) सोपवण्यात आली आहे.***

यंदाच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठी अनेक घोषणा करण्यात आल्या आहेत. सर्व उपाय एकत्रित केल्यास या सर्व उपाययोजनांमध्ये भारतीय शेतकऱ्यांना दिलासा देण्याची तसेच उपभोगाला प्रोत्साहन देऊन कृषी व संलग्न क्षेत्रांच्या वाढीला जोरदार गती देण्याची क्षमता आहे.

चालू अर्थसंकल्पात फलोत्पादन आणि दुग्धोत्पादन यासारख्या आंतरसंलग्न क्षेत्रांसाठी महत्वपूर्ण प्रमाणात तरतूद वाढवून लक्षणीय प्रोत्साहन दिले असून भविष्यात त्याचे अटळपणे चांगले उल्लेखनीय परिणाम घडणार आहेत. २०१५-१६ मध्ये दुष्काळामुळे कृषी क्षेत्राच्या वाढीचा २ टक्के इतका घटलेला दर आता ४.१ टक्के इतकी मोठी वाढ नोंदवेल, असे अनुमान आहे. कृषी क्षेत्रातील बाजारपेठ सुधारणांना अर्थसंकल्पात गती देण्यात आली असून पीक विमा योजनेचा निधी वाढवण्याबरोबरच कृषी कर्जाचे उच्च उद्दिष्ट राखण्यात आले आहे. जास्तीत जास्त पाटबंधारे योजनांचा लाभ होण्यासाठी योजनेची अंमलबजावणी करणे आणि दुग्धोत्पादन क्षेत्राचा विकास यांची जबाबदारी सर्वोच्च ग्रामीण बँक म्हणजे राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेकडे (नाबार्ड) सोपवण्यात आली आहे.

कृषी क्षेत्राच्या विकासाला गती देण्यासाठी २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात कर्ज विभागाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये १० लाख कोटी रुपये कर्जाचे उद्दिष्ट असून ही वाढ अत्यंत लक्षणीय म्हणजे १ लाख कोटी रुपये इतकी आहे. ही अत्यंत स्वागतार्ह तरतूद असून यामुळे कृषी क्षेत्रातील कर्ज मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.

येत्या पाच वर्षांत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या निर्धाराने गेल्या दोन वर्षांत सरकारने अनेक पुढाकार जाहीर केले आहेत. या योजनांमध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (पीएमकेएसवाय), प्रधानमंत्री पीक विमा योजना (पीएमएफबीवाय) तसेच शेतमालाची इलेक्ट्रॉनिक व्यासपीठावरून विक्री करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या राष्ट्रीय कृषी बाजारपेठ (ई-नाम) यांचा समावेश आहे. देशात निव्वळ लागवडीखालील असलेल्या १४ कोटी १० लाख हेक्टर क्षेत्रापैकी ५४ टक्के क्षेत्रावर पाटबंधारेसाठी आवश्यक पायाभूत सुविधा नसल्याने केंद्रीय अर्थसंकल्प २०१७-१८ मध्ये नाबार्डला समर्पित सूक्ष्म पाटबंधारेसाठी ५,००० कोटी रुपयांचा निधी पुरवण्याचा प्रस्तावही स्वागतार्ह आहे.

राष्ट्रीय कृषी बाजारपेठेचा (ई-नाम) विस्तार सध्याच्या २५० कृषी उत्पन्न बाजार समित्यांपासून आणखी ५८५ एपीएमसीपर्यंत करण्यात येणार असून स्वच्छता, , ग्रेडिंग आणि पॅकेज सुविधांसाठी प्रत्येक ई-नाम बाजारपेठेसाठी ७५ लाख रुपयांचे अर्थसहाय्य केले जाणार आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालासाठी मूल्यवर्धन (value addition) करण्यास प्रोत्साहन मिळून या निर्णयाचा फायदा होणार आहे.

कंत्राटी शेतीसाठी एक आदर्श कायदा तयार करुन राज्यांमध्ये त्याचे परिपत्रक वितरित करण्याचे वचनही अर्थसंकल्पात दिले असून फळे व भाजीपाला पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना कृषी प्रक्रिया केंद्रांशी एकात्मिक केले जाणार आहे,ज्यामुळे त्यांच्या मालाला अधिक चांगली किंमत मिळू शकेल आणि हंगामानंतरचे शेतकऱ्याचे नुकसान कमी होऊ शकेल. शेतकऱ्यांना दलालांच्या तावडीतून सोडवण्यासाठी राज्यांना नाशवंत माल एपीएमसीत दाखल करण्याच्या सक्तीतून वगळण्याचे निर्देश देण्यात आले असून शेतकऱ्यांना आपला माल स्वतंत्रपणे थेट विकण्यास परवानगी देण्यात आली आहे.

२०१६च्या खरीप हंगामापासून सुरू करण्यात आलेल्या पीएमएफबीवाय योजनेची पहिल्या हंगामाच्या अर्ध्यातच प्रभावी प्रगती झाली आहे. या योजनेद्वारे ३६६ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना (एकूण शेतकऱ्यांच्या २६.५० टक्के) विमा कवच पुरवण्यात आले असून २०१६-१७ मध्ये खरीप व रब्बी दोन्ही हंगामांसाठी ३० टक्के विमा कवच पुरवण्याचे उद्दिष्ट साध्य केले जाईल, अशी अपेक्षा आहे. पीएमएफबीवाय या अत्यंत महत्वाच्या पीक विमा योजनेसाठी २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात असलेली ५,५०० कोटी रुपयांची तरतूद लक्षणीय रित्या वाढवून २०१७-१८ मध्ये ती ९,००० कोटी रुपये केली आहे. अर्थसंकल्पीय २०१७-१८ या वर्षात पीक लागवडीखालील क्षेत्राच्या ४० टक्के क्षेत्र पीक विमा योजनेच्या अंतर्गत आणण्याचे आणि २०१८-१९ मध्ये ते ५० टक्क्यांवर नेण्याचे लक्ष्य ठरवण्यात आले आहे.

देशभरात माती परीक्षणासाठी ६४८ कृषी विज्ञान केंद्रे स्थापन करून २०१५ मध्ये सुरू करण्यात आलेल्या मृदृ आरोग्य कार्ड योजना आणखी बळकट करण्यात येणार आहे. याशिवाय स्थानिक पात्र व्यावसायिकांकडून सरकारी सहाय्याने १००० छोट्या प्रयोगशाळा सुरू केल्या जातील.

केंद्र व राज्य सरकारांकडून सध्या कृषी व अन्नधान्य क्षेत्रावर वेगवेगळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर लावण्यात येत असल्याच्या पार्श्वभूमीवर नुकत्याच मंजूर करण्यात आलेल्या वस्तु व सेवा कर (जीएसटी) कायद्याचे प्रमुख परिणाम कृषी क्षेत्रावर होण्याची शक्यता आहे.

शेतमालाला अधिक चांगला भाव मिळावा आणि हंगामोत्तर नुकसान कमी करण्यासाठी सरकार फळे व भाजीपाला उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना कृषी प्रक्रिया केंद्रांशी एकात्म करण्याची योजना आखत आहे. सरकारे अगोदरच २५० मंडी (बाजार) इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषी बाजारपेठांशी (ई-नाम) एकात्मिक केल्या असून ४२१ कोटी रुपयांच्या फळे व भाजीपाल्याचा व्यापार त्याद्वारे केला आहे. अधिकाधिक शेतकऱ्यांना ई-नाम व्यासपीठाचा फायदा घेण्यास प्रोत्साहन देण्यासाठी ई-नामवरील वस्तुंच्या भावाबद्दल माहिती देणारे मोबाईल ॲप सुरू करण्यात आले आहे. ई-नाम व्यासपीठावर व्यापार करण्यासाठी ६९ प्रकारची फळे व भाजीपाला अधिसूचित करण्यात आला आहे. मंडयांचे ई-व्यासपीठावर एकात्मीकरण केल्याने शेतकऱ्यांना आपले उत्पन्न वाढवण्यास सहाय्य होणार आहे.

नाबार्डच्या माध्यमातून उभारण्यात यावयाच्या दुग्धोत्पादन आणि पायाभूत विकास निधीसाठी २,००० कोटी रुपये देण्यात आले आहेत. दूध आणि पशुपालनातून शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नही मिळणार असून दुग्धोत्पादनासाठी समर्पित निधी स्थापन करण्याच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या उपजीविकेत परिवर्तन घडून येणार आहे. तसेच देशातील एकूण कृषी उत्पादनातील दूध आणि प्रक्रिया केलेल्या दुग्धजन्य पदार्थांचे योगदानही वाढणार आहे. पिशवीबंद दूध आणि इतर दुग्धोत्पादनांच्या वाढत्या मागणीनुसार दूध सहकारी संघ आणि इतर दुग्धोत्पादन कंपन्यांनी दूध व दुग्धजन्य पदार्थांचे संकलन व विक्रीसाठी साठवणुकीच्या सुविधांमध्ये गुंतवणूक वाढवली आहे. दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या मागणीतील वाढीचा कल कायम राहण्याची अपेक्षा असून अल्प व मध्यम मुदतीत या क्षेत्राला मजबूत वाढीचा अनुभव येत आहे.

■■■

*(लक्ष्मी जोशी आणि व्ही. पी. आहुजा हे एनसीएईआरमध्ये सहयोगी फेलो आणि सल्लागार आहेत.)*

e-mail: ljoshi@ncaer.org

# तरुणांसाठीचा अर्थसंकल्प

डॉ एस एस मंथा



***सध्या आपण 2020 कडे वाटचाल करत आहोत, त्यामुळे एकूणच या आकडेवारीकडे पाहता खरंच आपण यासाठी तयार आहोत का, या समस्येची तीव्रता आपल्या लक्षात आली आहे का ? असा प्रश्न निर्माण होतो. एवढ्या मोठ्या लोकसंख्येला शिक्षण, कौशल्य, रोजगार यासाठी एक नियोजित आराखडा पाहिजे, एक ठाम दृष्टीकोन असला पाहिजे. जो आपणास नूकत्याच जाहीर झालेल्या 2017 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात दिसून येतो.***

संयुक्त राष्ट्रसंघाने २०१६ मध्ये जागतिक लोकसंख्याशास्त्राविषयी एक अहवाल प्रकाशित केला होता, त्यात म्हटले होते की भारताची लोकसंख्या १.३ अब्ज आहे, म्हणजे जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा दुसऱ्या क्रमाकांचा देश आहे. भारताच्या लोकसंख्यावृद्धीचा दर १.२% आहे, त्यानूसार २०२२ पर्यंत भारत चीनला मागे टाकून सर्वाधिक लोकसंख्येचा पहिलाच मोठा लोकशाही देश ठरू शकतो. सध्या भारताच्या लोकसंख्येपैकी ६०% लोकसंख्या ३५ वर्षे वयोगटातील आहे, तिचे सरासरी वयोमान २०२० पर्यंत २९ वर्षे होईल जे की चीन सरासरी वयोमान ३७ आणि जपान सरासरी वयोमान ४८ यांच्या तुलनेत तरुण असेल.

सध्या आपण २०२० कडे वाटचाल करत आहोत, त्यामुळे एकूणच या आकडेवारीकडे पाहता खरंच आपण यासाठी तयार आहोत का, या समस्येची तीव्रता आपल्या लक्षात आली आहे का ? असा प्रश्न निर्माण होतो. एवढ्या मोठ्या लोकसंख्येला शिक्षण, कौशल्य, रोजगार यासाठी एक नियोजित आराखडा पाहिजे, एक ठाम दृष्टीकोन असला पाहिजे. जो आपणास नूकत्याच जाहीर झालेल्या २०१७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात दिसून येतो.

परिवर्तनशील, उत्साहवर्धक आणि स्वच्छ भारत (TEC India)', हे अगदी समर्पक नाव केंद्रीय अर्थसंकल्पाला दिले आहे. यातून गुणवत्तेच्या माध्यमातून शासन आणि जीवनाचा दर्जा सुधारणे हा उद्देश आहे. म्हणूनच यात ग्रामीण लोकसंख्या, पायाभूत सुविधांची उभारणी, रोजगारासाठीच्या योजना, सुरक्षा, परवडणारी घरे आणि डिजीटल अर्थव्यवस्था गतीमान करुन अधिक पारदर्शक आणि उत्तरदायी बनवणे यास अग्रक्रम देण्यात आला आहे.

ऊरुग्वेचा कादंबरीकार, एदुआर्द गॅलिनोने म्हटले आहे, माझा उदारपणावर (चॅरिटी) विश्वास नाही, माझा विश्वास दृढ ऐक्यावर (सॉलिरिडीटी) आहे. चॅरिटी ही लंबरेषेप्रमाणे आहे, ती अपमानजनक आहे. ती वर पासून खाली येते. दृढ ऐक्य (सॉलिरीडीटी) हे आडव्या रेषेप्रमाणे आहे. ती प्रत्येकाचा सन्मान करते आणि प्रत्येकापासून काही ना काही शिकते. मलासुद्धा इतर लोकांकडून शिकण्यासारखे खूप आहे.

सध्या ग्रामीण भारताच्या तीन प्रमुख समस्या आहेत- मर्यादीत संधी, स्रोतांची कमतरता आणि दूरहून घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी. अशावेळी, सर्वात महत्वाचे आहे ते शिक्षण. गॅलिनोच्या म्हणण्याला दुजोरा देत अमेरिकन लेखक एल्विन टॉफलर म्हणतो की, आजच्या तरुणांसाठी एक गुप्त संदेश आहे तो म्हणजे समाजाला त्यांची आवश्यकता नाही जोपर्यंत ते भविष्यात सत्ता हाती घेत नाही तोपर्यंत. वास्तव असे आहे की, समाज हा उत्साह, बुद्धिमत्ता, नवकल्पना आणि प्रतिभा यांच्याशिवाय वाटचाल करुच शकत नाही. म्हणून समाजात तरुणांची भूमिका तेवढीच महत्त्वाची आहे.

शिक्षणाची फार महत्त्वाची भूमिका आहे. त्यामुळे मनाचे स्वातंत्र्य आणि संवेदनशीलता जागृत होते. जी लोकशाहीच्या समाजवाद आणि धर्मनिरपेक्षतेशी निगडीत आहे. सरकारची ही भूमिका २०१० च्या शिक्षणाचा अधिकार यामध्ये दिसून येते.

तथापी, विकासाला बाधा आणणारे अनेक घटक दिसून येतात. त्यापैकी एक म्हणजे पायाभूत सुविधांचा अपूरा विकास. खेड्यांमध्ये चांगले शिक्षक, चांगल्या दर्जाचे सामान याची कमतरता दिसून येते त्यामुळे दारिद्रय, बाल कामगार, शाळा सोडणाऱ्यांचे वाढते प्रमाण, निरक्षरता या प्राथमिक समस्या दिसून येतात. यावर मात करण्यासाठी नवीन तंत्राचा वापर हाच उपाय आहे.

डिजीटल तंत्रज्ञानामुळे अगदी काही क्षणात छोटी तांदळाची शेतीसुद्धा वर्गखोलीत रुपांतरित केली जाऊ शकते. पूर्वीच्या काळी कुटुंबांपासून दूर राहून शिकण्यासाठी गुरुकूल पद्धती अस्तित्वात होती. सध्या आपल्याला डिजीटल गुरूकूल सुरू करता येईल. अशाप्रकारच्या नव्या पद्धतीमध्ये मुलंही अगदी व्यवस्थित शिकून आपल्या कुटुंबाला मदत करु शकतील. त्यामुळे कमी वयातच जबाबदारीची जाणीव निर्माण होईल. यासाठी गावागावांमध्ये वाय-फाय बेल्टसचा वापर करुन टेलिविजन, रेडिओ आणि संगणकाच्या माध्यमातून शिक्षण देता येईल. प्राथमिक शाळांमध्ये नावनोंदणीचे सरासरी प्रमाण ९५ आहे, त्यामध्ये आपणास बरीच सुधारणा करता येईल.

***तथापी, विकासाला बाधा आणणारे अनेक घटक दिसून येतात. त्यापैकी एक म्हणजे पायाभूत सुविधांचा अपूरा विकास. खेड्यांमध्ये चांगले शिक्षक, चांगल्या दर्जाचे सामान याची कमतरता दिसून येते त्यामुळे दारिद्रय, बाल कामगार, शाळा सोडणाऱ्यांचे वाढते प्रमाण, निरक्षरता या प्राथमिक समस्या दिसून येतात. यावर मात करण्यासाठी नवीन तंत्राचा वापर हाच उपाय आहे.***

यंदाच्या अर्थसंकल्पात उच्च शिक्षणासाठी नावीन्यपूर्ण निधी (Innovation Fund for Secondary Education) ही संकल्पना सुरू केली आहे. या माध्यमातून स्थानिक प्रतिभेला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. ही योजना देशभरातील ३४७९ मागास जिल्ह्यांमध्ये राबवली जाणार आहे.

विद्यापीठांतून उच्च शिक्षण आणि पदवीका प्रदान करण्याचे कार्य केले जाते. शिक्षणाविषयीचा उत्साह, वादविवाद आणि उत्तरं जाणून घेण्याची प्रक्रिया हे कळीचे मुद्दे आहेत. शिक्षणासाठी अनुकूल वातावरण अतिशय मेहनतीने निर्माण करावे लागते. मोकळे वातावरण, विविध विषयांतील तज्ज्ञांशी सुसंवाद हा कला शाखेपासून ते सामाजिक शास्त्र तसेच मूलभूत विज्ञान, अप्लाईड सायन्स यासाठी अतिशय महत्त्वाचा आहे.

तथापी, भारतात विद्यापीठाची निर्मिती ही विस्तार झालेल्या शहरांना सामावून घेण्यासाठी केली जाते. अपूरा निधी, पायाभूत सुविधांची कमतरता यामुळे शिक्षणाची गुणत्ता राखली जात नाही. तसेच केवळ परीक्षा घेणे आणि निकाल घोषीत करणे यावरच पूर्ण लक्ष केंद्रीत असल्यामुळे साधन आणि मनुष्यबळ या स्रोतांकडे दुर्लक्ष होते.

अशाप्रकारची कोंडी सोडवण्यासाठी संस्थांना स्वायत्तता देणे हा एक मार्ग आहे. ज्या नेत्यांवर लोकांचा विश्वास आहे, त्यांनी शैक्षणिक वातावरण पुनर्संचयित करुन विद्यापीठ प्रशासन आणि शैक्षणिक विभाग अशी कार्यविभागणी केली पाहिजे.

सध्या आभासी शिक्षणाच्या (व्हर्च्युअल लर्निंग) माध्यमातून ऑनलाईन आणि ऑफलाईन प्रकारातून माहितीची देवाण-घेवाण केली जाऊ शकते. सरकारने स्वंयम् (SWAYAM) या पद्धतीतून ३५० ऑनलाईन अभ्यासक्रम उपलब्ध करुन दिले आहेत. त्यामुळे कोणालाही या माध्यमातून अभ्यास करणे शक्य आहे.

तसेच अर्थसंकल्पात राष्ट्रीय चाचणी संस्था (नॅशनल टेस्टींग एजन्सी) च्या रुपाने एक स्वायत्त आणि स्व-बळावर संस्था स्थापन करुन उच्च शिक्षणातील सर्व प्रकारच्या प्रवेश परीक्षा घेण्याचे काम या संस्थेकडे दिले आहे. यामुळे विद्यार्थी आणि पालकांना वेगवेगळे प्रवेश अर्ज देणे, विविध प्रवेश परीक्षांचे निकाल पाहणे यात वेळ न दवडता एकाच प्लॅटफॉर्मवर ही सुविधा उपलब्ध असणार आहे.

तसेच काही संस्थांची उभारणी फ्रॉनहोफर प्रणालीवर (Fraunhofer Model) आधारीत करण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे त्यास (खासगी-सार्वजनिक भागीदारी) असे ओळखले जाते. अशा संस्थांचे ७०% उत्पन्न हे काही औद्योगिक संस्था आणि विशिष्ट शासकीय प्रकल्पांच्या माध्यमातून मिळवले जाते तर ३०% उत्पन्न हे राज्य आणि केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पातून मिळवले जाऊ शकते.

तसेच भारतात मॅक्स प्लँक सारख्या पायाभूत संस्थांची उभारणी ही केली जाऊ शकते. या संस्थेच्या प्राथमिक अभ्यासानूसार नैसर्गिक, जीवनविषयक आणि सामाजिक शास्त्रांविषयी संशोधन केले जाते. ८३ मॅक्स प्लँक संस्थांच्या माध्यमातून संशोधनावर भर दिला जातो. विद्यापीठांसोबत सहकार्याच्या माध्यमातून अशाप्रकारच्या संस्था कार्यरत असल्यामुळे ज्या बाबी विद्यापीठांकडून साध्य केल्या जाऊ शकत नाही, त्या मॅक्स प्लँकच्या माध्यमातून साध्य केल्या जाऊ शकतात.

आपल्या देशातील तरुणाईला मदत करण्यासाठी शाश्वत पर्यावरणविषयक परिस्थिती निर्माण करण्याची आवश्यकता आहे. विविध रंगाच्या माध्यमातून (तांबारा, निळा, करडा, पांढरा) कार्यशक्तीची विभागणी केली जाऊ शकते.

व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण (व्हीईटी) हा प्रत्येक राष्ट्राच्या शैक्षणिक उपक्रमातील अतिशय महत्त्वाचा भाग आहे. बदलत्या राष्ट्रीय परिस्थितीनूसार भारतात प्रत्येकाला योग्य तो लाभ मिळण्यासाठी सरकारने व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण हे लवचिक, समकालीन, प्रस्तुत, समावेशी आणि सर्जनशील करण्यावर भर दिला आहे.

***व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण (व्हीईटी) हा प्रत्येक राष्ट्राच्या शैक्षणिक उपक्रमातील अतिशय महत्त्वाचा भाग आहे. बदलत्या राष्ट्रीय परिस्थितीनूसार भारतात प्रत्येकाला योग्य तो लाभ मिळण्यासाठी सरकारने व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण हे लवचिक, समकालीन, प्रस्तुत, समावेशी आणि सर्जनशील करण्यावर भर दिला आहे.***

अर्थसंकल्पात प्रधानमंत्री कुशल केंद्राच्या माध्यमातून देशभरातील ६०० जिल्ह्यांवर भर देण्यात आला आहे. यात आगामी काळात १०० भारत आंतरराष्ट्रीय केंद्र (इंडिया इंटरनॅशनल सेंटर्स) संकल्प (SANKALP) च्या माध्यमातून उभारण्यात येणार आहेत. त्यासाठी ४००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या माध्यमातून साडेतीन कोटी युवकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. यासंदर्भातील काही रोचक आकडेवारी

- २०१२ मध्ये, आपल्या देशात ४७४.१ दशलक्ष कामगारांची संख्या होती, जी चीननंतर दुसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक आहे.
- ९४% पेक्षाही अधिक लोकसंख्या असंघटीत क्षेत्रात आहे. यात हाताने छकडा ओढणाऱ्यांपासून ते घरगुती हिरे आणि जडजवाहिर रंगकाम करणाऱ्यांचा समावेश आहे. असंघटीत क्षेत्रांमध्ये कोणत्याही प्रकारची सामाजिक सुरक्षा आणि नफा मिळत नाही.
- संघटीत क्षेत्र म्हणजे शासकीय कर्मचारी, शासन पुरस्कृत उद्योगांमध्ये काम करणारा वर्ग.
- भारताचे ६०% पेक्षाही अधिक मनुष्यबळ स्वयंरोजगार करते, त्यापैकी बहुतांश अतिशय गरीब आहेत.
- सुमारे ३०% कंत्राटी कामगार आहेत तर केवळ १०% नियमित कर्मचारी आहेत ज्यापैकी दोन-पंचमांश हे सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत आहे.
- भारत हा कमी दरडोई उत्पन्न आणि कमी उत्पादकता असणाऱ्या देशांपैकी एक आहे. जपानमध्ये दरडोई उत्पन्न ३०,००० डॉलर्स आहे तर श्रीलंकेत ८७९ डॉलर्स आहे. भारतात केवळ ४३३ डॉलर्स दरडोई उत्पन्न आहे. सध्या भारताचे दरडोई उत्पन्न हे विकसित देशांच्या तुलनेत ७.५% आहे. तज्ज्ञांच्या

मते आगामी पन्नास वर्षात दरडोई उत्पन्नात ८०% नी वाढ झाली पाहिजे.

● आपल्या लोकसंख्येपैकी ५५% लोकसंख्या कृषीशी निगडीत आहे. पण, कृषी क्षेत्राचा सकल राष्ट्रीय उत्पादनातील (जीडीपी) टक्का कमी होत आहे, त्यामुळे ग्रामीण-नागरी समस्या निर्माण होत आहे.

त्यामुळे अशा अवस्थेत 'संकल्प' चे योग्य नियोजन करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच सुक्ष्म व लघु उद्योगांना चालना देण्यासाठी २०१७-१८ साठी २,२०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. वस्त्रोद्योगावर लक्ष केंद्रीत करण्यात येणार असून पर्यटन आणि स्थानिक रोजगारावर भर देण्यासाठी अतुल्य भारत-२, ही मोहीम राबवण्यात येणार आहे.

एका वृत्तपत्रात नुकत्याच प्रकाशित झालेल्या बातमीनूसार, इतर देशांच्या तुलनेत आपले कार्यबळ मागे राहता कामा नये. भारताकडे वयोगट आणि संधी यातील तफावत दूर करण्याची क्षमता आहे. हेच प्रमाण जपानमध्ये ८ दशलक्ष, अमेरिकेत १७ दशलक्ष आहे. भारताने याकडे दुर्लक्ष करता कामा नये, कारण आपल्याला चीन, श्रीलंका आणि इतर विकसनशील आशियाई देशांना मागे टाकण्याची संधी आहे.

**समारोप**

पंतप्रधान नरेंद्र मोदींचा डिजीटीलायजेशनचा आग्रह युवकांवर व्यापक परिणाम करणारा आहे. अर्थसंकल्पात काही सकारात्मक बाबी आहेत. त्यापैकी एक म्हणजे भीम ॲप, रेफरल बोनस स्कीम, व्यापाऱ्यांसाठी कॅशबॅक स्कीम, आधारपे या होत. २०१७-१८ मध्ये एकूण २,५०० कोटींच्या डिजीटल व्यवहारांचे लक्ष्य आहे. त्यासाठी यूपीआय, युएसएसडी, आधारपे, आयएमपीएस, डेबिड कार्ड, तसेच सर्व शासकीय व्यवहारांची पावती डिजीटल माध्यमातून देण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे व्यवस्थेत पारदर्शकता येऊन उत्तरदायित्व निश्चित केले जाईल. हे केवळ शासकीय नाही तर खासगी क्षेत्रातही केल्यास रोजगार आणि कौशल्यविषयक नवनवीन संधी निर्माण होतील.

---

***२०१७-१८ मध्ये एकूण २,५०० कोटींच्या डिजीटल व्यवहारांचे लक्ष्य आहे. त्यासाठी यूपीआय, युएसएसडी, आधारपे, आयएमपीएस, डेबिड कार्ड, तसेच सर्व शासकीय व्यवहारांची पावती डिजीटल माध्यमातून देण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे व्यवस्थेत पारदर्शकता येऊन उत्तरदायित्व निश्चित केले जाईल. हे केवळ शासकीय नाही तर खासगी क्षेत्रातही केल्यास रोजगार आणि कौशल्यविषयक नवनवीन संधी निर्माण होतील.***

---

वर उल्लेख केल्याप्रमाणे मॅक्स प्लँक किंवा फ्रॉनहोफरसारख्या संधी आपणास मेक इन इंडिया/स्टार्ट अप इंडिया या उपक्रमातून साध्य करता येतील. मेक इन इंडिया या उपक्रमाच्या माध्यमातून संरक्षणक्षेत्र, रेल्वे आणि पायाभूत सुविधांचा विकास करता येईल. खरंतर ही अर्थसंकल्पातील सर्वोत्कृष्ट बाब म्हणता येईल.

मला व्यक्तिश: असे वाटते की, कौशल्य आणि शिक्षणाच्या शाळा आणि महाविद्यालयांमध्ये अनेक योजना असाव्या, ज्यामुळे व्यावसायिक क्षेत्रात रोजगाराच्या व्यापक संधी निर्माण होतील. तसेच राष्ट्रीय कौशल्य विद्यापीठाची (नॅशनल स्कील्स युनिवर्सिटी) निर्मिती करुन कौशल्यावर आधारित उपक्रमांना शासकीय माध्यमातून चालना देण्यात येईल.

युवा सबलीकरणासाठी अनेक योजना आणि उपक्रम राबवणे ही निश्चितच सुखद बाब आहे, पण, त्याचवेळी एकूण जीडीपीच्या प्रमाणात शिक्षणासाठी होणारी तरतूद २०१२ पासून सातत्याने कमी होत आहे. मला विश्वास आहे की, सरकार भारताच्या विकासासाठी आणि भविष्यासाठी नवीन अध्यायाची सुरुवात करत आहे. याबरोबरच जनतेचा सहभागही तेवढाच महत्वाचा आहे. नव्या पिढीकडे ही मशाल सुपूर्द करण्यात आल्यामुळे ताकदीबरोबरच जबाबदारीही अधिक वाढली आहे.

■■■

*लेखक नामांकित शिक्षणतज्ञ असून भारत सरकारच्या ऑल इंडिया कॉन्सिल फॉर टेक्निकल एज्यूकेशनचे माजी अध्यक्ष आहेत.*

e-mail: ssmantha@vjti.org.in

# रेल्वे अर्थसंकल्पाचा नवा अवतार

श्री अरुणेंद्र कुमार




***स्वातंत्र्योत्तर काळात, रेल्वे सार्वजनिक वाहतुकीच्या 75% आणि मालवाहतुकीच्या 90% भार उचलत असे.त्यामुळे विशेष अर्थसंकल्पाची प्रथा पडणे वा निभावणे ही न्यायसंगत बाब होती. आज परिस्थिती वेगळी आहे, सार्वजनिक वाहतुकीचा केवळ 15% व मालवाहतुकीचा 30% भार रेल्वेव्यवस्थेवर आहे. म्हणूनच सद्य सरकारने हा बदल ओळखुन विवेकी निर्णय घेतला आहे.***

या वर्षी, रेल्वे अर्थसंकल्प निराळा सादर करण्याची ९३ वर्षांची परंपरा खंडित झाली. रेल्वे अर्थसंकल्प आपल्या सर्वसाधारण अर्थसंकल्पाच्या जोडीने सादर झाला. मात्र , पुढे अजून काही जाणून घेण्याअगोदरच अर्थसंकल्प आणि रेल्वे अर्थसंकल्प यांचं स्वतंत्र असणं आणि विलीनीकरण होणं समजून घेणं हिताचं ठरेल.

सन १९२०, साली सर विल्यम ॲक्वर्थ यांच्या अध्यक्षतेखाली ईस्ट इंडिया रेल्वे समिती स्थापित झाली. ॲक्वर्थ समितीच्या शिफारसीनुसार १९२४ पासून स्वतंत्र अधिवेशनामध्ये रेल्वेचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला . तो परिच्छेद शब्दश: असा - ''रेल्वेसारख्या बलाढ्य उद्योगाची अशी पुनर्बांधणी झाल्याने या व्यवस्थेतून निर्माण झालेले अडथळे सोडवण्यात सहजता येईल. या आधी रेल्वे उद्योगाकडे ३१ मार्च ते १ एप्रिल अशा कार्यकालात चालणारा उद्योग अशा सामान्य अनुषंगाने पाहिले जाई. मात्र सर्वसामान्य व्यापाराच्या दृष्टीकोनातून केवळ निश्चित वार्षिक योगदान देणारे अंग म्हणून रेल्वेकडे पाहिले न जाता, आता नवे स्त्रोत आणि नव्या प्राप्ती मिळवण्यात रेल्वे यशस्वी ठरेल.'' स्वातंत्र्योत्तर काळात, रेल्वे सार्वजनिक वाहतुकीच्या ७५% आणि मालवाहतुकीच्या ९०% भार उचलत असे.त्यामुळे विशेष अर्थसंकल्पाची प्रथा पडणे वा निभावणे ही न्यायसंगत बाब होती. आज परिस्थिती वेगळी आहे, सार्वजनिक वाहतुकीचा केवळ १५% व मालवाहतुकीचा ३०% भार रेल्वेव्यवस्थेवर आहे. म्हणूनच सद्य सरकारने हा बदल ओळखुन विवेकी निर्णय घेतला आहे. ह्या पार्श्वभूमीवर, रेल्वेसंकल्प नियमित अर्थसंकल्पात पायाभूत सोयीसुविधा या नावाने विरुन गेला आहे. मात्र असे होत असतानाही भारतीय रेल्वे म्हणून एक आर्थिक स्वायत्ततेला कुठेही न दुखावता तिचे स्वतंत्रपण दीर्घकालीन होण्यासाठी दक्षता घेण्यात आली आहे.

परिवहन एकीकरणाच्या समन्वयाचा परिणाम अर्थसंकल्पात उघडउघड दिसून येतो. रेल्वेला आरंभापासून अंतापर्यंत समन्वयित परिवहन पोहचवण्याची गरज आहे.ज्यामुळे प्रवासी आणि परिवाहक या दोघांसाठी सुखद चित्र तयार होईल. त्या सोबतीने प्रवाशांना खूश करता करता गाड्यांची सुवाहकता वाढेल.

सद्य अर्थसंकल्प रेल्वेच्या चार महत्त्वाच्या अंगावर प्रकाश टाकतो.

१)प्रवाशांची सुरक्षितता

२)भांडवली आणि विकासकार्ये

३)स्वच्छता

४)वित्त आणि हिशेबी सुधारणा

१)प्रवाशांची सुरक्षितता -

गेल्या काही वर्षांपासून सुरक्षिततेचा प्रश्न निकडीचा झाल्यामुळे त्याकरिता स्वतंत्र गुंतवणूकीची व्यवस्था असणे गरजेचे वाटू लागले होते. याचेही कारण म्हणजे आर्थिक स्त्रोतांची अंतर्गत व्यवस्था ही सुरक्षा निधीला पुरेशी नसणे हेच होय. या आधी असाच एक प्रयत्न माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या काळात करण्यात आला होता. ज्यानुसार १.४.२००१ रोजी विशेष रेल्वे सुरक्षा निधी तयार करण्यात आला होता. या निधीचे मूळ लक्ष्य होते ते म्हणजे सुरक्षेच्या दृष्टीकोनातून आवश्यक असे रुळ, पूल,सिग्नल यंत्रणा किंवा नियमित वापराच्या सामुग्रीतील जुनाट (धोकादायक) वस्तू वापरातून काढून टाकणे. हा निधी पूर्णत: रु. १७,००० कोटी रुपयांचा असून न संपणारा मात्र व्याजरहित निधी होता. त्यातून घडलेली चांगली कामे ग्रीन बुक मध्ये नोंदवली गेली होती. सद्य स्थितीतील अर्थसंकल्प हा सुरक्षेविषयीची काळजी आणि गरज अधोरेखित करणारा आहे. राष्ट्रीय रेल सुरक्षा कोषामध्ये (RRSK) रु. १ लाख कोटी पाच वर्षांकरीता अशी रचना केली आहे. यामध्ये शासन केवळ आरंभिक भांडवल देईल. उर्वरित सर्व वित्तव्यवस्था रेल्वेला स्वत:च्या महसूलातून अथवा इतर स्त्रोतांद्वारा करावी लागेल. या कोषाचे लाभ ज्या सुरक्षा व्यवस्थेसाठी आहेत ती सर्व कामे स्पष्टपणे मार्गदर्शकतत्वांमध्ये आणि कालमर्यादित चौकटीमध्ये शासनाने ठरवून दिली आहेत. सुरक्षेकरिता सज्ज होणे आणि देखभाल करणे यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरुन तज्ज्ञांची मदत मिळू शकेल. हे एक मोठे पाऊल शासनाने उचललेले आहे. यामध्ये अंतर्भूत होणाऱ्या गोष्टी पुढील प्रमाणे - याचा अर्थ म्हणजेच- आयसीएफ डिझाईनच्या बोगी बदलून तेथे अत्याधुनिक एलएचबी डिझाईनच्या बोगी बसवण्यात येणार आहेत, रुळांमधील तड्यांची आगाऊ सूचना मिळण्यासाठी स्वयंचलित तंत्रज्ञानाची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे, अतिभारीत पूलांचे प्रतिस्थापन करण्यात येणार आहे, सिग्नल यंत्रणेत सुरक्षित बदल करण्यात येतील तथा अतिरिक्त भार घेणारी रुट रिले इंटरलॉकिंग यंत्रणा बदलण्यात येणार आहे. गेल्या काही वर्षांत मानवरहित रेल्वे मार्गावर अपघातांचे प्रमाण बऱ्याच अंशी कमी झाले आहे. हा संकल्प २०२० पर्यंत हे प्रमाण शून्यावर आणण्याचे ध्येय ठेवतो. रेल्वेपूलाखालून आणि पूलावरुन (रेल्वे मार्ग ओलांडण्यासाठी) जाण्यासाठी आवश्यक मार्ग अधिक प्रमाणात काही वर्षांत बांधण्यात आले. ज्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने नवनवे प्रयोग करण्यात येत आहेत. आसनांमधील कापूस हा अग्निरोधक बसवण्यात येणार आहे. हा एक उल्लेखनीय पुढाकार ठरेल.

राष्ट्रीय रेल सुरक्षा कोष हा एकाच वेळेस भांडवली तथा महसूली खर्च आहे. कारण यातील १००० कोटी महसूलातून आले असून रु. १९००० कोटी भांडवली प्रदान केले आहेत. या अंतर्गत विशेष प्रकल्प नमूद केलेले आहेत.

**भांडवली आणि विकासकार्ये**

या संकल्पाचा आवाका रु. १,२१,००० कोटी ते १,३१,००० कोटी रु इतका वाढवला गेला आहे आणि त्याचवेळी, संकल्पानुसार एकूण आर्थिक पाठिंबा रु. ४६३५५ कोटींवरुन रु. ५५,००० कोटी पर्यंत वाढवला गेला आहे. अतिरिक्त अर्थसंकल्पीय संसाधनांवर भर देण्याचेही योजिले आहे. ज्यामुळे, अंतर्गत निधींची पातळी रु. १४००० कोटी इतकी निश्चित ठेवता येईल. सद्य स्थितीत ही गंगाजळी निश्चित केलेल्या पातळीपेक्षा थोडी जास्त म्हणजेच १४,७१५ कोटी रु इतकी आहे. जीबीएस, ईबीआर आणि इतर अंतस्त्रोतांचे निर्माण पुढे वर्णिले आहे.

रक्कम (कोटी रु.)

| वर्ष | प्रकल्पीय विस्तार | जीबीएस | अतिरिक्त संकल्पीय संसाधने | अंतस्रोतांचे निर्माण |
|---|---|---|---|---|
| २०११-१२ | ४५,०६१ | २१,०७३ | १४,७९० | ९,१९८ |
| २०१२- १३ | ५०,३८३ | २५,२४३ | १५,१४२ | १०,००७ |
| २०१३ -१४ | ५३,९८४ | २८,१७४ | १५,२२५ | १०,५९० |
| २०१४ -१५ | ६५,७९८ | ३१,५९६ | १७,७८८ | १६,४१४ |
| २०१५-१६ | ९३,५२० | ३५,००७ | ३९,००६ङ | १९,४४६ |
| २०१६ -१७ | १२१ ,००० | ४६,३५५ | ५९,९३० | १४,७१५ |
| २०१७ - १८ | १३१ ,००० | ५५,००० | ६२,००० | १४,००० |

यामध्ये रु. १७१३६ कोटी च्या संस्थात्मक निधीचा समावेश आहे. ही निधी उत्पादनाची

अभिनव पध्दत सर्वात प्रथम वापरली गेली. दोन वर्षांतच ही पध्दती सरावलेली दिसेल.

बारकाईने पाहिल्यास हे कळेल की निधींचा आवाका हा जवळपास दुप्पट केला गेला. रु. ६५,७९८ (२०१४-१५१५) ते रु. १,३१००० (२०१७-१८) . वर्तमान शासनाने देशाच्या जीवनवाहिनीवर गुंतवणूक करण्याचे वचन देशवासियांना दिले होते, ती वचनपूर्ती येथे दिसून येते. त्यात हे रेल्वे अर्थसंकल्पाचे विलीनीकरण झाल्यामुळे भारतीय रेल्वेचे लाभांश दायित्व नाहीसे झाले आहे, ज्यायोगे अंदाजे १०००० कोटी रुपयांची उपलब्धता आली असून हा नफा आवर्ती आहे. प्रत्येक वर्षी मिळतच राहिल.

रेल्वेच्या कार्यपूर्तीची सूची अत्यंत प्रभावी आहे आणि रेल्वे विकासाच्या महत्वाची सर्व क्षेत्रे त्यात सामावलेली आहेत. सन २०१६-१७ मध्ये रेल्वेने २८०० किमीचे रेल्वेमार्ग नेण्याचे योजिले होते मात्र या अर्थसंकल्पानुसार २०१७-१८ मध्ये ३५०० किमी चा रेल्वेमार्ग नेण्याचे ठरवले आहे. येत्या ३ वर्षांत थ्रुपूट १०% नी वाढवला जाईल. थ्रुपूट म्हणजे सोप्या शब्दांत सांगायचे झाल्यास, टन कि मी आणि प्रवासी कि मी यांच्या एकत्रिकरणाने तयार झालेली संकल्पना. तसेच, स्थानकाचा पुनर्विकास हा अजून एक कळीचा मुद्दा. यांची अंमलबजावणी अगोदरच भोपाळच्या जवळपास हबिबगंज आणि गांधीनगर येथे सुरु झालेली आहे. २०१७-१८ या आर्थिक वर्षांत किमान २५ स्थानकांसाठी पुनर्विकासाचा करार संमत होणे अपेक्षित आहे. उद्वाहक आणि सरकते जिने यांनी सुविध्य केलेली ५०० स्थानके या वर्षी पूर्ण होतील. ७००० स्थानकांना सौरउर्जित करण्याचा शासनाचा मानस आहे. या कामाचा आरंभ म्हणून ३०० स्थानकांचे विद्युतीकरण करण्यात आले आहे. तर २००० रेल्वे स्थानकांच्या १००० मेगावॅट सौर उर्जिकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. पर्यटन आणि तीर्थयात्रांप्रति रेल्वेमार्ग नेण्यासाठी पाऊले उचलेली गेली आहेत. या सर्व प्रकल्पांची सुरुवात झाल्याचे पुरावे आता दिसून येत आहेत. या प्रकल्पांच्या पूर्तीसाठी केंद्र सरकार राज्य सरकारांशी हातमिळवणी करत आहे. ज्यामुळे अभिनव कल्पनांना पुरेसा निधी आणि जलद कार्यवाही अशी जोड मिळेल. अशा एकूण ९ राज्यांच्या शासनांशी रेल्वेने जोडप्रकल्प स्थापले असून ७० प्रकल्पांतर्गत बांधकाम आणि विकास कार्ये केली जात आहेत.

**स्वच्छता**

भारतीय रेल्वेच्या संकल्पामध्ये यावर्षी सर्वाधिक भर हा स्वच्छ भारत अभियानावर होता. म्हणजे रेल्वेच्या अनुषंगाने सांगायचे झाल्यास रेल्वेची स्वच्छता पुन्हा कशी साधली जाईल हा मुद्दा होता. रेल्वे फलाटावरील स्वच्छता आणि रेल्वे प्रवासातील स्वच्छता वा त्यासाठीचे प्रयत्न आता दिसू लागले आहेत. क्लिन माय कोच ही संदेश (एसएमएस) सेवा अल्पावधीतच प्रसिध्द होत आहे. या अर्थसंकल्पामुळे नव्याने कोच मित्र ही सुविधा लवकरच भेटीला येईल, ज्यायोगे रेल्वेतील आसनव्यवस्थेसंदर्भातील सर्व आवश्यकता मांडता येतील. रेल्वेतून होणारे मलमूत्र निस्सारण हा रेल्वे फलाटावरुन दृश्यपथात येणारे सर्वसामान्य दृश्य. हे दृश्य फारच करुण असते मात्र यामुळे होणारे नुकसान म्हणजे रेल्वे मार्गांची झीज. सन २०१९ पर्यंत रेल्वेचे सर्व डबे शौचालयसुविध्य असतील असा प्रस्ताव या अर्थसंकल्पाद्वारे मांडण्यात आला. हा अर्थसंकल्प पुढे असेही म्हणतो की, असे प्रारंभिक प्रयोग करत पुढे ही शौचालये पर्यावरणस्नेही केली जातील., तदनुसार मलसाठ्याचे विघटन करण्यात येऊन त्यांपासून ऊर्जा मिळू शकेल. हे प्रकल्प नवी दिल्ली आणि जयपूर रेल्वे स्थानकावर स्थापण्याचे काम झाले आहे. स्वच्छ रेल्वे स्थानक सोबतच आपला भोवतालचा परिसरही स्वच्छ राखता येणार आहे.

**वित्त आणि हिशेबी सुधारणा**

या अर्थसंकल्पाचे एकूण खर्चाआधारित विवरण मार्च २०१९ मध्ये जाहीर होईल. त्यानुसार, या खर्चाच्या विवरणामध्ये, महसूलाची नोंद महसूल प्राप्त होईल तेव्हा होत राहील. रोख पुस्तपालनाअंतर्गत, हीच नोंद रोख प्राप्त झाल्यावर होते. त्यामुळे एकूण खर्चाधारित विवरणाचा फायदा हा एकूण जमा आणि एकूण खर्च यांचा ताळा करताना होत राहतो. ज्यामुळे एकाच नोंदीमध्ये एकूण व्यवहार तपासता येतो. हिशेबातील या सुधारणा रेल्वे व्यवस्थेला त्यांच्या सेवांचे खरे मूल्य अचूक सांगण्यास मदत करतील.

या अर्थसंकल्पात जाहीर झालेल्या प्रवासी भाड्याइतके योग्य भाडे या पूर्वी कधीही जाहीर झाले नसेल. प्रवाशांना डिजिटल सवयींकडे वळवण्याचा मानस असल्याने, आयआरसीटीसी ने इ-तिकीटे आरक्षित करताना सेवाकर माफ केला आहे. ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. शिवाय रेल्वेच्या तिन्ही सार्वजनिक सेवा म्हणजेच आयआरएफसी, आयआरकॉन आणि आयआरसीटीसी या वर्षीपासून रोखे बाजार मध्ये नोंदणीकृत झाल्या आहेत.

**जमाखर्च**

रेल्वे अर्थसंकल्पानुसार, रेल्वेच्या चारही अंगावर चर्चा केल्यानंतर, निम्नलिखित २०१७-१८ साठीचा जमाखर्च पाहूया.

| अनु. क्र. | तपशील | २०१५-१६ मधील खर्चाची रक्कम | अर्थसंकल्पात नमूद केलेली अंदाजे रक्कम २०१६-१७ | सुधाारित अंदाजपत्रकात वर्णिलेली रक्कम (रु.) २०१६-१७ | अर्थसंकल्पात नमूद केलेली अंदाजे रक्कम (२०१७-१८) |
|---|---|---|---|---|---|
| | **जमा** | | | | |
| १ | प्रवासी महसूल | १६४,३३४ | १८४,८२० | १७२,१५५ | १८८,९९८ |
| अ | प्रवाशी भाडे | ४४,२८३ | ५१,०१२ | ४८,००० | ५०,१२५ |
| ब | माल भाडे | १०९,२०८ | ११७,९३३ | १०८,९०० | ११८,१५७ |
| क | अतिरिक्त भाडे कमाई | ४३७१ | ६१८५ | ५००० | ६४९४ |
| ड | इतर कमाई | ५९२९ | ९५९० | १०१०० | १४१२३ |
| ई | प्रवासी अनामत | ५४५ | १०० | १५५ | १०० |
| २ | संकीर्ण महसूल | ४०४६ | ४४५१ | १५० | ५०० |
| ३ | एकूण महसूली प्राप्ती (१ +२) | १६८,३८० | १८९,२७१ | १७२,३०५ | १८९,४९८ |
| ४ | सर्वसामान्य महसूलाकडून भांडवली खर्चासाठी सहाय्यभूत रक्कम | ३७,६०८ | ४५,००० | ४।३५५ | ५५००० |
| ५ | एकूण प्राप्ती अधिक अर्थ संकल्पीय साहाय्य (३ +४) | २०५,९८८ | २३४,२७१ | २१८,६६० | २४४,४९८ |
| ६ | अतिरिक्त अर्थसंकल्पीय स्त्रोत (ईबीआर) | ३९,०६६ | ५९,३२५ | ५९,९३० | ६२००० |
| ७ | एकूण प्राप्ती (ईबीआरचा समावेश) | २४५,०५४ | २९३,५९६ | २७८,५९० | ३०६,४९८ |
| | | | | | |
| | **खर्च** | | | | |
| ८ | एकूण कामकाजासाठी होणारा खर्च (८अ ते ८ब) | १४७,८३६ | १६९,२६० | १६२,९६० | १७८,३५० |
| अ | कार्यचालनाचा सामान्य खर्च | १०७,७३६ | १२३,५६० | १२२,७६० | १२९,७५० |
| ब | भविष्यनिर्वाह निधीप्रती तरतूद | ३४५०० | ४२५०० | ३५००० | ४३६०० |
| क | मूल्यऱ्हास (घसारा) आरक्षित निधीप्रती विनियोजन | ५६०० | ३२०० | ५२०० | ५००० |
| ९ | संकीर्ण खर्च | १३१५ | १८०० | १६५० | २२०० |
| १० | रेल्वे महसूलाचा एकूण खर्च (८ + | १४९,१५१ | १७१,०६० | १६४,६१० | १८०,५५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | ईबीआर आणि अर्थसंकल्पीय आधारातून ठेवलेला निधी (८+९) | ७६,६७१ | १०४,३२५ | १०६,२८५ | ११७,००० |
| १२ | ईबीआर समावेशित आधारातून केलेला खर्च | २२५,८२६ | २७५,३८५ | २७०,८९५ | २९७,५५० |
| १३ | निव्वळ महसूल | | | | |
| | १९२२८ | १८२११ | ७६९५ | ८९४८ | |
| १४ | देय लाभांश | ८७२३ | ९७३१ | .. | .. |
| १५ | अतिरिक्त जमा | १०५०६ | ८४७६ | ७६९५ | ८९४८ |
| १६ | विकास निधीप्रती आर्थिक व्यवस्था | १२२० | २५१५ | २५१५ | २००० |
| १७ | भांडवल निधी प्रती विनियोजन | ५७९८ | ५७५० | ५१८० | ५९४८ |
| १८ | सेवानिधी करता तरतूद | ३४८८ | २१४ | .. | .. |
| १९ | राष्ट्रीय रेल संरक्षा निधी प्रती विनियोजन | .. | .. | .. | १००० |
| २० | परिचालन गुणोत्तर (ऑपरेटिंग रेशो) | ९०.५% | ९२.०% | ९४.९०% | ९४.६०% |

एकूण वाहतूक भाडे २०१७- १८ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार रु. १८८९८८ कोटी इतके आहे. तेच २०१६-१७ मध्ये १७२१५५ कोटी इतके होते. म्हणजे १६-१७ च्या सुधारित अंदाजपत्रकानुसार, रु. १६८४३ कोटी रुपयांनी अधिक तर १६ - १७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार ४१७८ कोटी रुपयांनी जास्त. गतवर्षीच्या सुधारित अंदाजपत्रकानुसार या वर्षीच्या अर्थसंकल्पात मांडलेली प्रवासी भाड्याची किंमतीपेक्षा जवळपास २१२५ कोटी रुपयांनी अधिक तर त्या वर्षाच्या अंदाजपत्रकाच्या तुलनेत ८८७ कोटी रुपयांनी कमी आहे. त्याचप्रमाणे, २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार मालवाहतूकीतून अपेक्षित असलेली रक्कम २०१६ -१७ च्या सुधारित अंदाजपत्रकापेक्षा ९२५६ कोटी रुपयांनी अधिक असून त्या वर्षीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाच्या तुलनेत २२४ कोटी रुपयांनी अधिक आहे. मिश्र उत्पन्नाचा विचार करता, रक्कम रु. १४१२२ कोटी ठेवल्याचे निश्चित आहे. जी रक्कम २०१६-१७ च्या सुधारित अंदाज पत्रकानुसार रु. ४०३२ कोटीने जास्त आहे. या साऱ्या रकमांवर नजर फिरवता हेच कळते की, एकूण नफयाची अपेक्षा ही अत्यंत माफक आहे. भांडवली आणि महसूल यांचा समावेश करुन एकूण जमा रु. ३०६४९८ कोटी इतकी आहे, तर हीच जमा २०१६-१७ च्या सुधारित अंदाजपत्राच्या तुलनेत पाहता रु. २७९०८ कोटीने जास्त होती आणि अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकानुसार रु. १२९०३ कोटींचा फरक दिसून आला.

आता आपण महसूल खर्चाकडे वळूया. २०१७ -१८ च्या अहवालात ही रक्कम १,७८,३५० कोटी आहे मात्र २०१६-१७च्या सुधाारित अंदाजानुसार रु. १५३९० कोटींनी वाढली आहे. सामान्य कार्यकारी खर्चामध्ये मात्र रेल्वेने सुरेख प्रगती दर्शवली आहे. अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकापेक्षा सुधारित अंदाज पत्रक हा खर्च तब्बल ८०० कोटी रुपयांनी कमी म्हणजेच १,२२,७६० कोटी रुपये इतका दर्शविते. या वर्षी या खर्चाचे टार्गेट १,२९ ,७५० कोटी आहे. २०१७ -१८ साठी निश्चित केलेला महसूल ८९४८ कोटी रु. असून गतवर्षीच्या तुलनेत महसूल १२५३ कोटी ने अधिक आहे. तरीही ही रक्कम २०१५-१६ च्या तुलनेत कमीच आहे. त्या वर्षी महसूल सुमारे १९२२८ कोटी रुपयांइतका होता. परिचालन गुणोत्तर मागच्या वर्षी ९४.६% एवढे निश्चित केले असता, सुधारित अंदाज पत्रकात ही टक्केवारी ९४.९% इतकी होती. हे खरेतर आव्हानात्मक आहे. डिसेंबर २०१६ मध्ये हेच गुणोत्तर १०९.६%

एवढे होते. अर्थसंकल्प हा स्थितीवाचक असतो. ज्यावरुन हे समजते की, रेल्वेचा जकात हा निश्चित असावा, ज्यासाठी एकूण खर्चाची रक्कम, सेवेचा दर्जा, सामाजिक बांधिलकी आणि इतर वाहतूक स्त्रोतांकडून संभवणारी स्पर्धा यां साऱ्यांचा योग्य विचार व्हावा.

रेल्वे विकासकामांपैकी निवडक व महत्वाच्या क्षेत्रातील भांडवली खर्च पुढीलप्रमाणे:

| तपशील | २०१५-१६ प्रत्यक्ष रक्कम | २०१५-१६ अर्थसंकल्पीय रक्कम | सुधारित अंदाजपत्रक २०१६-१७ | अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक २०१६-१८ |
|---|---|---|---|---|
| भांडवली खर्च | | | | |
| नवीन मार्गिका | १३२४८ | ११९६३ | १३६६० | ११५३३ |
| रुंदीकरण | ३४०७ | ३२७६ | ३७२१ | ३०९१ |
| दुपदरीकरण | २९५० | ४७८२ | १४२३ | २५४३ |
| वाहतूक सुविधा रेल्वेयार्ड नूतनीकरण | ९८४ | ११२६ | १०३६ | १९५१ |
| वापरातील साठा | ४२४० | ५४४८ | ६१५० | २००६ |
| भाडेतत्वावर दिलेल्या मालमत्ता- भांडवली देयके | ६३२५ | ७००० | ७००० | ८००० |
| सुरक्षित कामे: | | | | |
| अ) लेवल क्रॉसिंग | | | | |
| ब) रेल्वेमार्गाच्या खालून वा वरुन असणारा मार्ग | ४७० | ५५५ | ६७९ | ७०५ |
| | २१३३ | २४४३ | ३०६६ | ४५१२ |
| मार्गिकाचे नूतनीकरण | ५५८६ | ४००० | ६७४० | ९९६१ |
| पूल बांधणी | ५२० | ५८९ | ५९२ | ७४६ |
| सिग्नल आणि दूरभाष यंत्रणा | ८९४ | ९५८ | ९५४ | २३३१ |

तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे, नवीनमार्ग बांधणीच्या कामाचे निर्धारण रु. ११५३३ कोटी पर्यंत घटलेले दिसून आले. रुंदीकरण, दुपदरीकरण आणि वाहतूक सुविधा ही भ्रमणसुलभता देणारी क्षेत्रे शिवाय यांच्यासाठी येणारा खर्च तुलनेने कमी. दुपदरीकरणासाठी २५४३ कोटी रुपयांचा निधी निश्चित केला आहे, गतवर्षीच्या सुधारित अंदाजपत्रकान्वये हा निधी १४२३ कोटी रुपयांनी अधिक आहे. तर वाहतूकीसुविधेसाठी २०१६-१७ साठी ठेवलेला निधी रु.१०३६ कोटी रुपये होता तर २०१७-१८ मध्ये तो १८५१ कोटी रु. इतका केला आहे. रस्त्याखालून जाणारे रेल्वेमार्ग आणि वरुन जाणारे रेल्वेमार्ग यांच्या सुरक्षा कार्यांसाठी विशेष तरतूद केली जात आहे. रेल्वे रुळ परिवर्तनासाठी रु. ४५१२ कोटी इतका बक्कळ निधी ठेवला असून, मागच्यावर्षी हा निधी ३०६६ कोटी रुपये होता.२०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पीय विनियोजन रु. ४००० कोटींनी वाढवून रु. ६७४० कोटी इतके केले होते. जे आज ९९६१ रु. कोटी रुपये आहे. जुनाट रुळ बदलण्याचे प्रामाणिक प्रयत्न या द्वारे केले जातात हे या खर्चातून दिसून येत आहे. दूरभाष यंत्रणा आणि सिग्नल यंत्रणा यांचे गतवर्षी खर्चाचे प्रमाण रु९५४ कोटी इतके होते. ज्यामध्ये आता १४५% नी वाढ झाली असून २०१७-१८ साठी हे प्रमाण २३३१ कोटी इतके भव्य केले आहे.

राष्ट्रीय रेल्वे सुरक्षा निधी वगळता सुरक्षितता हा मुद्दा व त्यांचे महत्व लक्षात

घेऊन इतर तजवीज करण्यात आली आहे. रेल्वे बाबतीत सुरक्षा दृष्टीकोनातून होणारा खर्च रुळ, गाड्या,डब्बे,आणि सिग्नल या अंगांशी संबंधित असतात. आरआरएसके शिवाय सुरक्षेसाठी महसूलातील रु.४२६७९ कोटी रुपये वेगळे ठेवले आहेत. जी रक्कम २०१६-१७ च्या सुधारित अंदाजपत्रकानुसार ८१४ कोटी रुपयांनी अधिक आहे.

***सुरक्षेच्या दृष्टीकोनातून खर्चाचे विवरण***

| **तपशील** | **२०१५ - १६ अर्थसंकल्पानुसार** | **२०१६-१७ अर्थसंकल्पानुसार सुधारित अंदाजपत्रकानुसार** | **अर्थसंकल्प २०१७-१८** |
|---|---|---|---|
| महसूली खर्च | | | |
| रुळांची देखभाल | १३७१२ | १३५३९ | १३५३९ |
| डब्बे | ६३१८ | ६१०८ | ६२०४ |
| मालवाहू गाडया आणि वाघिणी | १४१३२ | १४३५१ | १४९४७ |
| संयंत्र आणि साधने | ८११२ | ७८३२ | ७९४७ |
| वाहतूक | ३५ | ३५ | ३५ |
| एकूण महसूल | ४२४८९ | ४१८६५ | ४२६७९ |

**गतिशीलता अवलोकन:**

रेल्वे प्रणालीची गतिशीलतेतील सुधारणा , ही टन किमी आणि प्रवासी किमी यातून दाखवली जाते.

| तपशील | २०१५ - १६ | २०१६-१७ सुधारित अर्थसंकल्पानुसार अंदाजपत्रकानुसार | | अर्थसंकल्प २०१७-१७ |
|---|---|---|---|---|
| प्रवासी किमी (दशलक्ष) | १,१४३,०३६९ | ११३,२९८ | १,१५७,६३७ | १,१५९,९०० |
| नेट टन (दशलक्ष) | ६५४, ४८१ | ६९४,६०७ | ६२१,२४७ | ६७५,६२२ |

अर्थसंकल्पात वर्णिलेल्या चारही अंगांनापुरेसे आर्थिक पाठबळ आहेच. नव्याने परिचित राष्ट्रीय रेल सुरक्षा कोषासाठी योग्य ती तरतूद उपलब्ध आहे. मिळकत आणि खर्चाची ध्येये आणि वास्तविक प्रकल्पाच्या निश्चितीकडून कार्ये सिध्द करण्याच्या दृष्टीने योग्य ती पावले उचलली गेली आहेत. देशाच्या विकासाचे इंजिन अर्थात भारतीय रेल्वेच्या सेवांमधील सुधारणांचा समतोल या अर्थसंकल्पाच्या नव्या अवतारात साधला गेला आहे.

■■■

*लेखक भारतीय रेल्वेचे निवृत्त अध्यक्ष आणि रेल्वेसेवेत ३९ वर्षे काम केल्यानंतर, डिसेंबर २०१४ मध्ये भारत सरकारच्या मुख्य सचिव होते. ते मेकॅनिकल इंजिनियर असून डिझेल लोकोमोटिव्ह, कोचेस आणि वॅगनच्या देखभाल आणि पूर्ण रेल्वे व्यवस्थापनाचा विपुल अनुभव त्यांना आहे*

e-mail: noidarail54@gmail.com

# २०१७-१८ अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये



गेल्या दोन वर्षात बांधणी केलेल्या खंबीर वित्तीय आणि मजबूत सूक्ष्म आर्थिक पायाच्या आधारावर यंदाचा अर्थसंकल्प उभा आहे. निश्चलनीकरण, जीएसटी आणि जेएएम यांनी पुढील वाटचालीसाठी अत्यंत सकारात्मक दृष्टीकोन तयार केला आहे. गेल्या वर्षी केलेल्या अन्य सुधारणांमुळे अर्थव्यवस्थेत नवीन ऊर्जा भरली आहे.

ए. वाढीचा दृष्टीकोन सकारात्मक राहिला आहे.

बी. वित्तीय तूट ३.२ टक्के असून पुढील वर्षी (२०१८-१९) ती ३ टक्क्यांवर आणण्याची वचनबद्धता.

सी. चालू वर्षात महसुली तूट कमी झाली असून पुढील वर्षी ती आणखी कमी म्हणजे १.९ टक्क्यांवर आणली जाईल.

डी. २०१७-१८ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत निव्वळ बाजारपेठीय उसनवारी बायबॅकसह खूपच खाली म्हणजे ३ लाख ४८ हजार कोटी रुपयांवर आहे.

ई. वित्तीय धोरण शाश्वत कर्जाच्या आधारावर राखण्याची वचनबद्धता.

**शेतकरी**

ए. दीर्घ मुदतीचा पाटबंधारे निधी - रक्कम ४०,००० कोटी रुपयांपर्यंत वाढवली.

बी. नाबार्डकडून सूक्ष्म पाटबंधारे निधी स्थापन केला जाणार (एकूण निधी ५,००० कोटी रुपये)

सी. ई-नामचा विस्तार ५८५ एपीएमसीपर्यंत (कृषी उत्पन्न बाजार समित्या) करणार

डी. नाशवंत माल एपीएमसीमधून वगळण्याच्या राज्यांना सूचना.

इ. कंत्राटी शेतीसाठी आदर्श कायद्याचा स्वीकार राज्यांनी करावा यासाठी परिपत्रक काढणार.

एफ. २०१७-१८ मध्ये पीक कर्जाचे उद्दिष्ट १० लाख कोटीवर निर्धारित.

जी. ६३,००० कार्यरत पीएसींचे संगणकीकरण करून जिल्हा बँकांच्या कोअर बँकिंग प्रणालीशी जोडणार.

एच. २०१७-१८ मध्ये पीक विमा योजनेची व्याप्ती ४० टक्क्यांपर्यंत जाणार तर २०१८-१९ मध्ये ५० टक्के.

आय. येत्या तीन वर्षांत ८,००० कोटी रुपयांचा दुग्धोत्पादन प्रक्रिया आणि पायाभूत विकास निधी स्थापन करणार.

**ग्रामीण लोकसंख्या**

ए. २०१९ पर्यंत एक कोटी कुटुंबांना दारिद्र्यातून बाहेर काढण्यासाठी अंत्योदय योजना राबवणार आणि ५०,००० ग्रामपंचायती गरिबीमुक्त करणार.

बी. मनरेगासाठी (राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) २०१७-१८ साठी आतापर्यंतचा सर्वोच्च म्हणजे ४८,००० कोटी रुपयांचे वाटप; रोजगार निर्मिती आणि मिळकत निर्मितीवर भर

सी. पीएमजीएसवाय - २०१७-१८ मध्ये राज्यांच्या योगदानासह २७,००० कोटी खर्च केले जाणार असून बांधणीचा वेग २०११-१४ या काळातील दररोज ७३ किमी. पासून २०१६-१७ मध्ये दररोज १३३ किमी. पर्यंत वाढवला आहे.

डी. येत्या चार वर्षांत २८,००० हून अधिक अत्यंत जालीम विषारी आणि फ्लोराईडने ग्रस्त भागांसाठी सुरक्षित पिण्याचे पाणी पुरवणार

**युवा, शिक्षण आणि रोजगार आदी.**

ए. विद्यापीठ अनुदान आयोगात(युजीसी) सुधारणा हाती घेणार.

बी. ३५० ऑनलाईन अभ्यासक्रमांनुसार स्वयंम व्यासपीठ सुरू केले जाणार.

सी. ३.५ कोटी युवकांना प्रशिक्षित करण्यासाठी ४,००० कोटी रुपये खर्च करुन संकल्प हा कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करणार.

डी. चर्मोद्योग आणि पादत्राण व्यवसायांसाठी क्षेत्राच्या प्रमाणेच योजना हाती घेणार.

ई. पाच विशेष पर्यटन विभाग स्थापन करणार.

**गरीब आणि वंचित**

ए.. महिलांना कौशल्य विकास, रोजगार, आरोग्य व पोषण आहाराच्या संधी उपलब्ध करुन देऊन सक्षम करण्यासाठी ग्रामपातळीवर १४ लाख अंगणवाडी केंद्रांमध्ये महिला शक्ती केंद्रे स्थापन करणार.

बी. परवडणाऱ्या घरांना पायाभूत सुविधांचा दर्जा देणार. त्यामुळे अशा गृहप्रकल्पांना उदार अटींवर बँक कर्ज मिळू शकेल.

सी. २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय गृहनिर्माण बँक वैयक्तिक गृह कर्जांसाठी २०,००० कोटी रुपयांचा फेरवित्तपुरवठा करणार.

डी. काला आजार, नारू, कुष्ठरोग, गोवर आणि क्षय यांसारख्या आजारांचे निर्मूलन करण्यासाठी विशिष्ट मैलाचे दगड (milestones) निश्चित करणार.

ई. आयएमआर आणि एमएमआर कमी करणार.

एफ. दीड लाख आरोग्य उपकेंद्रांचे रुपांतर आरोग्य व कल्याण केंद्रांमध्ये करणार.

जी. वैद्यकीय शिक्षण आणि व्यवसाय यासाठी असलेल्या नियामक चौकटीत बदल करणार.

एच. झारखंड आणि गुजरातेत दोन नवीन एम्स रुग्णालये

आय. सध्याच्या कामगार कायद्यांचे सुसूत्रीकरण आणि एकत्रीकरण करुन चार संहिता बनवणार.

**पायाभूत सुविधा**

ए. रेल्वेसाठी भांडवली व विकास खर्च १,३१,००० कोटी रुपये केला जाणार असून त्यात सरकारचे ५५,००० कोटी रुपये असतील.

बी. राष्ट्रीय रेल्वे सुरक्षा निधी स्थापन केला जाणार असून त्यासाठी पाच वर्षांत १ लाख कोटीची रक्कम दिली जाणार.



सी. येत्या तीन वर्षांत रेल्वेची क्षमता १० टक्क्यांनी वाढवणार.

डी. रेल्वे आणि ९ राज्य सरकारे यांच्या संयुक्त प्रयत्नांतून अंमलबजावणी करण्यासाठी ७० प्रकल्प निश्चित.

ई. रेल्वे सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत एकात्मिक परिवहन उपाययोजना आणि पुरवठा साखळी सुविधा देणार.

एफ. लेखा सुधारणा - मार्च २०१९ पर्यंत रेल्वे जमा झालेल्या उत्पन्नातील वाढीच्या आधारावर वित्तीय विवरणांचा स्वीकार करणार

जी. नवीन मेट्रो रेल्वे धोरण जाहीर केले जाणार आणि नवीन मेट्रो रेल्वे कायदा मंजूर करणार.

एच. रस्ते क्षेत्रावरील भर कायम राहणार.

आय. द्विस्तरीय शहरांतील निवडक विमानतळ खासगी व सार्वजनिक भागीदारी पद्धतीने कार्यान्वयन व देखभालीसाठी हाती घेतले जाणार

जे. मालमत्तांच्या परिणामकारक चलनीकरणासाठी भारतीय विमानतळ प्राधिकरण कायद्यात सुधारणा करणार.

के. भारतनेट प्रोजेक्ट : २०१७-१८ च्या अंतापर्यंत दीड लाख ग्रामपंचायतींना ओएफसी ब्रॉडबँडची जोडणी देणार.

एल. ओडिशा आणि राजस्थानमध्ये डावपेचात्मक कच्च्या तेलाचा साठा करण्यासाठी केंद्र स्थापन करणार.

एम. सौर नगरी विकासाच्या दुसऱ्या टप्प्यात २०,००० मेगावॉटची अतिरिक्त क्षमता

एन. भारताला इलेक्ट्रॉनिक उत्पादनांचे जागतिक केंद्र बनवण्यासाठी पर्यावरणीय व्यवस्था तयार करणार.

**आर्थिक क्षेत्र**

ए. २०१७-१८ मध्ये परदेशी गुंतवणूक प्रोत्साहन मंडळ (एफआयपीबी) बरखास्त करणार

बी. कमोडिटीजसाठी स्पॉट मार्केट आणि डेरिव्हेटिव्हज मार्केटच्या एकात्मीकरणासाठी कार्यान्वयन आणि कायदेशीर चौकट विकसित

करण्यासाठी तज्ञ समिती स्थापन करणार.

सी. गरीब आणि सहजपणे फसणाऱ्या गुंतवणूकदारांचे संरक्षण करण्यासाठी नियमनातील तफावती भरून काढण्याच्या दृष्टीने बहुराज्यीय सहकारी सोसायटी कायद्यात सुधारणा करणार

डी. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वित्तीय कंपन्यांच्या तंट्यांवर तोडगा शोधण्याशी संबंधित विधेयक मांडणार

ई. पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक व खासगी सहभागाशी संबंधित बांधकाम कंत्राटांचे वाद सोडवण्याची यंत्रणा उभारण्यासाठी लवाद व निपटारा कायद्यात सुधारणा करणार.

एफ. आर्थिक क्षेत्रासाठी संगणक आपत्कालीन प्रतिसाद पथक (CERT-Fin)

जी. सीपीएसईच्या कालबद्ध सूचीकरणासाठी सुधारित यंत्रणेची घोषणा केली जाणार

एच. रेल्वेचे पीएसईज जसे की आयआरसीटीसी, आयआरएफसी आणि इर्कॉन शेअर बाजारात नोंदणी करणार

आय. तेल क्षेत्रातील सध्याच्या सार्वजनिक उपक्रमांचे एकत्रीकरण करुन ऑईल मेजर हे एकात्मिक सार्वजनिक क्षेत्र स्थापन करणार

जे. विभिन्न सीपीएसई समभागांसह नवीन इटीएफ सुरू करणार

के. प्रतिभूतीकरण आणि पुनर्निमाण कंपन्यांनी जारी केलेल्या सिक्युरिटी रिसिप्ट्सचे (एसआर) शेअर बाजारात सूचीकरण आणि व्यापाराला परवानगी दिली जाणार

**डिजिटल अर्थव्यवस्था**

अ. आधार ने सक्षम बनवलेली रक्कम अदा करण्याची आधार पे ही व्यापारी आवृत्तीची प्रणाली लवकरच लागू करणार

ब. वित्तीय समावेशकता निधीची रक्कम वाढवणार

सी. डिजिटल पेमेंट पद्धतीच्या सध्याच्या गरजांनुसार पेमेंट व सेटलमेंट व्यवस्थेचा व्यापक आढावा घेतला जाणार आहे. दरम्यानच्या काळात कायद्यात सुधारणा करून पेमेंट नियामक मंडळ रिझर्व्ह बँक ऑफ इंडियात स्थापन केले जाणार

डी. बँकांचे वाढलेले व्यवहार आणि धनादेशाद्वारे करण्यात येणाऱ्या पेमेंटमध्ये वाढ झाल्यानंतर नव्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी निगोशिएबल इन्स्ट्रक्शन्स ऍक्टमध्ये सुधारणा करणार.

**सार्वजनिक सेवा**

ए. पासपोर्ट सेवा देण्यासाठी टपाल मुख्यालये प्रमुख कार्यालय म्हणून काम करणार

बी. कायद्याच्या कचाट्यातून सुटण्यासाठी देश सोडून गेलेल्या मोठ्या आर्थिक गुन्हेगारांसह सर्व मोठ्या गुन्हेगारांची मालमत्ता जप्त करण्यासाठी वैधानिक बदल करणार किंवा नवीन कायदाही आणणार.

**खातेनिहाय एकूण तरतूद**

(सर्व आकडे कोटींमध्ये)

| Sl. No. | विभाग/खाते | अर्थसंकल्पीय तरतुद 2016-17 | सुधारीत अर्थसंकल्पीय तरतुद 2016-17 | अर्थसंकल्पीय तरतुद 2017-18 |
|---|---|---|---|---|
| 1. | कृषी आणि संलग्न विभाग | 48572 | 52821 | 58663 |
| 2. | ग्राम विकास | 102543 | 114947 | 128560 |
| 3. | पायाभूत सुविधा | 348952 | 358634 | 396135 |
| 3a. | परिवहन | 216268 | 216903 | 241387 |
| 4. | सामाजिक विभाग | 168100 | 176225 | 195473 |
| 4a | शिक्षण-आरोग्य | 112138 | 114806 | 130215 |
| 4b | सामाजिक क्षेत्रातील कल्याणकारी योजना | 55962 | 61419 | 65258 |
| 5. | रोजगार निर्मिती, कौशल्य विकास | 12006 | 14735 | 17273 |
| 6. | विज्ञान-तंत्रज्ञान संबंधित खाती | 33467 | 34359 | 37435 |

Source: Expenditure Profile and Expenditure Budget 2017-18

**भाग ब मधील करप्रस्तावांचा सारांश**

**परवडणारी घरे**

१. परवडणाऱ्या घरांसाठी प्राप्तीकर खात्याच्या सूट योजनेतील तीन सवलती




ए. ३०आणि ६० चौरस मीटर क्षेत्र हे कार्पेट एरिया म्हणून गणले जाणार, बिल्टअप एरिया म्हणून नव्हे.

बी. ३० चौरस मीटरची मर्यादा ही फक्त चार महानगरांच्या हद्दीतच असून उर्वरित भागासाठी ती ६० चौरस मीटर आहे.

सी. पूर्णतेचा कालावधी ३ वर्षांवरून वाढवून तो ५ वर्षे केला.

२.बिल्डरांसाठी प्रतिकात्मक भाडे उत्पन्नावरील कर प्रकल्प पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र मिळालेल्या वर्षाच्या समाप्तीपासून एक वर्षानंतर गणला जाणार

३. अचल संपत्तीसाठी भांडवली लाभ करप्रणालीत तीन बदल :

ए. भांडवली लाभ म्हणून गणना करण्यासाठी तीन वर्षाऐवजी फक्त दोन वर्षांची आवश्यकता

बी. अचल संपत्तीसह सर्व मालमत्तांच्या वर्गवारीसाठी मिळकतीचे मूल्य मोजण्यासाठी आधारवर्ष १/४/१९८१ ऐवजी १/४/२००१ धरणार

सी. कराची रक्कम न भरता भांडवली लाभ गुंतवण्यासाठी आर्थिक साधनांचा विस्तार करणार

४. संयुक्त विकास करारासाठी भांडवली लाभ कर भरण्यासाठीचे दायित्व ज्या वर्षात रक्कम मिळाली आहे त्या वर्षात पूर्ण करावे लागेल.

५.आंध्रप्रदेशची राजधानीसाठी २.६.२०१४ रोजी जमिन मालकीची असलेल्या मालकांना एकत्रित जमीन यंत्रणेंतर्गत देण्यात आली असेल तर त्यांना भांडवली करातून सूट दिली जाईल.

**वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी उपाययोजना**

१. भारतात कर्ज दिलेल्या अथवा गुंतवणूक केलेल्या परदेशी कंपन्यांना मिळालेल्या व्याजावरील ५ टक्के कन्सेशनल विथहोल्डिंग दर ३० जून २०१७ नंतर आणखी तीन वर्षे कायम राहणार

२. नव उद्यमी (स्टार्ट अप्सना) गेल्या वर्षी दिलेल्या प्राप्तीकर सुट्टीच्या योजनेंतर्गत दोन अटी शिथील करण्यात आल्या आहेत.

ए. जोपर्यंत प्रवर्तकाची मूळ गुंतवणूक कमी होत नाही तोपर्यंत ५१ टक्के व्होटिंग राईट्स (मताधिकार) धारण करण्याची अट शिथिल करण्यात आली आहे.

बी. स्थापन झाल्याच्या तारखेपासून कोणत्याही ७ वर्षातील तीन वर्षे ही सवलत उपलब्ध राहील.

३. मॅट कर्ज मिळवण्यासाठीचा कालावधी १० वर्षांवरून वाढवून १५ वर्षे केला आहे.

४. २०१५-१६ मध्ये ५० कोटीपर्यंत उलाढाल असलेल्या कंपन्यांवरील कॉर्पोरेट कर ३० टक्क्यावरून कमी करून २५ टक्क्यांवर आणला आहे.याचा फायदा सध्या अस्तित्वात असलेल्या ६ लाख ६७ हजार कंपन्यांपैकी ९६ टक्के कंपन्यांना होणार आहे.



५. बँकांची बुडित कर्जे आता ७.५ टक्क्यातून वजा करण्याऐवजी ८.५ टक्क्यापर्यंत नफ्यातून वजा केली जाणार

६.गैरअनुसूचित सहकारी बँकांच्या बुडित कर्जाबाबत व्याज हे जेव्हा उत्पन्न होईल तेव्हाच मानले जाईल.

**डिजिटल अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन**

१. लहान व्यापाऱ्यांसाठी अनुमानित प्राप्तीकरांतर्गत, डिजिटल अथवा बँकिंग साधनांद्वारे झालेल्या उलाढालीच्या ६ टक्के उत्पन्न गृहित धरले जाईल.

२. स्वीकार्य रोख खर्च सध्याच्या २०,००० रुपयांवरून कमी करून १०,००० रुपयांवर आणणार.

३. ३ लाखांवरील व्यवहार रोखीने करण्यास बंदी. त्याचा भंग केल्यास तितक्याच रकमेचा दंड आकारला जाणार.

**निवडणूक निधीत पारदर्शकता**

१. राजकीय पक्षाला दिल्या जाणाऱ्या देणग्यांमध्ये कपात करुन प्रतिव्यक्ती २०,००० रुपयांवरून २,००० रुपयांवर आणणार

२. गोपनीयता राखून निवडणूक रोखे जारी करणार

३. राजकीय पक्षांना प्राप्ती कर कायद्यात निर्धारित केल्या नुसार ठराविक कालावधीत विवरणपत्रे भरावी लागणार

**उद्योगस्नेही (इज ऑफ डुइंग बिझनेस)**

१. दोनपैकी एक कंपनी विशिष्ट नफ्याशी संलग्न वजावटीचा फायदा घेत असेल तर देशांतर्गत हस्तांतरण मूल्यांकन लागू केले जाणार

२. अनुमानित योजनेचा पर्याय स्वीकारणाऱ्या व्यावसायिक कंपन्यांची ऑडिट मर्यादा १ कोटी रुपयांवरून २ कोटी रुपये करणार

३. ज्या व्यक्ती अथवा एचयूएफची उलाढाल २५ लाख रुपये अथवा उत्पन्न अडीच लाख रुपयांपर्यंत आहे, त्यांना बुक ऑफ अकाऊंट्स ठेवण्याची गरज नाही.

४. वर्ग १ व २ च्या परदेशी गुंतवणूकदारांना (फॉरिन पोर्टफोलिओ इन्व्हेस्टर) अप्रत्यक्ष हस्तांतरणच्या तरतुदीतून सवलत

५. वैयक्तिक विमा एजंट्सनी आपले उत्पन्न करपात्र उत्पन्नाच्या खाली आहे, असे प्रमाणपत्र दिल्यास ५ टक्के वजावट (टीडीएस) कापून घेतली जाणार नाही.

६. अनुमानित योजनेतील व्यावसायिकांना आगाऊ कर चारऐवजी फक्त एकाच हप्त्यात मार्चमध्ये भरता येईल.

७. करविवरण पत्रात सुधारणा करण्याची कालमर्यादा कमी करून १२ महिने करण्यात आली आहे. तसेच २०१९-२० पासून छाननीची कालमर्यादाही कमी करून आढावा वर्षापासून १२ महिने करण्यात येणार आहे.

**वैयक्तिक प्राप्तीकर**

१. अडीच लाख ते पाच लाख उत्पन्न गटातील वैयक्तिक प्राप्तीकर १० टक्क्यावरून घटवून ५ टक्के केला आहे. यामुळे त्यांचे कर भरण्याचे दायित्व निम्म्यावर आले आहे तर त्यापुढील उत्पन्न असलेल्या सर्वांनाही प्रतिव्यक्ती १२,५०० रुपये इतक्या कमी कराचा फायदा होणार आहे. (महसुली नुकसान १५,५०० कोटी रुपये)

२. अडीच लाख ते पाच लाख रुपये उत्पन्न असलेल्यांना करात देण्यात आलेली सवलत ५,००० रुपयांवरून २,५०० रुपये करण्यात आली असून ती आता फक्त अडीच ते साडेतीन लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्यांनाच लागू राहील.

३. ५० लाख ते १ कोटी रुपये उत्पन्न असलेल्या व्यक्तींना उत्पन्नावर १० टक्के अधिभार लागू केला आहे. (महसुली उत्पन्नात वाढ २,७०० कोटी रुपये)

**अप्रत्यक्ष कर**

१. एलएनजीवरील सीमा शुल्क ५ टक्क्यावरून घटवून २.५ टक्के. याचा फायदा रासायनिक आणि पेट्रोकेमिकल कंपन्यांना तसेच पोलाद उद्योगांना होणार आहे.

२. डिजिटल पेमेंटसाठी वापरण्यात येणाऱ्या अतिसूक्ष्म पीओएल कार्ड, मायक्रो एटीएम, हस्तरेषा ठशांचे वाचन करणारे, स्कॅनर, आयडी स्कॅनरसाठी सीमाशुल्क, सीव्हीडी, एसएडी आणि अबकारी शुल्क रद्द करण्यात आले आहे.

जीएसटीची गाडी मार्गावर. १ जुलै २०१७ पासून लागू होण्याची शक्यता

■■■

# अर्थसंकल्पाचे रोजगार आणि औद्योगिक विकासावर होणारे परिणाम

अरूप मित्रा



***भारत किंवा इतर कोणत्याही विकसनशील देशाने औद्योगिक क्षेत्राचे पुनरूज्जीवन करण्यावर भर द्यायला हवा कारण सेवा क्षेत्रामध्ये अकुशल किंवा अर्धकुशल कामगारांना सामावून घेता येईल इतक्या रोजगार संधी उपलब्ध होत नाहीत. तसेच कृषी क्षेत्रात मुळातच बेरोजगारी खूप प्रमाणात आहे. कच्च्या मालाचा पुरवठा वाढवून होणाऱ्या विकासापेक्षाही तंत्रज्ञानातल्या नवनवीन शोधांमुळे औद्योगिक क्षेत्रातल्या रोजगार संधी लक्षणीयरित्या वाढवता येतात.***

रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि औदयोगिक विकास साधणे यांना कोणत्याही सरकारची मुख्य उद्दीष्टे असे म्हटले जाते. याचसाठी भारत किंवा इतर कोणत्याही विकसनशील देशाने औद्योगिक क्षेत्राचे पुनरूज्जीवन करण्यावर भर द्यायला हवा कारण सेवा क्षेत्रामध्ये अकुशल किंवा अर्धकुशल कामगारांना सामावून घेता येईल इतक्या रोजगार संधी उपलब्ध होत नाहीत. तसेच कृषी क्षेत्रात मुळातच बेरोजगारी खूप प्रमाणात आहे. कच्च्या मालाचा पुरवठा वाढवून होणाऱ्या विकासापेक्षाही तंत्रज्ञानातल्या नवनवीन शोधांमुळे औद्योगिक क्षेत्रातल्या रोजगार संधी लक्षणीयरित्या वाढवता येतात. तंत्रज्ञानातले आधुनिक शोध हे रोजगार संधी वाढायला प्रवृत्त करणारे महत्त्वाचे घटक असले तरीही नुकत्याच झालेल्या संशोधनानुसार (विवरेली २०१३) असे अनेक मार्ग आहेत. ज्यांच्या अवलंबनामुळे रोजगार संधी वाढवता येतात. उत्पादनांमध्ये विविधता राखणे, भांडवल आणि मालामध्ये वाढ न करता नवीन उत्पादने आणि उप उत्पादने तयार करायला सुरूवात करणे आणि सगळयात महत्वाचे म्हणजे यासाठी मोठया प्रमाणावर नवीन तंत्रज्ञानाचा अंगिकार करणे यामुळे रोजगार वाढवता येतील. म्हणजेच वाढीव उत्पादन आणि उपलब्ध रोजगारांमध्ये वाढ या दोन्ही गोष्टी एकाच वेळी साधता येतील आणि त्यासुध्दा वाढीव व्यापाराची गरज न भासता. यासर्व पार्श्वभूमीवर नजिकच्या काळातले परिणाम समजून घेण्यासाठी आणि त्याचा दीर्घकालीन लक्ष्यांवर होणारा परिणाम लक्षात घेण्यासाठी २०१७-१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पावर एक धावती नजर टाकणे आवश्यक आहे.

काही काळापूर्वीच ऐतिहासिक अशा विमुद्रीकरणाला आपण सामोरे गेलो आणि त्याचा नजिकच्या भविष्यात देशाच्या विकासावर विपरीत परिणाम होईल ज्यायोगे बेरोजगारी वाढेल अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. शहरी भागातल्या अकृषक गुंतवणुकीवर आणि पर्यायाने तिथल्या विकासावर जास्त परिणाम दिसून येतील. त्यामुळे शहरी भागातला बेरोजगारीचा दरही वाढेल आणि रोजगाराच्या कमी संधी उपलब्ध होतील. गुंतवणुक विकास आणि रोजगार संधी यांच्या संदर्भात उत्पादन आणि सेवा क्षेत्रात असलेले मध्यम आणि छोटे दोन्ही प्रकारच्या उदयोगांना याचा फटका बसण्याची शक्यता आहे. मोठे उदयोग देखील यातून पूर्णपणे वाचणार नाहीत. आवश्यक नियमावलीला फाटा देऊन व्यवसाय करण्यासाठी अनेक व्यावसायिक, भ्रष्ट

व्यवस्थेचा अंगिकार करतात आणि लाच देऊन बिनबोभाटपणे नियम मोडून व्यवसाय करत राहतात त्यांनाही आता पर्याय उपलब्ध राहिलेला नाही. गुंतवणुकीतल्या कपातीचा सर्वांवर प्राथमिक नकारात्मक परिणाम कामगारांच्या मागणीत घट हाच असतो. कारण सध्याच्या कंत्राटी कामगार पध्दतीच्या जमान्यात कामगार हा एकच घटक असा असतो तो इतर घटकांच्या तुलनेत सहजतेने कमी करता येतो. त्यामुळे बाजारातल्या घसरणीला तोंड देण्यासाठी कामगार कपात करून खर्च कमी करणे हा व्यावसायिकांसाठी सगळया सोप्या रीतीने अंमलात आणण्यासारखा उपाय असतो. ग्रामीण भागात, कृषी क्षेत्रात मोठया प्रमाणावर कामगार सामावून घेण्याची क्षमता नसल्याने दैनंदिन व्यवहारात रोख रकमेची गरज लागणाऱ्या अकृषक उद्योगांमध्ये अनेक जण रोजगार मिळवतात. त्यामुळे विमुद्रीकरणाचा प्रभाव ग्रामीण भागातल्या अकृषक क्षेत्राचा विकास आणि त्यातल्या रोजगार संधीवर पडणे अनिवार्य आहे. अर्थात यातले अनेक अंदाज अतिषयोक्तीपूर्ण असू शकतील कारण कोणत्याही उदयोगात मोठया प्रमाणावर प्रतिकात्मक देवाण घेवाण होत असते आणि त्याला लक्षणीय वेळ लागत असतो. म्हणून हा वेळाच्या अंतराचा परीणाम लक्षात घेतला तर विमुद्रीकरणामुळे विकासाला खीळ बसविण्याचा प्रभाव बऱ्याच अंशी निश्क्रीय होऊन जाईल अशी शक्यता जास्त आहे. सत्तरच्या दषकात ज्याप्रमाणे बॅकांचे राष्ट्रीयीकरण आवश्यक होते. त्याचप्रमाणे आताच्या काळात विमुद्रीकरण होणे अत्यंत गरजेचे होते आणि बऱ्याच काळापासून हा निर्णय प्रलंबित होता.

विमुद्रीकरणाचे नजिकच्या काळात होऊ शकणारे नकारात्मक परिणाम लक्षात घेऊन केंद्रीय अर्थसंकल्पात 'मनरेगा' योजनेसाठी सर्वांत जास्त निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे जेणेकरून रोजगार संधीमधली तूट काही प्रमाणात लगेच भरून काढता येऊ शकेल. भविश्यातल्या देशाच्या विकासाला हातभार लावू शकेल अशा प्रकारचे काम रोजगार हमी योजनेतून उभे रहात नाही अशी टीका या कार्यक्रमावर होत होती. मात्र नव्या अर्थसंकल्पात 'मनरेगा'च्या कामांचे नियोजन अशा प्रकारे करण्यात आले की ज्यामध्ये आर्थिक वर्षाच्या शेवटी जर या कामांची सुरूवात झाली नसेल किंवा त्यात प्रगती दिसत नसेल तर त्यासाठी मंजूर झालेला निधी परत जाण्याची परिस्थिती कधीच उद्भवणार नाही. दूष्काळापासुन वाचण्यासाठी वर्ष २०१७-१८ या वर्शात ५ लाख तळी बांधण्याचा प्रस्ताव सरकारकडे आहे. जर ही सिंचन व्यवस्था योजना 'मनरेगा' योजनेशी जोडण्यात आली तर कृषी क्षेत्राच्या विकासासाठी तिचा उपयोग होईलच पण त्या सोबतच तो रोजगार शोधणाऱ्या नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठीचा परिणामकारक आणि योजनाबध्द उपक्रम ठरेल. ग्रामीण, कृषी आणि इतर संबंधित क्षेत्रासाठी गेल्या वर्षी पेक्षा यावर्षी २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात २४ टक्के जास्त निधी मंजूर केला आहे. यावरून हेच दिसून येते की, सरकारला ग्रामीण भागातली बेरोजगारी, कमी झालेल्या रोजगार संधी आणि गरीबी या प्रश्नांचा जास्त तीव्रतेने मुकाबला करायचा आहे.

***प्रधानमंत्र्यांच्यां रोजगार निर्माण आणि अनुदान योजनेतल्या निधीचे वाटप ३ वेळा टप्प्याटप्प्याने होणार आहे. ही योजना निधी पुरवठयावर आधारीत अनुदान योजना आहे. ज्यामध्ये ग्रामीण रोजगार निर्माण योजना आणि प्रधानमंत्री रोजगार योजना यांचे एकत्रीकरण केलेले आहे. सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाद्वारे ही योजना प्रशासित केली असून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी खादी आणि ग्रामीण उद्योग आयोगाद्वारे होणार आहे.***

प्रधानमंत्र्यांच्या रोजगार निर्माण आणि अनुदान योजनेतल्या निधीचे वाटप ३ वेळा टप्प्याटप्प्याने होणार आहे. ही योजना निधी पुरवठयावर आधारीत अनुदान योजना आहे. ज्यामध्ये ग्रामीण रोजगार निर्माण योजना आणि प्रधानमंत्री रोजगार योजना यांचे एकत्रीकरण केलेले आहे. सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाद्वारे ही योजना प्रशासित केली असून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी खादी आणि ग्रामीण उद्योग आयोगाद्वारे होणार आहे. राज्यपातळीवर आयोगाचे संचालक हा कार्यक्रम राबवणार आहेत. स्वयं-रोजगार प्रकल्प, सूक्ष्म उदयोग आणि इतर प्रकल्पांद्वारे ग्रामीण तसेच शहरी अशा दोन्ही भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा प्राथमिक उद्देश आहे. तसेच ग्रामीण कारागिरांची परंपरा पुनरूज्जीवित करणे आणि ज्या शहरी युवकांना रोजगार मिळण्यात अडचणी येत आहेत अशांना रोजगार शोधून द्यायला मदत करणे हा या कार्यक्रमाचा दुहेरी उद्देश आहे. सातत्यपूर्ण आणि शाश्वत रोजगार पुरविणे आणि लाभार्थ्यांची मिळकत क्षमता वाढविणे हे या कार्यक्रमाचे लक्ष्य आहे.

देशभरातल्या डिजीटल व्यवहारांना

उत्तेजन देण्याच्या सरकारच्या धोरणाला अनुसरून अर्थसंकल्पाने हे अधोरेखित केले आहे की सूक्ष्म आणि लघु उद्योगांना औपचारिकरित्या निधी मिळण्यासाठी वाढत्या डिजीटल व्यवहारांची अत्यंत मोठी मदत होणार आहे. या उद्योगांच्या उत्पादकतेमध्ये होणारी वाढ आणि स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या वाढीमध्ये या उद्योगांचा अर्थपूर्ण सहभाग हे काही आशादायक अपेक्षांचे किरण आहेत ज्यामुळे विमुद्रीकरणामुळे उद्योगांना ज्या नकारात्मक गोष्टींना तोंड दयावे लागले त्यांचा प्रभाव बऱ्यापैकी कमी होईल. सूक्ष्म आणि लघु उद्योगांच्या संख्येचा विचार केला तरी ती खूप मोठी आहे पण दर्जा वाढीचा दृष्टीने त्यांचा सहभाग नगण्य आहे. वस्तुनिर्माण क्षेत्रातल्या नोंदणी न केलेल्या कंपनीचे उदाहरण आपण घेऊ या. वस्तुनिर्माणातल्या एकूण दर्जात्मक उत्पादनांचा विचार करता अशा कंपन्या एक तृतीयांश असतील. देशपातळीसारख्या विस्तृत रूंदावलेल्या कक्षेचा विचार करता त्यांना डिजीटल व्यवहार करायची सवय लावणे अत्यंत चित्तवेधक ठरू शकेल विशेषत: जर आपण हे लक्षात घेतलं की सुसंघटीत वस्तुनिर्माण कंपनी सुध्दा कामगारांची गरज आणि पुरवठा यांच्यातली तफावत दूर करू शकत नाही. कर भरणे टाळण्यासाठी अनेक व्यावसायिक बिगरनोंदणीकृत किंवा अनौपचारीक वा घरगुती क्षेत्रात व्यवसाय करण्याला प्राधान्य देतात आणि त्यांचा व्यवसाय अनेक पातळयांवर किंवा छोटया भागांमध्ये विभागून करतात. डिजीटायझेशन व्यवसायाच्या दृढीकरणाला उपयुक्त ठरू शकेल जेणेकरून करांची वसुली सोयीची होऊ शकेल. तसेच या काठावर तग धरून असणाऱ्या व्यवसायाच्या छोटया भागांना त्याचीं आर्थिक स्थिती आणि कामगिरी सुधारता येईल ज्या छोटया व्यावसायिकांकडे डेबिट कार्ड्स किंवा मोबाईल फोन्स नाहीत त्यांच्यासाठी व्यापाऱ्यांना सोयीची आधार कार्डा संबंधित भरणा यंत्रणा सुरू करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

सुमारे ५० कोटी रूपये किंवा त्यापेक्षा कमी वार्षिक उलाढाल असलेल्या छोटया कंपन्याना तुलनेने कमी म्हणजे २५ टक्के कर भरावा लागेल. त्यामुळे

***अत्यंत आधुनिक तांत्रिक संरचनेसोबत येणारी परदेशी गुंतवणूक हया मुद्दयाकडे अर्थसंकल्पात मोठया प्रमाणावर लक्ष केंद्रीत केले आहे. थेट परदेशी गुंतवणुकीपैकी सुमारे ९० टक्क्यांपेक्षा जास्त भाग स्वयंचलित रितीने आपोआप हस्तांतरीत होण्याचा प्रस्ताव असताना आणि परदेशी गुंतवणूक प्रोत्साहन मंडळ बरखास्त केलेले असताना आता नोकरशाही पध्दतीमुळे होणारा उशीर टाळून आर्थिक हालचाली वेगाने होतील.***

आधुनिक उदयोगांमध्ये अधिकाधिक गुंतवणूक होण्याची शक्यता दिसत आहे. आणि या प्रक्रियेत औद्योगिक विकास आणि रोजगाराच्या संधी दोन्हीमध्ये वाढ होईल अशी अपेक्षा आहे. दुसरीकडे अत्यंत आधुनिक तांत्रिक संरचनेसोबत येणारी परदेशी गुंतवणूक हया मुद्दयाकडे अर्थसंकल्पात मोठया प्रमाणावर लक्ष केंद्रीत केले आहे. थेट परदेशी गुंतवणुकीपैकी सुमारे ९० टक्क्यांपेक्षा जास्त भाग स्वयंचलित रितीने आपोआप हस्तांतरीत होण्याचा प्रस्ताव असताना आणि परदेशी गुंतवणूक प्रोत्साहन मंडळ बरखास्त केलेले असताना आता नोकरशाही पध्दतीमुळे होणारा उशीर टाळून आर्थिक हालचाली वेगाने होतील. अशी अपेक्षा आहे. अर्थसंकल्पातली थेट परदेशी गुंतवणुकीतली ३६ टक्क्याची वाढ गुंतवणुकीला मोठया प्रमाणावर चालना देईल आणि त्यामुळे रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणावर उपलब्ध होतील. औदयोगिक क्षेत्रातल्या उत्पादन वाढीच्या निर्णयासाठी अनेक मुद्दे विचारात घ्यायला हवेत. त्यामध्ये खुल्या वातावरणाला व्यापार, संचयावर आधारीत अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा आणि माहिती दळणवळण तंत्रज्ञान तसेच नूतनीकरण हे चार घटक त्यापैकी अत्यंत महत्वाचे आहेत. नूतनीकरण हा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. जो उत्पादकता वाढवू शकतो. नूतनीकरणाच्या प्रयोगाने उच्च प्रतीचे तंत्रज्ञान मिळवता येते. ज्याचा उपयोग करून अनावश्यक, जास्तीची गुंतवणुक टाळून विकासाचा वेग वाढवता येतो. त्यासोबतच पायाभूत सुविधांचे महत्व आज सर्वदूर ज्ञात आहे. उदाहरणार्थ उत्पादकता आणि तांत्रिक कार्यक्षमता वाढवण्यासाठी सार्वजनिक पायाभूत सुविधांची उपलब्धता हा कळीचा मुद्दा ठरतो. उत्पादनातल्या इतर घटकांसोबत आणि इतर बाहय अर्थव्यवस्थांचा त्याच पातळीवर विचार करून पायाभूत सुविधांबरोबर त्यांचा सहयोगी नातेसंबंध असायला हवा. कामगार वर्गाला कमी रोजगार उपलब्ध होणे, याचा गुंतवणुक आणि रोजगार विकासावर मोठा दबाव रहात असतो. मात्र गेल्या काही काळात वस्तुनिर्माण क्षेत्राचा विचार करता ही तफावत

बऱ्यापैकी कमी झालेली दिसत आहे (मित्रा, २०१३) केंद्रीय अर्थसंकल्पात या दबावावर पध्दतशीर उपाय सुचवलेले दिसत आहेत. अर्थसंकल्पात प्रस्तावित केल्यानुसार २०१७-१८ या वर्षात केंद्र सरकार 'संकल्प' नावाची योजना सुरू करणार आहे. सुमारे ४००० कोटी रूपये खर्चाच्या या योजनेद्वारे कौशल्य संपादन आणि माहिती जागृतीच्या आधारे रोजगार मिळविण्यासाठी मदत होणार आहे. या 'संकल्प' योजनेतून सुमारे साडेतीन कोटी युवकांना बाजाराशी संबंधित ज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. सुमारे ६०० जिल्हयांमध्ये प्रधानमंत्री कौशल्य केंद्राची स्थापना केली जाणार आहे. तसेच नागरिकांना मदत करण्यासाठी शंभर आंतरराष्ट्रीय कौशल्य केंद्रे उभारण्याची केंद्र सरकारची योजना आहे. ही कौशल्य केंद्रे म्हणजे सार्वजनिक कौशल्य केंद्रे असतील ज्यात ग्रामीण भागातल्या नागरिकांच्या प्रगतीवर जास्त भर असेल. या केंद्रामध्ये भाषाज्ञान वर्ग, डिजीटल वाचनालय परिक्षण आणि व्यवसाय मार्गदर्षन केंद्र तसेच कौशल्य विकासवर्ग अशा सोयी आहेत. या सगळयांमुळे रोजगार निर्मिती वाढायला मदत होईल अशा अपेक्षा आहे.

इंडिया इंटरनॅशनल स्किल्स सेंटर ची कल्पना देशभरात राबवली जाणार आहे. या केंद्रामध्ये परदेशी भाषांसंबंधी आधुनिक प्रशिक्षण आणि अभ्यासक्रम उपलब्ध होणार असल्यामुळे ही केंद्राची खरोखरच उत्साहवर्धक आहे. देशाबाहेर नोकरीच्या संधी शोधणाऱ्यासाठी या केंद्राची मोठी मदत होणार आहे. सध्याच्या तंत्रशिक्षण केंद्रामध्ये शिक्षण घेणाऱ्यांना जे प्रशिक्षण मिळत आहे त्याच्या दर्जावर मोठया प्रमाणात टीका होत आहे. एखादया नळकारागिराला मध्य पूर्वेत नोकरीसाठी पाठवण्याआधी भरती करणाऱ्या संस्थेकडून त्याच्यावर मोठया प्रमाणावर निर्बंध घातले जातात, अशा प्रकारचा आरोप होत आहे. हे लक्षात घेतले तर आताच्या सरकारने अत्यंत उत्साहवर्धक पावले उचलली आहेत असे म्हणावे लागेल. नव्या बदलांमुळे देशादरम्यान कामगारांचे आवागमन सोपे होईल, देशांतर्गत अर्थव्यवस्थेवरचा अधिकचा भार कमी होईल आणि

---

***अर्थसंकल्पात प्रस्तावित केल्यानुसार २०१७-१८ या वर्षात केंद्र सरकार 'संकल्प' नावाची योजना सुरू करणार आहे. सुमारे ४००० कोटी रूपये खर्चाच्या या योजनेद्वारे कौशल्य संपादन आणि माहिती जागृतीच्या आधारे रोजगार मिळविण्यासाठी मदत होणार आहे. या 'संकल्प' योजनेतून सुमारे साडेतीन कोटी युवकांना बाजाराशी संबंधित ज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.***

---

दुसरीकडे परदेशात नोकरीधंदा करणाऱ्या कामगारांनी घरी पाठवलेल्या पैशामुळे देशाच्या परकीय गंगाजळीत लक्षणीय वाढ होत राहील. परदेशातून नागरिकांनी पाठवलेल्या पैशामुळे देशात राहणाऱ्या त्यांच्या नातेवाईकांना त्याचा लाभ घेता येतो. अशा बाहेरून आलेल्या पैशांचा विनियोग देशात काही उत्पादक मालमत्ता घडवण्यासाठी कसा होवू शकेल? आणि त्यासाठी अशा प्रकारच्या गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारी यंत्रणा कशी तयार करता येईल? हा भविष्यातला धोरणात्मक निर्णय असेल. आंतरराष्ट्रीय प्रमाणकांशी जुळणारा आणि सतत प्रगती करून देशाला प्रगतिपथावर नेणारा कामगार वर्ग तयार करण्यासाठी सरकारने हाती घेतलेल्या मोहिमेचा हा पहिला टप्पा आहे आणि त्यातून सरकारकडे असलेली प्रगतिशील दूरदृष्टी दिसून येते आहे.

पायाभूत सुविधांची उभारणी खूप मोठया प्रमाणावर होत असते. या सुविधांसाठी मोठया आकाराच्या भागांची उभारणी करावी लागते, त्यासाठी मोठया प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता लागत असल्यामुळे हा देखील एक रोजगार निर्मितीचा मोठा स्त्रोत बनू शकेल. तरीही पायाभूत सुविधांच्या उभारणीच्या योजनेला जर प्रादेशिक निती लावल्या तर मिळणारा परिणाम अपेक्षेपेक्षाही खूप जास्त असेल. गेल्या काही काळात प्रादेशिक असमानता, मतभेद वाढलेले दिसत आहेत. राज्या-राज्यांनी एकत्रित येऊन विकास साधण्याऐवजी आर्थिक विकासाच्या मुदयावरून तफावत वाढताना दिसत आहे. जे भाग इतरांपेक्षा मागासलेले राहीले आहेत अशा भागांमध्ये पायाभूत सुविधांच्या उभारणीला प्राधान्य देणे हा प्रादेशिक असमानता कमी करण्याचा एक परिणामकारक उपाय ठरू शकतो. अर्थात आपण हे समजून घ्यायला हवे की केंद्रीकरणामुळे संचयाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळते आणि अशा अर्थव्यवस्थेला फायदेशीर ठरण्यासाठी सुरूवातीचा अर्थगर्भ पाया जिथे आधीच तयार आहे अशा ठिकाणी गुंतवणुकीचा ओघ कायम रहायला हवा. मात्र या प्रक्रियेमध्ये काही भाग पूर्णत: दुर्लक्षित रहातात, उदाहरणार्थ औदयोगिकीकरण हे प्रदेश केंद्रीत झाल्यामुळे उदयोगांच्या आजूबाजूचा परिसर विकसित होतो आणि इतर भाग मागासलेलाच राहतो. ज्यामुळे प्रादेशिक

तणाव निर्माण होतो. या समस्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी, जेव्हा पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा मुद्दा येतो तेव्हा प्रादेशिक दृष्टीकोन बाळगणे जास्त इश्ट आहे. ईशान्येकडच्या राज्यांमध्ये औद्योगिकीकरणाचा वेग अगदीच कमी आहे, हे विचारात घ्यायला हवे.

या खेरीज, युवकांसाठी नोकरीच्या नव्या संधी उपलब्ध करून देणारी नवी मेट्रो रेल्वे नीती लवकरच जाहीर करण्याचा सरकारचा विचार आहे. शहरी भागातल्या शिक्षित युवकांना त्यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. नव्या मेट्रो रेल्वे प्रकल्पामुळे पायाभूत सुविधांचे जाळे वाढेल, दळणवळणाची कार्यक्षमता सुधारेल आणि रेल्वेचा कारभार सुधारेल. ग्रामीण भागाकडून शहरांकडे स्थलांतरीत होण्याची नागरीकांची एकूण मानसिकता लक्षात घेता वाढत्या शहरी लोकसंख्येसाठी असे रोजगाराभिमुख प्रकल्प शहरांमध्ये राबविणे योग्य ठरणार आहे.

तरीही जर उद्योगांमुळे होणाऱ्या विकासावर लक्ष केंद्रीत करायचे असेल तर वस्तुनिर्माण क्षेत्रासाठी अजून भरीव कार्य करायला हवे. उत्पादनाला चालना देवून, रोजगार निर्मिती करून आणि निर्यातीला पुनरूज्जीवन देऊन 'मेक इन इंडिया' मोहिमेचा एक भाग म्हणून सरकारने चामडे, मौल्यवान खडे आणि दागिन्यांच्या निर्मीतीसह इतर कामगार केंद्रीत उद्योगांना कर सवलत देण्याचा विचार करायला हवा. चीनच्या धर्तीवर उत्पादन केंद्रे, सार्वजनिक सुविधा, निवासी क्षेत्र, शाळा तसेच महाविदयालयांच्या सोयी अंतर्भूत असलेल्या महा-औद्योगिक शहरांची उभारणी आपल्या स्मार्ट सिटी कार्यक्रमात करता येणे जरा दुरापास्तच आहे. मात्र २०१७ च्या अर्थसंकल्पात अशा प्रकारच्या विकास केंद्रासाठी काही विशेष आर्थिक प्रावधान केल्याचे सहजपणे लक्षात येत नाही. कामगाराला केंद्रस्थानी ठेवून वस्तु निर्माणवर आधारीत औद्योगिकीकरणावर या अर्थसंकल्पात विषेश लक्ष दिल्याचे दिसत नाही. आपल्या देशाच्या लोकसंख्येपैकी अधिकांश लोक अजूनही ग्रामीण भागात राहतात आणि त्यातले निम्मे लोक कृषी क्षेत्रात कार्यरत आहेत हे सत्य लक्षात घेता या नागरिकांना संरक्षण आणि रोजगार देण्याची हमी देणारा अर्थसंकल्प कृषी क्षेत्र आणि ग्रामीण भागाकडे जास्त लक्ष पुरवणारा आहे. तरीही कामगार केंद्रीत वस्तुनिर्माण उद्योग आधुनिक करण्यासाठी मदत करणे, निर्यातीत वाढ होण्याकरिता दर्जेदार उत्पादनांच्या निर्मितीसाठी उद्योगांना मदत करणे आणि या उद्योगांनी देशविकासात तसेच रोजगार निर्मितीत हातभार लावावा यासाठी त्यांच्या विस्ताराला मदत करणे या गोष्टींना प्रत्यक्षात जायला अजून थोडा वेळ लागेल. नवीन तंत्रज्ञान फक्त आयात करून वापरण्यासोबतच उत्पादकता आणि रोजगार वाढवण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचे संशोधन करणे या दोन्ही गोष्टी भविष्यात महत्वाच्या ठरणार आहेत.

***युवकांसाठी नोकरीच्या नव्या संधी उपलब्ध करून देणारी नवी मेट्रो रेल्वे नीती लवकरच जाहीर करण्याचा सरकारचा विचार आहे. शहरी भागातल्या शिक्षित युवकांना त्यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. नव्या मेट्रो रेल्वे प्रकल्पामुळे पायाभूत सुविधांचे जाळे वाढेल, दळणवळणाची कार्यक्षमता सुधारेल आणि रेल्वेचा कारभार सुधारेल. ग्रामीण भागाकडून शहरांकडे स्थलांतरीत होण्याची नागरीकांची एकूण मानसिकता लक्षात घेता वाढत्या शहरी लोकसंख्येसाठी असे रोजगाराभिमुख प्रकल्प शहरांमध्ये राबविणे योग्य ठरणार आहे.***

■■■

*लेखक आर्थिक विकास संस्था, नवी दिल्ली येथे कार्यरत असून नावाजलेले अर्थतज्ञ आहेत*

e-mail: arup@iegindia.org

# लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी UNICODE (Mangal) or KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत,

हे नम्र आवाहन.

# महसूल जमा करण्याचे प्रयत्न आणि अर्थसंकल्प

मालिनी चक्रवर्ती



***या वर्षीच्या अर्थसंकल्पात करांच्या आघाडीवर विशेषत: प्रत्यक्ष करांमध्ये अनेक बदल समाविष्ट आहेत. यासंदर्भातील मुख्य बदलांपैकी एक म्हणजे वैयक्तिक प्राप्तीकराचा दर सर्वात खालच्या कराच्या स्लॅबमध्ये (अडीच लाख ते पाच लाख) असलेल्यांसाठी 10 टक्क्यावरून 5 टक्क्यावर आणणे हा आहे. त्याचवेळेस लाभांची पुनरुक्ती होऊ नये म्हणून ज्यांचे उत्पन्न 5 लाख रुपयांपर्यंत आहे, त्या व्यक्तींसाठी असलेली कमाल 5,000 रुपयांची सवलत ( परिच्छेद 87अ अंतर्गत) कमी करुन 2,500 रुपयांपर्यंत आणली आहे.***

सरकारच्या निश्चलनीकरणाच्या मोहीमेमुळे लोकसंख्येच्या मोठ्या गटाला होत असलेल्या त्रासाच्या नंतर येत असलेल्या अर्थसंकल्प २०१७-१८ च्या अगोदर करांची रचना, कराची किमान मर्यादा, करसवलती यांत मोठे बदल केले जातील, अशा अपेक्षा अनेकांना होत्या. मात्र मोठ्या विकसनशील देशांमध्ये भारतातील करांचा जीडीपीतील वाटा सर्वात कमी असल्याचे लक्षात घेता सरकारसाठी करांचे दर कमी करणे ही अतिशय अवघड गोष्ट होती.

तरीसुद्धा, या वर्षीच्या अर्थसंकल्पात करांच्या आघाडीवर विशेषत: प्रत्यक्ष करांमध्ये अनेक बदल समाविष्ट आहेत. यासंदर्भातील मुख्य बदलांपैकी एक म्हणजे वैयक्तिक प्राप्तीकराचा दर सर्वात खालच्या कराच्या स्लॅबमध्ये (अडीच लाख ते पाच लाख) असलेल्यांसाठी १० टक्क्यावरून ५ टक्क्यावर आणणे हा आहे. त्याचवेळेस लाभांची पुनरुक्ती होऊ नये म्हणून ज्यांचे उत्पन्न ५ लाख रुपयांपर्यंत आहे, त्या व्यक्तींसाठी असलेली कमाल ५,००० रुपयांची सवलत ( परिच्छेद ८७अ अंतर्गत) कमी करुन २,५०० रुपयांपर्यंत आणली आहे. ही सवलत घेण्यासाठी असलेल्या निकषांतही बदल करण्यात आला असून आता ही सवलत ३ लाख ५० हजार निव्वळ उत्पन्न असलेल्यांना लागू आहे. या व्यतिरिक्त ज्या व्यक्तींचे करपात्र उत्पन्न इतर व्यावसायिक उत्पन्नाशिवाय पाच लाख रुपये आहे, अशांसाठी प्राप्ती कर भरणेही अत्यंत सुटसुटीत केले असून केवळ एक पानी अर्ज भरावा लागणार आहे. प्राप्तीकर विवरणपत्र भरण्याची सुटसुटीत प्रक्रिया आणि सर्वात खालच्या कराच्या स्लॅबमध्ये असलेल्यांसाठी कर कपात यामुळे अधिक लोकांना कराच्या जाळ्यात येण्यासाठी उद्युक्त केले जाण्याची अपेक्षा आहे.

उच्च प्राप्तीकर गटामध्ये ज्यांचे वार्षिक उत्पन्न ५० लाख ते १ कोटी आहे, अशांसाठी १० टक्के अधिभार लावण्याचा स्वागतार्ह निर्णय घेतला आहे. १ कोटी रुपयांहून अधिक करपात्र उत्पन्न असलेल्यांना सध्याचा असलेला १५ टक्के अधिभार कायम राहणार आहे.

वैयक्तिक प्राप्तीकरातील या बदलांशिवाय इतर प्रत्यक्ष करांमध्येही काही बदल करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, लहान कंपन्यांची व्यवहार्यता सुधारण्यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम स्वरुपाच्या कंपन्या ज्यांची वार्षिक उलाढाल ५० कोटी रुपयांपर्यंत आहे, त्यांना कंपनी प्राप्तीकरात ३० टक्क्यांवरून २५ टक्के कपात

करण्यात आली आहे. दीर्घ मुदतीच्या भांडवली लाभ करामध्येही जमीन आणि इमारतीसंदर्भातील तरतुदींमध्येही बदल करण्यात आले आहेत. या संदर्भात एलटीजीजी करातील सवलतीला पात्र होण्यासाठी अचल मालमत्तेच्या बाबतीत धारण कालावधी तीन वर्षांवरून दोन वर्षांवर आणला आहे. या शिवाय स्थिर संपत्तीसह सर्व प्रकारच्या मिळकतीची सूची तयार करण्याच्या प्रघाताचे आधारभूत वर्ष १ एप्रिल १९८१ वरून १ एप्रिल २००१ करण्यात आले आहे.

अप्रत्यक्ष कर जसे की सीमा शुल्क, अबकारी शुल्क आदीसंदर्भातही काही बदल घडवण्यात आले आहेत. देशांतर्गत मूल्यवर्धन, देशांतर्गत उद्योगांना पुरेसे संरक्षण, रोखविरहित व्यवहारांना उत्तेजन आणि देशांतर्गत उत्पादनांना चालना या हेतूने हे बदल केले आहेत.

**करदात्यांसाठी संभाव्य परिणाम**

सर्वात खालच्या वैयक्तिक प्राप्ती कराच्या गटात असलेल्यांसाठी कर कमी करण्याबरोबरच इतर कराच्या स्लॅबसाठी कर जुनेच ठेवण्याचा परिणाम ५० लाख रुपयांचे वार्षिक करपात्र उत्पन्न असलेल्या करदात्यांसाठी करांचे दायित्व कमी होण्यात झाला आहे. खाली दिलेल्या तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे ३ लाख ५० हजार वार्षिक उत्पन्न असलेल्या करदात्यांना होणारा लाभ २,५७५ रुपये असून उत्पन्नाच्या शिडीवरून वरती जातील तसे हा लाभ १२,८७५ रुपयांपर्यंत जाईल. वैयक्तिक प्राप्तीकरातील बदलाचा सर्वात महत्वाचा परिणाम ५० लाख रुपयांहून अधिक करपात्र उत्पन्न असलेल्यांवरील अपेक्षित परिणामाशी संबंधित आहे. १० टक्के अधिभार लावण्यात आल्यामुळे या वर्गातील व्यक्तींवरील निव्वळ कराचा बोजा वाढणार आहे. (तक्ता १) १० टक्के अधिभारामुळे सर्वात खालच्या कराच्या स्लॅबमधील व्यक्तींना करकपातीमुळे होणारा लाभ भरून निघणार आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर अतिश्रीमंतांवरील कराचा बोजा आणखी वाढणार असा याचा अर्थ आहे.

Table 1: An Illustration of Impact of Changes in Personal Income Tax in theBudget 2017-18

| Annual Taxable Income | Existing Tax | New Tax | Gain/Loss |
|---|---|---|---|
| Rs. 2.5 Lakh | - | - | - |
| Rs. 3.5 Lakh | 5,150 | 2,575* | (+) 2575 |
| Rs. 5 Lakh | 20,600 | 12,875* | (+) 7725 |
| Rs. 10 Lakh | 1,28,750 | 1,15,875 | (+) 12875 |
| Rs. 50 Lakh | 13,64,750 | 13,51,875 | (+) 12875 |
| Rs. 60 Lakh | 16,73,750 | 18,26,963 | (-) 1,53,213 |
| Rs. 75 Lakh | 21,37,250 | 23,36,812.5 | (-) 1,99,562.5 |

वर उल्लेख केलेल्या एलटीजीजी करांच्या तरतुदीतील बदलांमुळे मालमत्ता धारकांसाठीही लाभ होण्याची शक्यता आहे. दीर्घ मुदतीची मालमत्ता म्हणून पात्र ठरणारी स्थावर संपत्ती धारण करण्याचा कालावधी कमी केल्यामुळे मालक आता ही मालमत्ता दोन वर्षांनी विकून टाकू शकतील (तीन वर्षे वाट पाहण्याची आता गरज नाही) आणि कमी केलेल्या एलटीजीजी कराचा फायदा त्यांना घेता येईल. ( अल्प मुदतीच्या भांडवली लाभ कराच्या तुलनेत). दुसरे म्हणजे, आधारभूत वर्ष बदलल्यामुळे अनेक वर्षांपूर्वी खरेदी केलेल्या मालमत्ता विकताना भांडवली लाभ कराचे दायित्व कमी होणार आहे कारण मालमत्ता खरेदी केल्याची तारीख आणि एप्रिल २००१ यातील अभिमूल्यन संपूर्णपणे करमुक्त असेल.

शेवटी, लहान कंपन्यांना त्यांची व्यवहार्यता वाढवण्यासाठी देण्यात आलेली कर सवलत सकारात्मक निर्णय आहे. तरीसुद्धा जे सूक्ष्म, लघु व मध्यम स्वरुपाचे व्यवसाय नफ्यात आहेत,त्यांनाच ही सवलत लागू असून मोठ्या प्रमाणावरील कंपन्या ज्या फक्त आपला खर्च भागवण्याइतकेच उत्पन्न मिळवतात, त्यांना याचा फारसा फायदा होणार नाही, हे ही नमूद करणे आवश्यक आहे.

**महसुली उत्पन्नाचे भाकीत आणि कर-जीडीपी गुणोत्तर**

करांच्या दरांमध्ये कपात केल्यामुळे आणि त्यामुळे काही प्रमाणात नुकसान होणार असूनही अर्थसंकल्प २०१७-१८ मध्ये करांतून गोळा होणारा महसूल (एकूण मध्यवर्ती कर) २०१६-१७ च्या सुधारित अनुमानापेक्षा २०१७-१८ मध्ये २,००,००० कोटी रुपयांनी वाढेल, असे अंदाजित करण्यात आले आहे. अनुमानित महसुली वाढीचा मोठा हिस्सा प्रत्यक्ष करांद्वारे येणार असून केंद्रीय एकूण कर महसुलातील वाढीतील मोठा हिस्सा वैयक्तिक प्राप्ती कराचा आहे.

**Table 2: Increase in Projected Tax Receipts in 2017-18 (BE) over 2016-17 (RE) (Rs. crore)**

| Tax Components | Increase |
|---|---|
| Gross Tax Revenue | 2,08,336.5 |
| Corporation Tax | 44,821.20 |
| Taxes on Income | 88,081.60 |
| Customs | 28,000.00 |
| Union Excise Duties | 19,531.40 |
| Service Tax | 27,500.00 |
| Taxes on Union Territories | 402.3 |

या अंदाजांचा परिणाम म्हणजे एकूण मध्यवर्ती करांचे जीडीपीतील प्रमाण ११ टक्क्यांचा आकडा गाठणार आहे, एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष करातील जीडीपीतील वाटा आतापर्यंतचा सर्वोच्च राहणार आहे. इतकी आशावादी अनुमाने असूनही भारतीय कर प्रणालीतील प्रागतिकतेचा अभाव हा चिंतेचा मुद्दा आहेच. सर्वांना माहितच आहे की भारताची कररचना प्रतिगामी आहे कारण जवळपास एकूण जमा केलेल्या करांतील (केंद्र व राज्य सरकार दोघांकडेही जमा झालेला कर लक्षात घेता) दोन तृतियांश कर हा अप्रत्यक्ष करांद्वारे आहे. सहसा केंद्र सरकार बहुतेक प्रत्यक्ष कर गोळा करत असल्याने केंद्र सरकारची कररचना अधिक प्रागतिकतेकडे झुकणारी आहे. तरीही खाली दिलेल्या तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे केंद्र सरकारने गोळा केलेल्या करांच्या प्रकरणात प्रत्यक्ष कराचे जीडीपीशी असलेले गुणोत्तर आणि अप्रत्यक्ष कराचे जीडीपीशी असलेले गुणोत्तर यांच्यातील फरक गेल्या दोन वर्षांत कमी होत आहे. म्हणजे केंद्र सरकारच्या करांद्वारे मिळालेल्या उत्पन्नाचा विचार केला तरीही करांची प्रागतिकता उतरणीला लागली आहे. २०१७-१८ मध्ये जमा केल्या जाणार असलेल्या प्रत्यक्ष करांबाबत उच्च अंदाज व्यक्त करण्यात आले असले तरीही यामुळे परिस्थितीत काही बदल होण्याची शक्यता नाही. अशा तऱ्हेने अंदाजित प्रत्यक्ष कर - जीडीपी गुणोत्तर (केंद्रीय करांतर्गत) अनेक वर्षांतील सर्वोच्च राहील, असा अंदाज असला तरीही केंद्रीय सरकारच्या कर रचनेतील प्रागतिकता सुधारण्याची अपेक्षा नाही. दुसरीकडे जर प्रत्यक्ष करांबाबत अनुमान प्रत्यक्षात आले नाहीत तर मात्र स्थिती आणखीच खराब होणार आहे.

Table3: Gross Central Tax- GDP Ratio (%)

| Year | Gross Tax-GDP Ratio | Direct Tax-GDP Ratio | Indirect Tax-GDP Ratio |
|---|---|---|---|
| 2012-13 (A) | 10.4 | 5.6 | 4.8 |
| 2013-14 (A) | 10.1 | 5.7 | 4.4 |
| 2014-15 (A) | 10 | 5.6 | 4.4 |
| 2015-16 (A) | 10.6 | 5.4 | 5.2 |
| 2016-17 (BE) | 10.8 | 5.6 | 5.2 |
| 2016-17 (RE) | 11.3 | 5.6 | 5.7 |
| 2017-18 (BE) | 11.3 | 5.8 | 5.5 |

महसुली अंदाज अनावश्यक आशावादी आहेत, असे मानण्यासही अनेक कारणे आहेत. पूर्वीच्या अनुभवानुसार सहसा जमा झालेल्या कराबाबत सुधारित अंदाज हे नेहमीच अर्थसंकल्पीय अंदाजांच्या तुलनेत कमी असतात.(तक्ता ४) मात्र २०१६-१७ मध्ये सुधारित अंदाज हे अर्थसंकल्पीय अंदाजांच्या बरोबरीने होते. मात्र चालू वर्षी अंदाज करण्यासाठी सरकारकडे माहिती अपुरी असल्याने (केंद्रीय अर्थसंकल्प सादर करण्याची तारीख एक महिना अलिकडे आणल्याने) अर्थसंकल्पीय अंदाज आणि सुधारित अंदाजाचे आकडे तंतोतंत बरोबर कसे, हे स्पष्ट झालेले नाही. प्रत्यक्ष कराद्वारे जमा झालेल्या महसुलाने प्रचंड झेप घेण्याचे स्पष्टीकरण निश्चलनीकरणाने लोकांनी जुन्या नोटांचा उपयोग कर भरण्यास केला, याद्वारे देता येईल. मात्र तसे असेल तर संपूर्ण वर्षासाठी कराद्वारे गोळा होणाऱ्या उत्पन्नाबाबत अंदाज बांधण्यासाठी त्याचा आधार घेतला जाऊ शकत नाही.

Table 4: Comparison of Budget Estimates and Revised Estimates of SelectDirect Tax Receipts (Rs. crore)

| Year | Corporation Tax | Taxes on Income |
|---|---|---|
| 2013-14 (BE) | 4,19,520 | 2,40,919 |
| 2013-14 (RE) | 3,93,677 | 2,36,194 |
| 2014-15 (BE) | 4,51,005 | 2,78,275 |
| 2014-15 (RE) | 4,26,079 | 2,72,607 |
| 2015-2016 (BE) | 4,70,628 | 3,27,367 |
| 2015-2016 (RE) | 4,52,970 | 2,99,051 |
| 2016-2017 (BE) | 4,93,923.5 | 3,53,173.7 |
| 2016-2017 (RE) | 4,93,923.5 | 3,53,173.7 |
| 2017-2018 (BE) | 5,38,744.73 | 4,41,255.3 |

त्याचप्रमाणे २०१७-१८ मधील विशेषत: प्रत्यक्ष करांच्या बाबतीत महसुली अंदाज खूपच आशावादी वाटतात. उदाहरणार्थ, जीडीपी वाढीची गती मंदावण्यात निश्चलनीकरणाचा परिणाम (आणि त्यामुळे कर महसूल) अजून स्पष्ट नाही. हे परिणाम अजून समजायचे आहेत ही गोष्ट लक्षात घेता २०१७-१८ साठी विशेषत: वैयक्तिक प्राप्ती कराच्या बाबतीत महसुली अंदाज उच्च पातळीवर राहण्याची शक्यता आहे.

अप्रत्यक्ष कर महसुलाबाबत विशेषत: केंद्रीय अबकारी शुल्काबाबतचे अंदाज मात्र कमी महत्वाकांक्षी आहेत कारण या स्त्रोताकडून जमा केला जाणारा महसूल जीडीपी वाढीच्या दरापेक्षा खूप कमी आहे. गेल्या वर्षी अबकारी शुल्क वसुलीचा मोठा भाग जागतिक बाजारपेठेत तेलाच्या किमती चढल्याने मिळालेल्या घबाडामुळे होता. निश्चलनीकरणोत्तर कालावधीत अर्थव्यवस्था मंदावल्याने या होणाऱ्या कर वसुलीला खीळ बसण्याची शक्यता आहे.

वर केलेली चर्चा अनुमानित कर महसुलाबाबत असली तरीही निर्गुंतवणुकीतून मिळालेले उत्पन्न, डावपेचात्मक निर्गुंतवणूक आणि इतर (विमा कंपन्यांची सूचीबद्धता) यांनी मिळून बनलेल्या किरकोळ भांडवली उत्पन्नाबाबतीतील अंदाज हे ही उच्च पातळीवरच असल्याचे दिसते आहे. याचे स्वाभाविक कारण असे आहे की, २०१६-१७ मध्ये डावपेचात्मक निर्गुंतवणुकीचा लहानसा भागच प्रत्यक्षात येऊ शकला. (तक्ता ५)

Table5: Union Government's Miscellaneous Capital Receipts (Rs. crore)

| | 2015-16 (A) | 2016-17 (BE) | 2016-17 (RE) | 2017-18 (BE) |
|---|---|---|---|---|
| Disinvestment Receipts | 42,131.70 | 36,000 | 40,000 | 46,500 |
| Strategic Disinvestment | ... | 20,500 | 5,500 | 15,000 |
| Others (Listing of Insurance Companies) | ... | ... | ... | 11,000 |
| Total | 42,131.70 | 56,500 | 45,500 | 72,500 |

**करप्रशासन**

ही आव्हाने पाहता अनुमानित महसुलातील वाढ तिच्या दर्शनी मूल्यावर कशी घ्यायची हे स्पष्ट झालेले नाही. मात्र असा युक्तिवाद करता येईल की, २०१७-१८ मध्ये अंदाजित महसुलातील वाढ निश्चलनीकरणानंतर कर भरण्यात सुधारणा झाली यामुळे स्पष्ट करता येईल.यासंदर्भात हे नमूद करणे गरजेचे आहे की, कर भरण्यात सुधारणा होण्यासाठी कर प्रशासनातील मानवी साधनसंपत्ती महत्वाची भूमिका बजावते. प्राप्तीकर खात्यातील मनुष्यबळाची कमतरता म्हणजे मंजूर केलेल्या पदांपेक्षा खूप जास्त म्हणजे ३० टक्के रिक्त पदे करपालनाची गाडी घसरवू शकतात आणि त्यामुळे करवसुलीवर परिणाम होऊ शकतो. सरकार या आव्हानांचा मुकाबला करण्याचे उपाय योजत नाही तोपर्यंत एकूण उत्पन्नातील आणि विशेषत: प्रत्यक्ष कर महसुलातील जबरदस्त वाढीची फळे मिळणार नाहीत.

■■■

*लेखक सेंटर फॉर बजेट अँड गव्हर्नन्स अकाऊंटेबिलिटी या नवी दिल्ली येथील धोरण आधारित संशोधन संघटनेत कार्यरत आहेत.*

e-mail: malini@cbgaindia.org

# रेल्वे वगळून पायाभूत सुविधांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद

कृष्णा देव



***2017-18 चा अर्थसंकल्प प्रामुख्याने पायाभूत सुविधांवर केंद्रीत आहे. त्याचे प्रमुख उद्दिष्ट ''तत्परता, उत्पादकता आणि जीवनमानाचा दर्जा उंचावणे'' आहे. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी 3,96,135 कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे जी एकूण अर्थसंकल्पाच्या 18.45 टक्के आहे. जी गेल्या अर्थसंकल्पापेक्षा 14 पटीने अधिक आहे. खालील तक्त्याच्या आधारे आपल्याला तपशील पाहता येईल.***

केंद्रीय अर्थसंकल्प २०१७-१८ चा मुख्य उद्देश ''परिवर्तन, उत्साहनिर्मिती आणि स्वच्छ भारत (TEC India) आहे'. याला चालन देण्यासाठी दहा बाबींवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. शेतकरी, ग्रामीण लोकसंख्या, युवावर्ग, गरीब आणि मागास, पायाभूत सुविधा, आर्थिक क्षेत्र, डिजीटल अर्थव्यवस्था, सार्वजनिक सेवा, आर्थिक व्यवस्थापन, कर प्रशासन या त्या बाबी होत. निर्धारीत लक्ष्ये साध्य करण्यासाठी २०१७-१८ वर्षासाठी एकूण २१,४६,७३५ रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

२०१७-१८ चा अर्थसंकल्प प्रामुख्याने पायाभूत सुविधांवर केंद्रीत आहे. त्याचे प्रमुख उद्दिष्ट ''तत्परता, उत्पादकता आणि जीवनमानाचा दर्जा उंचावणे'' आहे. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ३,९६,१३५ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे जी एकूण अर्थसंकल्पाच्या १८.४५ टक्के आहे. जी गेल्या अर्थसंकल्पापेक्षा १४ पटीने अधिक आहे. खालील तक्त्याच्या आधारे आपल्याला तपशील पाहता येईल.

आर्थिक व्यवहार विभाग (पायाभूत सुविधा विभाग) च्या राजपत्रात ८ ऑक्टोबर २०१३ रोजी नमूद केल्याप्रमाणे पायाभूत सुविधा म्हणजे दळणवळण, ऊर्जा, जल आणि स्वच्छता, संचार आणि सामाजिक व आर्थिक सुविधा होय.

**तक्ता १: खर्चाची तरतूद**

(रु.कोटी)

| अ. क्र | क्षेत्र | २०१६-१७ (BE) | २०१६-१७ (RE) | २०१७-१८ (BE) |
|---|---|---|---|---|
| १ | चालू बाजारभावाने जीडीपी २०११-१२ मालिका | १,५०,७५,४२९ | १,५०,७५,४२९ | १,६८,४७,५४४ |
| २ | एकूण अर्थसंकल्पीय खर्च | १९,७८,०६० | २०,१४,४०७ | २१,४६,७३५ |
| ३ | पायाभूत सुविधा | ३,४८,९५२ | ३,५८,६३४ | ३,९६,१३५ |
| ४ | दळणवळण | २,१६,२६८ | २,१६,९०३ | २,४१,३८७ |

*स्रोत: केंद्रीय अर्थसंकल्प २०१७-१८*

## १. दळणवळण

२०१७-१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात दळणवळण क्षेत्र, यात रेल्वे, रस्ते, जहाजमार्ग, हवाईवाहतूक यासाठी २, ४१, ३८७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हे प्रमाण एकूण अर्थसंकल्पाच्या ६१ टक्के एवढे आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात तरतूद केल्यामुळे देशभर मोठ्या प्रमाणावर आर्थिक घडामोडींना वेग येऊन रोजगारनिर्मिती होण्यास चालना मिळेल.

**अ. रस्ते**

रस्ते निर्मितीसाठी अर्थसंकल्पात Rs. ६४,९०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात ५७,९७६ कोटी रुपयांची तरतूद होती. ही रक्कम २,००० किलोमीटरची सागरी जोडणी करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. यामुळे बंदरं आणि गावं जोडली जाणार आहेत. तसेच पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत २०१४-१५ पासून आतापर्यंत १,४०,००० किलोमीटरची रस्तेनिर्मिती झाली आहे.

पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत २०११-२०१४ या कालावधीत प्रतिदिन ७३ किमी रस्तेनिर्मिती होत होती. तर, २०१६-१७ या वर्षात १३३ किमी प्रतिदिन होत आहे. कामाचा वेग जवळपास दुप्पटीने वाढला आहे.

पंतप्रधान ग्राम सडक योजने अंतर्गत २०१९ पर्यंत सध्याची उद्दिष्टे पूर्ण करावयाची आहेत. यासाठी २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात यासाठी १९,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यांचा खर्च मिळून २०१७-१८ वर्षात पंतप्रधान ग्राम सडक योजनेवर एकूण २७,००० कोटी रुपयांचा खर्च होणार आहे.

**ब. विमानतळ**

विमानतळांसाठी २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात २७०२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जी २०१६-१७ वर्षात २५९० कोटी रुपये एवढी होती. गेल्या वीस वर्षात

***२०१७-१८ मध्ये भारत नेट प्रकल्पासाठी १०,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जी गेल्यावर्षी ६००० कोटी रुपये होती. १, ५०,००० ग्रामपंचायतींमध्य वायफाय हॉटस्पॉटसह हायस्पीड कनेक्टीव्हीटी रास्त दराने उपलब्ध असणार आहे. १, ५५,००० किमी ऑप्टीकल फायबर जोडणी झाली आहे. या व्यतिरिक्त डिजीगाव योजनेअंतर्गत डिजिटल तंतज्ञानाच्या माध्यमातून टेलि-मेडिसीन, शिक्षण आणि कौशल्यविकास साधला जाणार आहे.***

भारतीय हवाई वाहतूक क्षेत्रात कमालीचे बदल झाले आहेत. नव्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मार्गांची निर्मिती झाली आहे. विमानतळांचे आधुनिकीकरण आणि विस्तार झाला आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बरोबरीने भारतीय विमानकंपन्यांचे सुरक्षा निकष आहेत.

२०१७-१८ च्या अर्थसंकल्पात टायर-२ शहरांमधली विमानतळं सार्वजनिक-खासगी भागीदारीतून विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे. भारतीय विमानपत्तन प्राधीकरण कायद्यात बदल करण्यात येणार आहेत.

**क. जहाजबांधणी**

भारतातील बंदरांची अवस्था सध्या बिकट आहे. २०११-१२ मध्ये बंदरांचा वापर करण्याचे प्रमाण ८० टक्के एवढे होते. तर बारापैकी चार बंदरांतील उपयोगिता वापर शंभर टक्के एवढा आहे.

भारताची आयात-निर्यात ही प्रामुख्याने जलमार्गातून होते. गेल्या दशकात यात प्रचंड वाढ झाली आहे. एकत्रित वार्षिक वृद्धीचे प्रमाण २१ टक्के आहे, तर आयातीत २५ टक्क्यांची वाढ झाली आहे.

पर्यावरणदृष्ट्या अतिशय पूरक समजल्या जाणाऱ्या जहाजमार्गासाठी २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात १७७३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. २०१६-१७ मध्ये १५३१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

बंदरं आणि दीपगृहे यासाठी दहा टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. तसेच नौकायन आणि ईशान्येकडील क्षेत्रासाठी २३८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

देशांतर्गत जल वाहतूक ही पर्यावरणदृष्ट्या अतिशय पूरक बाब आहे. यामुळे इंधनक्षमता वाढून वायू उत्सर्जनाचे प्रमाण कमी होते. मात्र, देशांतर्गत वाहतुकीसाठी अर्थसंकल्पातील तरतूद कमी झाली आहे. २०१६-१७ मध्ये ३२६.४२ कोटी रुपयांची तरतूद होती. ती २०१७-१८ वर्षासाठी २२५ कोटी रुपये एवढी करण्यात आली आहे.

## २. संचार

आपल्या जैविक परिसंस्थेचा एक महत्त्वाचा घटक म्हणून दूरसंचार क्षेत्राकडे पाहिले जाते. सध्या स्पेक्ट्रम तुटवडा

नसल्यामुळे मोबाईल ब्रॉडबँडला चालना मिळून देशभर डिजीटल इंडियाची मोहीम सुरू आहे. यामुळे रोजगारनिर्मितीस चालना मिळून ग्रामीण भागातील जनतेला लाभ होईल.

२०१७-१८ च्या अर्थसंकल्पात यासाठी एकूण २६,६८७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. जी गेल्या वेळच्या तरतुदीपेक्षा ४५ टक्क्यांनी अधिक आहे.

भारत नेट नावाचा प्रकल्प डिजीटल इंडियाला चालना देण्यासाठी राबवण्यात येतोय. ऑप्टीकल फायबरचा वापर करुन ब्रॉडबँड जोडणीसाठीचा हा देशातील सर्वात मोठा प्रकल्प आहे.

२०१७-१८ मध्ये भारत नेट प्रकल्पासाठी १०,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जी गेल्यावर्षी ६००० कोटी रुपये होती. १, ५०,००० ग्रामपंचायतींमध्य वायफाय हॉटस्पॉटसह हायस्पीड कनेक्टीव्हीटी रास्त दराने उपलब्ध असणार आहे. १, ५५,००० किमी ऑप्टीकल फायबर जोडणी झाली आहे. या व्यतिरिक्त डिजीगाव योजनेअंतर्गत डिजिटल तंतर्ज्ञानाच्या माध्यमातून टेलि-मेडिसीन, शिक्षण आणि कौशल्यविकास साधला जाणार आहे.

**३. ऊर्जा**

अ. वीज

१मे २०१८ पर्यंत शंभर टक्के ग्रामीण विद्युतीकरण करण्याच्या मार्गावर सरकार आहे. २०१७-१८ मध्ये दीन दयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत ४,८१४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

सौर ऊर्जा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी सोलर पार्क प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवण्याचा निर्णय घेतला आहे. ज्यामुळे अतिरिक्त २०,००० MW वीज निर्माण होईल.

गेल्या दोन वर्षात २५० पेक्षाही जास्त इलेक्ट्रॉनिक्स निर्मितीचे प्रस्ताव आले आहेत. ज्याचे एकूण मूल्य १.२६ लाख कोटी रुपये आहे. M-SIPS आणि EDF यासारख्या योजनांसाठी २०१७-१८ मध्ये आतापर्यंतची सर्वोच्च अशी ७४५ कोटी रुपायंची गुंतवणूक केली आहे.

ब. तेल आणि नैसर्गिक वायू

आधुनिक जगताची पेट्रोल ही जीवनरेखा आहे. तसेच कृषी आणि औद्योगिक क्षेत्रासाठी अत्यावश्यक घटक आहे. त्याचा परिणाम म्हणून या क्षेत्रात रोजगारनिर्मिती आणि वृद्धीला खूप वाव आहे. वाहन उद्योग क्षेत्र आणि गृहनिर्माण क्षेत्रामुळे गेल्या काही वर्षात मागणी वाढली आहे.

ऊर्जा क्षेत्राला बळकटी देण्यासाठी, सरकारने कच्च्या तेलाचे राखीव साठे (Strategic Crude Oil Reserves) निर्माण करण्याचे ठरवले आहे. आतापर्यंत पहिल्या टप्यात तीन ठिकाणी असे राखीव साठे निर्माण करण्यात आले आहेत. दुसऱ्या टप्प्यात आता ओडिशामध्ये चांदीखोल आणि राजस्थानमध्ये बिकानेर याठिकाणी नियोजित आहे. यामुळे राखीव साठ्याची क्षमता १५.३३ MMT ने वाढणार आहे.

४. पाणी आणि स्वच्छता:

स्वच्छ भारत मोहीम (ग्रामीण) योजनेमुळे उघड्यावरील शौचाची संकल्पना जवळपास संपुष्टात आली आहे. ग्रामीण भारतात स्वच्छता कवरेज ऑक्टोबर २०१४ मध्ये ४२% हून ६०% झाले होते. उघड्यावरील शौचमुक्त झालेली गावं आता पाईपलाईनमधून पाणीपुरवठ्याला प्राधान्य देत आहेत.

या मोहिमेला आणखी यशस्वी करण्यासाठी आगामी चार वर्षात आर्सिक आणि फ्लुरॉईडचे प्रमाण असलेल्या २८,००० वसाहतींना स्वच्छ पाणी पुरवण्याचे नियोजन आहे. राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमाचा हा भाग असणार आहे. यासाठी २०१७-१८ साठी ६०५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. २०१६-१७ या वर्षात यासाठी ५००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

**सारांश**:

एकंदरीत २०१७-१८ चा अर्थसंकल्प आपली ध्येय वेगाने साध्य करण्याकडे कल असलेला असा दिसत आहे. पायाभूत सुविधांसाठी एकूण अर्थसंकल्पाच्या १/५ भाग खर्च करण्यात येणार आहे. यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळून युवावर्गाला रोजगाराच्या नवनवीन संधी प्राप्त होणार आहेत. तसेच परकीय गुंतवणूकीसाठी योग्य वातावरण तयार करुन ग्रामीण भारताला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न आहे.

■■■

*लेखक पायाभूत क्षेत्राचे जाणकार असून सध्या ते स्वतंत्ररित्या सल्लागार म्हणून काम करतात. नियोजन आयोगाचे सल्लागार म्हणून त्यांनी काम पाहिलेले आहे. त्यांनी दळणवळण धोरणासाठीच्या उच्च स्तरीय समितीसोबत काम केले आहे. जागतिक बँक आणि* RITES *लिमिटेडसाठीही काम करण्याचा अनुभव लेखकाकडे आहे.*

e-mail: kd.krishnadev@gmail.com

# विमुद्रीकरण आणि केंद्रीय अर्थसंकल्प

प्रा. डॉ. अशोक पुरभाजी टिपरसे



***भारताने 1947 मध्ये मिश्र अर्थव्यवस्थेच्या पुरस्कार केला. यासाठी सरकारने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारली. त्यामुळे सरकारचे कार्यक्षेत्र विस्तारले. जनतेचा आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास करणे, हे सरकारचे प्रमुख उद्दिष्ट आहे यासाठी सरकारला स्वत:ची उत्पन्नाची साधने आवश्यक असतात, त्यासाठी सरकार विविध कर गोळा करते व जनतेच्या विकासावर तो पैसा खर्च करते यातूनच वित्तीय प्रशासनाचा जन्म झाला.***

ॲडम स्मिथ व इतर सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी व्यक्तिहित साध्यवर लक्ष दिले. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत सरकारने व्यक्तीच्या खाजगी व्यवहारावर हस्तक्षेप करता कामा नये. सामान्यपणे १९ व्या शतकात सर्वत्र भांडवलशाही होती. २० व्या शतकातील १९२९ च्या जागतिक महामंदिने भांडवलशाहीचे दोष उघडकीस आले. कांही देशानी मित्र तर काहींनी भांडवलशाही व सामाजवादी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला.

भारताने १९४७ मध्ये मिश्र अर्थव्यवस्थेच्या पुरस्कार केला. यासाठी सरकारने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारली. त्यामुळे सरकारचे कार्यक्षेत्र विस्तारले. जनतेच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास करणे, हे सरकारचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यासाठी सरकारला स्वत:ची उत्पन्नाची साधने आवश्यक असतात, त्यासाठी सरकार विविध कर गोळा करते व जनतेच्या विकासावर तो पैसा खर्च करते यातूनच वित्तीय प्रशासनाचा जन्म झाला.

**अर्थ संकल्पाचा इतिहास**

अर्थसंकल्प (बजेट) या शब्दाची उत्पत्ती ही फ्रेंच भाषेतील बूजेट (Budget) या शब्दापासून झाली. याचा अर्थ चामडयाची पिशवी होय. १७३३ साली इंग्लड मध्ये वित्तीय प्रस्ताव सादर करण्यासाठी रॉबर्ट वॉलपोल यांनी चामडयाच्या थैलीतून संबंधीत कागद काढले तेंव्हापासून बजेट हा शब्द रुढ झाला. परंतू वार्षिक जमा खर्चाचा अंदाज या अर्थाने हा (Budget) शब्द १८०३ मध्ये जगात सर्वात प्रथम फ्रान्समध्ये वापरण्यात आला.

अंदाजपत्रकात सार्वजनिक खर्च, सार्वजनिक महसूल यांचा प्रामुख्याने समावेश होतो. अंदाजपत्रकाला अर्थसंकल्प असेही म्हटले जाते. एखाद्या राष्ट्रात आगामी वर्षामध्ये कोणकोणत्या मार्गाने उत्पन्न जमा करायचे आणि जमा केलेले उत्पन्न वेगवेगळया क्षेत्रामध्ये कशा पध्दतीने खर्च करायचे याचा आराखडा म्हणजे अर्थसंकल्प होय. येतो. केंद्रीय अर्थमंत्र्याकडून वर्षभराच्या खर्चाचा हिशोब संसदेत मांडण्यात येतो त्यालाच अर्थसंकल्प म्हटले जाते. यात सर्व खात्याची माहिती, मंजूर करण्यात येणाऱ्या योजना तसेच १ एप्रिल पासून पुढच्या वर्षीच्या मार्च पर्यंतच्या सर्वच आर्थिक गोष्टींचा लेखाजोखा या अर्थसंकल्पात सादर करण्यात येत असतो. तसेच या

सरकारकडून नविन योजनांची माहिती देण्यात येते आणि त्याच्यावर संसदेतून अप्रत्यक्षपणे मंजूरी देखील मिळावी हा याचा देखील हेतू असतो.

अर्थसंकल्पाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील :-

१) देशात उपलब्ध असलेल्या वित्तीय साधनाचे योग्य वाटप करुन राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणणे व आर्थिक विकास साध्य करणे.

२) राष्ट्रीय उत्पन्न व संपत्तीचे योग्य वाटप करुन आर्थिक विषमता कमी करणे.

३) अर्थव्यवस्थेत किंमत, उत्पादन, मागणी, उपभोग इ. संबंधी अर्थसंकल्पात योग्य तरतूदी करुन आर्थिक स्थैर्य निर्माण करणे.

**भारतातील अर्थसंकल्पीय प्रक्रिया :-**

भारतातील सार्वजनिक अर्थसंकल्पीय प्रक्रिया स्वातंत्र्यपूर्वीच सुरू झाली आहे. ईस्ट इंडियाकडून भारताची सत्ता ब्रिटीश पार्लमेंटकडे गेल्यानंतर लगेचच दोन वर्षांनंतर ७ एप्रिल १८६० रोजी पहिला अर्थ संकल्प मांडण्यात आला. जेम्स विल्सन या पहिल्या वित सदस्याने तो मांडला होता. स्वातंत्र्यापूर्वीच अंतरिम सरकारमधील सदस्य लियाकत अली खान यांनी १९४७-४८ चा अर्थसंकल्प मांडला होता. स्वातंत्र्यानंतर भारताचे पहिले वित्तमंत्री श्री. आर. के. शन्मुखम चेट्टी यांनी पहिला अर्थसंकल्प सादर केला जातो.

कोणत्याही वर्षाच्या अर्थसंकल्पात सरकारी जमा खर्चाचे तीन वर्षाचे आकडे दिलेले असतात.

१) गेल्या वित्तीय वर्षाचे प्रत्येक आकडे दिलेले असतात. (Actuals)

२) चालू वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्पीय आकडे ;Budgetary Esitimate) व संशोधित अंदाज (Revised Esitimates)

३) पुढील वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज (Budgetary Esitimates)

**अंदाज पत्रकाचे प्रकार :-**

१) शिलकी अंदाजपत्रक

२) संतुलित अर्थसंकल्प

३) तूटीचा अर्थसंकल्प

ज्या अर्थसंकल्पात उत्पन्न व खर्च यांच्यात संतुलन असते, त्यास संतुलित अर्थसंकल्प म्हणतात. जेंव्हा अर्थसंकल्पात दर्शविलेला खर्च उत्पन्नापेक्षा कमी असतो. तेंव्हा तो शिलकी अर्थसंकल्प असतो जेंव्हा अंदाजपत्रकातील उत्पन्न हे खर्चापेक्षा कमी असते तेंव्हा त्यास तूटीचा अर्थसंकल्प म्हणतात.

***ज्या अर्थसंकल्पात उत्पन्न व खर्च यांच्यात संतुलन असते, त्यास संतुलित अर्थसंकल्प म्हणतात. जेंव्हा अर्थसंकल्पात दर्शविलेला खर्च उत्पन्नापेक्षा कमी असतो. तेंव्हा तो शिलकी अर्थसंकल्प असतो जेंव्हा अंदाजपत्रकातील उत्पन्न हे खर्चापेक्षा कमी असते तेंव्हा त्यास तूटीचा अर्थसंकल्प म्हणतात.***

**भारतीय राज्यघटनेतील तरतुद**

भारतात दरवर्षी (वार्षिक) अर्थसंकल्प राज्यघटनेच्या कलम ११२ अंतर्गत एक एप्रिलला आर्थिक वर्ष सुरू होण्याच्या आधी संसदेच्या दोन्ही सभागृहात सादर करून तो मंजुर करून द्यावा लागतो आणि शेवटी त्या वित्त विधेयकाला राष्ट्रपतीची मान्यता घ्यावी लागते अशी मंजुरी झाल्यानंतर विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते. गेल्या ९२ वर्षापासुन रेल्वे अर्थसंकल्प आणि केंद्रीय अर्थसंकल्प वेगवेगळया स्वरूपात मांडण्यात येत होता. भारतीय रेल्वे ही जगातील एक मोठी रेल्वे संस्था असून १३.७६ कोटी कर्मचारी असणारी ही संस्था म्हणजे जगात सातव्या क्रमांकाचा उपक्रम आहे.यंदा मात्र देशाच्या सर्वसाधारण अर्थसंकल्पातच रेल्वे अर्थसंकल्पाचे विलीनीकरण करून हा मोठाच बदल करण्यात आला आहे.

**अर्थसंकल्पाची मुख्य वैशिष्ट्ये :-**

गतवर्षाच्या अर्थसंकल्पाची जेटली यांनी नऊ वर्गात विभागणी केली होती. शेती अर्थमंत्री अरुण जेटली यांच्या अर्थसंकल्पाची दहा कलमी थीम आहे. त्यात १) शेतकरी : उत्पन्न पाच वर्षात दुप्पट करण्याचे लक्ष्य, २) ग्रामीण भाग: रोजगार व मुलभूत पायाभूत सूविधा उपलब्ध करणे, ३) युवा : शिक्षण तसेच कौशल्य विकास आणि नौकऱ्या द्वारे युवकांना सक्षम करणे, ४) गरीब, वंचीत घटक : समाजिक सुरक्षा आणि आरोग्य सुविधा बळकट करण्यासाठी परवडणारी घरे उपलब्ध करणे, ५) पायाभूत सूविधा : कार्यक्षमता, उत्पादन क्षमता आणि जीवनमान उंचविण्यासाठी पायाभूत सूविधांची निर्मीती ६) वित्तीय क्षेत्र : बळकट वित्तीय संस्था मार्फत प्रगती व स्थैर्य साध्य करणे, ७) डिजीटल इंडिया : गतीमानता, विश्वासार्हता आणि पारदर्शकतेसाठी ८) सार्वजनीक सेवा : प्रभावी कारभारासह लोकसहभागातून परिणामकारक सेवा देणे, ९) कुशल वित्तीय व्यवस्थापन : उपलब्ध स्त्रोतांचा वापर करुन आर्थिक स्थैर्य राखणे आणि १०) कर प्रशासन : प्रामाणिकतेचा गौरव याच्या जोडीला जेटली यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात एका नव्या घटकाची नोंद केली. तो म्हणजे तरूण वर्ग. अशा तऱ्हेने

जेटली यांनी आपला संपूर्ण अर्थसंकल्प दहा मुदयांभोवती सादर केला आणि विविध सुधारणाचे सुतोवाच केले. यंदाच्या केद्रींय अर्थसंकल्पात सामाजिक आणि आरोग्य या क्षेत्रासाठी किरकोळ वाढ करण्यात आली आहे.

**रेल्वे अर्थसंकल्प सर्वसाधारण अर्थसंकल्पातच सादर**

आजपर्यंतची २८ फेब्रवारीची वार्षिक अंदाजपत्रकाची परंपरा मोडून या वर्षी अरूण जेटली यांनी १ फेब्रवारीला पुढील वर्षाचे अंदाजपत्रक सादर केले. या नव्या अर्थसंकल्पाची अनेक प्रमुख वैशिष्टये आहेत. सन १९२४ पासूनची स्वतंत्र रेल्वे अर्थसंकल्पाची परंपरा बाजूला ठेवून यावर्षी रेल्वे अर्थसंकल्प नेहमीच्या अर्थसंकल्पात सामाविष्ट केलेला आहे. देशातील नीती आयोगाचे सदस्य विवेक देबरॉय यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या शिफारशीनुसार असे घडले आहे. केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी स्वत:च रेल्वेसाठी अर्थसंकल्पीय तरतुदीची घोषणा केली. रेल्वेसाठी एक लाख एकतीस हजार कोटी रुपयांची तरतुद करुन काही महत्वाकांक्षी योजनांची त्यांनी घोषणा देखील केली.

रेल्वे मंत्रालयाकडून सरकारच्या नियोजीत वार्षिक सुमारे १०,००० कोटी रकमेचा जो लांभाश दिला जात असे, तो देण्याची गरज नाही . या अर्थसंकल्पातील दुसरा प्रमुख बदल म्हणजे योजना खर्च आणि बिगर योजना खर्च अशी विभागणी आता दिसणार नाही तर आता असे वर्गीकरण न दाखवता फक्त महसुली जमा व खर्च तसेच भांडवली जमा व खर्च असे या अर्थसंकल्पात आहे. वार्षिक अर्थसंकल्प या वितीय साधनाचा उपयोग सरकार मुख्यत: दोन कारणांसाठी करीत असते. एक म्हणजे देशाचा कारभार कार्यक्षमतेने करणे. प्रशासनावरील खर्च, व्याज, मुद्दलमुळे, सबसिडी यांचा अंतर्भाव करणे. दुसरे म्हणजे शाश्वत विकास साधण्यासाठी विविध योजना, प्रकल्प राबवणे ३१ मार्च २०१७ रोजी बाराव्या पंचवार्षिक योजनेची मुदत संपत आहे. त्यानंतर पंचवार्षिक योजना करण्याचे धोरण रद्द करण्याचे सरकारने ठरवले आहे.

**विमुद्रीकरणाचा परिणाम :**

दि. ८ नोव्हेंबर २०१६ च्या रात्री १२ पासून रु ५०० आणि रु १००० मुल्यांच्या जून्या नोटा रद्द करण्यात आल्या. एकूण चलन पुरवठयामध्ये या दोन नोटांचा सहभाग ८६ टक्के होता, पैशाचा पुरवठा ही द्रव मत्तेची मुख्य पुंजी असते. रद्द करण्यात आलेल्या रु ५०० आणि रु १००० मुल्याच्या नोटा सहकारी बँका सोडून इतर बँकामध्ये ३० डिसेंबर २०१६ पावेतो जमा करण्याची मुभा नागरिकांना देण्यात आली. त्यानंतर ३१ मार्च २०१७ पावेतो अशा जून्या नोटा आर.बी.आय. मध्ये जमा करता येतील. यापूर्वी १९७८ मध्ये रु १०००, ५००० आणि रु १०,००० मुल्याच्या नोटा रद्द करण्यात आल्या होत्या. त्यावेळी मोरारजी देसाई प्रधानमंत्री होते तर एच. जी. पटेल हे आर.बी.आय. चे गव्हर्नर होते. त्यावेळी रद्द करण्यात आलेल्या नोटांचा एकूण चलन पुरवठयातील सहभाग फक्त आठ टक्के होता.

***सन १९२४ पासूनची स्वतंत्र रेल्वे अर्थसंकल्पाची परंपरा बाजूला ठेवून यावर्षी रेल्वे अर्थसंकल्प नेहमीच्या अर्थसंकल्पात सामाविष्ट केलेला आहे.देशातील नीती आयोगाचे सदस्य विवेक देबरॉय यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या शिफारशीनुसार असे घडले आहे. केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी स्वत:च रेल्वेसाठी अर्थसंकल्पीय तरतुदीची घोषणा केली. रेल्वेसाठी एक लाख एकतीस हजार कोटी रुपयांची तरतुद करुन काही महत्वाकांक्षी योजनांची त्यांनी घोषणा देखील केली.***

जानेवारी १९४६ मध्ये ब्रिटीश सरकारने १००० आणि १०,००० रुपयांच्या नोटा चलनातून काढून घेतल्या होत्या. १६४६ ची गोष्ट तर दूरच ठेवू पण १९७८ मध्ये देखील सरकारच्या या निर्णयाचा सामान्य माणसाला त्रास झाला नव्हताच, कारण त्याच्यापैकी बहुसंख्यांनी या नोटा पाहिल्या देखील नव्हत्या, त्यांच्याकडे त्या गठ्ठयाने असणे ही बाब तर अधिकच दुरापास्त होती. मोरारजी देसाई यांची ती खेळी सामान्यांसाठी त्रासदायक ठरलेली नसू देत पण त्यातून काळया पैशाचा ओघ पूर्णपणे थांबला नाही.

जागतीक बँकेच्या अंदाजानुसार विमुद्रीकरणामुळे अर्थव्यवस्थेवर परिणाम झाल्यामुळे २०१७ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ सात टक्के राहील. या आधिचा अंदाज ७.६ टक्के वाढीचा होता. भारतामध्ये ८० टक्के व्यवहार नोटांनी होत असल्याने अचानक झालेल्या नोटाबंदीने ग्रामीण अर्थव्यवस्थेवर तसेच घरगुती व्यवहारावर विमुद्रीकरणाचा परिणाम जाणवला. जीएसटी आणि भूसूधारणा कायद्याच्या अमलबजावणीवरही याचा परिणाम झालेला आहे. वाहन उत्पादक कंपन्यांची देशव्यापी संघटना असलेल्या सीआम

(सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्यूफॅक्चर्स) च्या अहवालानुसार डिसेंबर महिन्यात वाहन खरेदीवर परिणाम झाला. तसेच डिसेबंर मध्ये तिमाही पतधोरण जाहीर करताना रिजर्व्ह बँकेने जीडीपी ७.१ असेल असा अंदाज व्यक्त केला होता. निश्चलीकरणाचा निर्णय महत्वाचा आहे. भ्रष्टाचार आणि काळा पैसा रोखण्यासाठी हा उपाय आवश्यक होता. त्यासाठी नागरीकांच्या मानसिकतेत बदल गरजेचा होता. ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा रद्द झाल्यावर बँकाकडे मोठया प्रमाणात पैसा येईल, त्याचा नैसर्गीक परिणाम म्हणजे व्याजदर घटून पैसा फिरेल. त्याचबरोबर समाजकल्याण योजनासाठी सरकारलाही जास्त निधी उपलब्ध होईल.

कॅशलेस व्यवहारासाठी सरकारने भारत इंटरफेस फॉर मनी- भीम हे मोबाईल ॲप तयार केले आहे. त्याला देशातील १.२५ कोटी नागरीकांनी पसंती दिली असून या ॲपशी निगडीत नागरीकांना डेबिट, क्रेडीट कार्डाप्रमाणे आधार कार्डाद्वारे आर्थिक व्यवहार करता येणार असल्याचा पुनरुच्चार जेटलींनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात केला. देशातील टपाल कार्यालयामध्ये पासपोर्ट मिळण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. भारतातून आरोपी परदेशात पळून गेल्यास कायद्यात बदल केला जाईल तसेच मालमत्ता जप्त केली जाईल अशी घोषणा करीत कर्जबुडव्या विजय मल्याला भारतात परत आणण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे दर्शविले आहे. विमुद्रीकरण, लवकरच येणारा देशव्यापी वस्तू आणि सेवाकर-जीएसटी स्वतंत्र आस्तित्व संपलेला रेल्वे अर्थसंकल्प आणि ३१ डिसेंबरला प्रधानमंत्र्यांनी जाहीर केलेल्या अनेक योजना ही त्यातली काही प्रमुख कारणे. सवलतीची काही पावले निवडणूका लक्षात ठेवूनही पडली आहेत. परंतू बहूचर्चीत नोटाबंदीनंतर किती काळा पैसा बाहेर आला, त्याचा अर्थव्यवस्थेला किती फायदा झाला हे अजून गुलदस्त्यात आहे. बँकामध्ये जमा झालेल्या काळया पैशाची आकेडवारी अधिकृतपणे जाहीर झाली तर नेमके चित्र कळू शकले असते.

'स्कील इंडीया' चा गाजावाजा होत असला तरी युरोप प्रमाणे भारतातही नवे रोजगार निर्माण न होता किंबहुना रोजगार कमी होवूनच विकास होत असेल, तर ती चिंताजनक बाब आहे. दर वर्षी किमान दोन कोटी नवे रोजगार निर्माण करणे हे आव्हान मुळीच सोपे नाही. किंबहुना नोटाबंदी त्यामुळेच होत असलेली रोजगार कपात, तेलाच्या वाढलेल्या किंमतीमुळे अर्थव्यवस्थेवर येणारा भार या साऱ्या बाबी लक्षात घेतल्या तर इतके रोजगार कुठून आणि कसे निर्माण होणार हा प्रश्नच आहे.

***निश्चलीकरणाचा निर्णय महत्वाचा आहे. भ्रष्टाचार आणि काळा पैसा रोखण्यासाठी हा उपाय आवश्यक होता. त्यासाठी नागरीकांच्या मानसिकतेत बदल गरजेचा होता. ५०० आणि १००० रुपयाचा नोटा रद्द झाल्यावर बँकाकडे मोठया प्रमाणात पैसा येईल, त्याचा नैसर्गीक परिणाम म्हणजे व्याजदर घटून पैसा फिरेल. त्याचबरोबर समाजकल्याण योजनासाठी सरकारलाही जास्त निधी उपलब्ध होईल.***

एफआयपीबी बरखास्त नियामक प्रक्रियांना वेग देण्यासाठी परदेशर गुंतवणूक प्रोत्साहन मंडळ (एफआयपीबी) बरखास्त करण्यात येणार आहे. थेट परदेषी गुंतवणुकीला चालना देण्यासाठी सर्वच क्षेत्रामध्ये ९० टक्के परदेशी गुंतवणूक स्वंयचलीत मार्गाने येण्याचा मार्ग मोकळा करण्याची घोषणा जेटलींनी केली.

**नोकरदारांना दिलासा**

ऐतिहासीक विमुद्रीकरणाच्या निर्णयानंतर देशभर उडालेल्या चलन तुटवडयाचा गोंधळ व त्यातून सर्वसामान्यांना सोसावे लागलेल्या अनंत समस्या यांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी सन २०१७-१८ चा अर्थसंकल्प सादर केला. यात शेती, ग्रामीण विकास, मनरेगा, पायाभूत सुविधा, उद्योग, रेल्वे सुविधा यांच्यासह डिजीटल इंडियाला चालना देण्यासाठी घोषणांचा पाऊस पाडला असला तरी विमुद्रीकरणाच्या धाडसी निर्णयानंतर भ्रष्टाचार काळया पैशाला आळा घालण्यासाठी कसलेही ठोस पाऊल ऊचललेले दिसत नाही. या सोबतच शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करण्याची, रोजगाराच्या संधी वाढविण्याची घोषणाही अर्थमंत्र्यांनी केली. परंतु या क्षेत्राला गती मिळेल असा एकही निर्णय या बजेट मध्ये दिसत नाही. मात्र विमुद्रीकरणाच्या पार्श्वभूमीवर आयकर मर्यादा वाढवून तीन लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले. तसेच पाच लाखांच्या उत्पन्नावर फक्त पाच टक्के कर आकारुन मध्यमवर्गीयांना दिलासा दिला. देशात प्रत्यक्ष कर भरणाऱ्यांची संख्या केवळ ३.७ कोटी आहे एकूण लोकसंख्येच्या तुलनेत विचार केला तर करदात्यांची टक्केवारी अवघी तीन टक्केच

भरते. याचा दुसरा अर्थ देशातील ९७ टक्के लोकांचे उत्पन्न अडीच लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे. एक कोटी रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या करदात्यावरील १५ टक्के अधिभार कायम ठेवला आहे. या वर्षीचा अधिभार दोन हजार सातशे कोटी रुपये आहे. आणखी एक मोठा आणि महत्वाचा निर्णय राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणगीच्या बाबतीत घेण्यात आला. या पुढे दोन हजारांपेक्ष अधिकची देणगी राजकिय पक्षांना स्वीकारायची असेल तर ती धनादेशाच्या किंवा इंटरनेट बँकींगच्या माध्यमातून स्वीकारता येईल. पूर्वी ही मर्यादा वीस हजारांची होती. औद्योगीक क्षेत्राला आलेली मरगळ झटकण्यासाठी अर्थमंत्र्यांनी पन्नास कोटी पर्यंतची उलाढाल असलेल्या लघु उद्योगांना करामध्ये सवलत जाहीर केली आहे. कृषीक्षेत्रासाठी दहा लाख कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

**रोख व्यवहारावर मर्यादा :-**

येत्या एक एप्रिल पासून ३ लाखापेक्षा अधिकचे व्यवहार कॅशलेस पध्दतीनेच करणे अनिवार्य करण्यात आले आहे. नोटाबंदीच्या पार्श्वभूमीवर काळा पैसा नष्ट करणे आणि स्वच्छ व्यवहाराला प्राधान्य देण्यात आले. उच्च शिक्षणासाठी

**तरतुदी :-**

विद्यापीठ अनुदान आयोगाची पुनर्रचना करण्याचा निर्णय महत्वपूर्ण आहे. कौशल्य विकासासाठी सहाशे जिल्ह्यात केंद्र स्थापन केल्याने रोजगार निर्मीतीला चालना मिळणार आहे. संकल्प या रोजगार प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून कोटयावधी तरुणांना रोजगार मिळणार आहे. त्यासाठी चार हजार कोटीची तरतूद, तंत्रशिक्षणातील आधुनिक कौशल्यासाठी स्ट्राईव्ह अभियान त्यासाठी २२०० कोटीची तरतूद, मोफत ऑनलाईन शिक्षणासाठी स्वयंम, परदेशातील रोजगार संधीसाठी १०० इंडिया इंटरनॅशनल सेंटर्स, देशभरात ६०० प्रधानमंत्री कौशल्य विकास केंद्राची स्थापना. सर्व प्रवेश परिक्षासाठी क्रेंद्रीय व्यवस्था, उच्च गुणवत्तेत सातत्य राखणारी महाविद्यालये, शिक्षण संस्थांना स्वायत्तता देशाच्या उच्च शिक्षणाच्या व्यवस्थेचे वार्षिक मुल्यमापन, शास्त्र विषयाच्या शिक्षणावर विशेष भर आणि उच्च दर्जाची गुणवत्ता सिध्द करणारी महाविद्यालये तसेच शिक्षण संस्थांना स्वायत्ता देण्याचा निर्णय.

**सारांश**

अर्थसंकल्पावर विमुद्रीकरणाच्या निर्णयाचे सावट होते. विमुद्रीकरणामुळे अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला याची अप्रत्यक्ष कबुली आर्थिक सर्व्हेक्षण अहवालातून मिळाली होती. त्या दृष्टीने तळाच्या घटकाची क्रयशक्ती वाढविण्यासाठी काही पाऊले उचलली आहेत. परंतू काही उपाय अगदीच तकलादू आहेत. पाच राज्यांमध्ये मतदारांना गाजर या सारख्या नैमितीक मोहांना बळी न पडता वित्तीय शहाणपणाचा केंद्रीय अर्थसंकल्प २०१७ सादर केला. ग्रामीण आणि शहरीचा दोन्हींना नाराज न करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो शेतकरी, ग्रामीण जनता, युवा पिढी, गरीब आणि दुर्बल घटक, पायाभूत सूविधा, सषक्त वित्तीय क्षेत्र, डिजीटल अर्थव्यवस्था आणि जास्तीत जास्त लोकांचा कर चुकविण्याऐवजी तो भरावसा वाटावा अशी करव्यवस्था या मुख्य मुददयावर भर देत त्यांनी अर्थसंकल्पाची मांडणी केल्याचे दिसते. हे करत असताना वित्तीय तूट तीन टक्क्यांहून व महसूली तूट दोन टक्क्यांहून अधिक होणार नाही याचीही त्यांनी काळजी घेतल्याचे दिसते.

■■■

*लेखक देगलूर महाविद्यालय, देगलूर येथे संशोधन मार्गदर्शक आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख आहेत*

e-mail: ashoktiparse21@gmail.com




विकास समर्पित
मासिक
**योजना**
नियमित वाचा,
वर्गणीदार व्हा.

# अर्थसंकल्पातील नवे बदल : संरचनात्मक आणि प्रक्रीयात्मक

हॅप्पी पंत




***यावेळी अर्थसंकल्पीय प्रक्रियेत अनेक बदल झाले, उदाहरणार्थ, रेल्वे अर्थसंकल्प वेगळा न मांडता तो सर्वसाधारण अर्थसंकल्पात विलीन करण्यात आला. केंद्र सरकारने व्यय अर्थसंकल्पात योजना आणि बिगर-योजना असे वर्गीकरण बंद केले. तसेच, अर्थसंकल्प सादर करण्याची तारीख एक महिना आधीची ठरवण्यात आली.***

बारावी पंचवार्षिक योजना संपण्याच्या मार्गावर असताना अर्थसंकल्पीय प्रक्रियेत होत असलेल्या मोठ्या बदलांमुळे, गेल्या दोन वर्षांत सरकार बरेच महत्वाचे निर्णय घेऊ शकले आहे त्यामुळेच, यावर्षी एक फेब्रुवारीला सादर झालेल्या या अर्थसंकल्पात या बदलांची अंमलबजावणी करण्यासाठीचा मार्ग मोकळा झाला. एकूणच २०१७-१८ चा केंद्रीय अर्थसंकल्प ह्या धोरणांच्या अनुषंगाने वित्तीय तूट सातत्याने दर्शवत आहे. यावेळी अर्थसंकल्पीय प्रक्रियेत अनेक बदल झाले, उदाहरणार्थ, रेल्वे अर्थसंकल्प वेगळा न मांडता तो सर्वसाधारण अर्थसंकल्पात विलीन करण्यात आला. केंद्र सरकारने व्यय अर्थसंकल्पात योजना आणि बिगर-योजना असे वर्गीकरण बंद केले. तसेच, अर्थसंकल्प सादर करण्याची तारीख एक महिना आधीची ठरवण्यात आली.

**सर्वसाधारण अर्थसंकल्पात रेल्वे अर्थसंकल्प विलीन करणे**

ह्या अर्थसंकल्पातील सर्वात मोठा बदल म्हणजे रेल्वे अर्थसंकल्प सर्वसाधारण अर्थसंकल्पाचाच भाग म्हणून सादर करण्यात आला . नीती आयोगाच्या सल्ल्यानुसार हा निर्णय घेण्यात आला होता. यामुळे, रेल्वे अर्थसंकल्प वेगळा सादर करण्याची ९२ वर्षांची परंपरा संपुष्टात आली. ब्रिटिश राजवटीत, १९२० च्या सुरुवातीपासून रेल्वेचा वित्तीय कारभार इतर सर्वसाधारण आर्थिक कारभारापासून वेगळा ठेवण्यात आला होता. ह्या विलीनीकरणामुळे, रेल्वेच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल असा युक्तिवाद करण्यात येत आहे.

अशी चिंता वर्तवली जात आहे कि हे विलीनीकरण केवळ उटणे बदल आहेत; ह्यापेक्षा एक दशकापूर्वी स्थापन करण्यात आलेल्या राकेश मोहन समितीच्या रेल्वे पुनर्रचनेबद्दलच्या शिफारशी अंमलात आणणे अधिक आवश्यक आणि उपयुक्त ठरले असते. ह्या समितीच्या शिफारशीनुसार, 'रेल्वे गुंतवणूक एक दुष्टचक्र होऊन बसले आहे, दुर्मिळ स्त्रोतांचे चुकीचे वाटप, वाढता कर्जबाजारीपणा, हलक्या दर्जाची ग्राहक सेवा आणि वेगाने खालावत जाणारे रेल्वेचे अर्थशास्त्र' ही या दुष्टचक्रामागची प्रमुख कारणे आहेत.या सगळ्यात, भारतीय रेल्वेबाबत कायम पडलेला प्रश्न म्हणजे रेल्वे एक व्यावसायिक संस्था आहे की सार्वजनिक कल्याणाच्या उद्देशाने काम करणारी संस्था ? म्हणूनच, राकेश मोहन समितीच्या मते भारतीय रेल्वेचे आधुनिकीकरण गरजेचे आहे, नॉन-कोर उपक्रम बंद करणे आणि रेल्वेचा पुनर्रचनेसाठी सुधारित व्यवस्थापन प्रणालीचा अंगीकार करणे

आवश्यक आहे. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम रेल्वेचा सादरीकरणावर होतो आणि म्हणून अनेक समित्यांनी मागणी केली आहे की भारतीय रेल्वेसाठीचा खर्च थेट केंद्रसरकारच्या किंवा राज्यसरकारकडून भरला गेला पाहिजे.

**योजना आणि बिगर-योजना खर्च वर्गीकरण संपवणे**

योजना आणि गैर-योजना म्हणून खर्च वर्गीकरण करणे ही पध्दत अर्थसंकल्पात पहिल्यांदा १९५१ पासून म्हणजेच, पहिल्या पंचवार्षिक योजनेंअंतर्गत सुरू करण्यात आली होती आणि त्यावेळी योजना आयोग सर्व योजनासाठीच्या निधीवाटपाच्या अंदाजाचे निर्णय घ्यायचे. सरकारच्या कार्यक्रम आणि योजना खर्चाचा तपशील चालू पंचवार्षिक योजनेअंतर्गत असायचा. हे खर्च सर्वप्रकारचे असायचे. आवर्ती (किंवा महसूल) किंवा भांडवली खर्च. उदाहरणार्थ, सर्वशिक्षा अभियानाअंतर्गत शिक्षकांच्या वेतनावरचा खर्च हा नियोजित महसूल खर्च, आणि शाळा इमारत बांधकाम खर्च हा नियोजित भांडवली खर्च म्हणून गणला जायचा. बिगर-योजना खर्चात नियोजन आयोगाच्या कार्यकक्षेत पंचवार्षिक नियोजनाबाहेरची किंवा केंद्र सरकारने सेवांवर खर्च केलेली रक्कम असे. उदाहरणार्थ, बिगर-नियोजित अर्थसंकल्पात व्याजाची रक्कम,अनुदान, वेतन आणि निवृत्तीवेतनाची रक्कम, मालमत्ता किंवा पायाभूत सुविधा क्षेत्रातील निधी, पोलिस, संरक्षण,यासाठीचा खर्च (क्षेत्रातील नियमित संवर्गातील कर्मचारी) यांचा समावेश होता. हे उल्लेखनीय आहे की फक्त संरक्षण, पोलीस किंवा व्याजाची रक्कम इत्यादी कारणांसाठी बिगर योजना खर्चात मोजत नाही. शिक्षण आणि आरोग्यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात, पायाभूत सुविधा आणि मालमत्ता देखभाल सर्व कायमस्वरूपी संवर्गातील शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन आणि स्त्रोतीवरील खर्च अशा क्षेत्रातही बिगर-नियोजित खर्चाचे अंदाजपत्रक असायचे .

आतापर्यंत करण्यात आलेला आराखड्यानुसारचा (नियोजित)खर्च आणि बिगर-योजना खर्चाचे वर्गीकरण समजून घेण्यासाठी आपण काही उदाहरणे वापरू शकतो. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्ते बांधण्याचे काम ग्रामीण विकास मंत्रालयाने ‘निधी योजना खर्च’ असे वर्गीकरण करून पाठविले, पण त्या रस्त्यांचा देखभालीचे काम बिगर नियोजित वर्गवारीत येते. केंद्रीय विद्यालये, नवोदय विद्यालये, इतर सरकारी शाळांमध्ये कायमस्वरूपी शिक्षकांना वेतनाचे वाटप; आरोग्य केंद्रे आणि सरकारच्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये कायमस्वरुपी संवर्गातील डॉक्टरांच्या वेतनासाठीचा निधी, बिगर योजना अर्थसंकल्पाअंतर्गत येतात,तर राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) चे कंत्राटी डॉक्टर आणि सर्वशिक्षा अभियान (एस. एस.ए) चे कंत्राटी शिक्षक ह्यांचे पगार अर्थसंकल्पातील नियोजित वर्गवारी अंतर्गत होतात. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात मात्र हे सर्व खर्च एकत्र दाखवण्यात येतील.

योजना आणि बिगर-योजना खर्चाचे अर्थसंकल्पात विभाजन केल्यामुळे लोकांची दिशाभूल झाली की योजना खर्च विकासासाठी आणि बिगर-योजना निधी इतर कामांसाठी आहे .ह्यामुळे नियोजित खर्चावर जास्त लक्ष केंद्रित करण्यात आले आणि बिगर-योजना म्हणून वर्गीकृत करण्यात आलेल्या क्षेत्रांच्या कामांकडे सोयीस्कर दुर्लक्ष करण्यात आले. याचा परिणाम म्हणून, राज्यांमध्ये कायम संवर्गातील कर्मचाऱ्यांचा तुटवडा निर्माण झाला.ह्या विभाजनाचा परिणाम असा झाला की उपलब्ध स्त्रोतांचे विभाजन झाले आणि महत्वाच्या सेवा देण्याचे अंदाजी खर्च पडताळता नाही आले. २०१७-१८ साठीच्या केंद्रीय अर्थसंकल्पापासून संपूर्ण खर्च एकत्रित मांडण्यात येणार आहे. तो आराखडा, योजना आणि बिगर-योजना खर्चात विलीन केल्यामुळे उपलब्ध साधनांचे वाटप सोपे होईल ज्यामुळे एक चांगला दुवा जोडण्यात मदत होईल. योजना आणि बिगर-योजना खर्च विलीनीकरण परीक्षणासाठी नेमेलेल्या कृतीगटानुसार योजना आणि बिगर-योजना खर्च वर्गीकरण वाटपातील फरक दूर करण्यामागचा हेतू असा की त्यामुळे विविध केंद्रे आणि मंत्रालयांसाठीच्या निधीवाटपाचा समग्र आढावा घेता यावा.

आतापर्यंत, दलितांसाठी अनुसूचित जाती उप-योजना (SCSP) योजनेअंतर्गत अर्थसंकल्पामध्ये १६.६ टक्के निधीचे वाटप होत होते. ह्या अर्थसंकल्पात दलितांसाठीचे वाटप स्टेटमेंट 10A अंतर्गत ’अनुसूचित जाती कल्याण वाटप’, ह्या घटकाखाली करण्यात आले आहे. पण संबंधित डिपार्टमेंट आणि मंत्रालयाने ह्यासाठी कुठले मापदंड वापरले हे अस्पष्ट आहे. खरंतर हे नवीन नियम अहवाल मंत्रालय आणि डिपार्टमेंटने SCSP अंतर्गत विकसित करावी, हे महत्वाचे आहे. अशी अनेक राज्ये आहेत ज्यांना हा फरक नाहीसा करून केंद्रीय अर्थसंकल्पाच्या धर्तीवर नवीन प्रयोग करायला आवडेल. त्यासाठी केंद्रांनी ह्या दिशेने काही ठोस पावले उचलली पाहिजे जेणेकरून राज्यांना पुढील खर्चाचे अंदाजपत्रक सादर करताना अडचणी येणार नाहीत.

योजना आणि बिगर-योजना खर्चातील फरक वगळला गेला असला तरी, ‘भांडवली’ आणि ‘महसूल’ वर्गीकरणावर अति जास्त लक्ष केंद्रित

केल्यामुळे महत्वाच्या अशा शिक्षण आणि आरोग्यावर होणाऱ्या अशा खर्चाबाबत समस्या उभी राहू शकते कारण त्या खर्चाला महसुली खर्च दाखवण्यात येते. नवीन नियोजन आराखड्यात भूमिका आणि नियोजन महत्त्व, विशेषत: उप-राष्ट्रीय स्तरावर सुरू करू नये. हे विकेंद्रित नियोजन विकासातील फरक लोकांचा गरजेनुसार भरून काढण्यात सर्वात महत्वाचे आहे. जिल्हा नियोजन समिती (डीपीसी) एक घटनात्मक संस्था असूनही दुर्लक्ष राहिली आहे, हे जाणवते. पंचवार्षिक योजना संपताना, जिल्हा नियोजन समित्यांना जिल्हा आणि राज्यपातळीवर सशक्त करणे आवश्यक आहे. फार पूर्वी पंचवार्षिक योजनेच्या धोरणानुसार प्रादेशिक असंतुलन दुरुस्त करण्यासाठी पॅकेजेसला मंजुरी द्यायचे. आपले ध्येय न विसरता, केंद्राने मागासवर्गीय भाग ओळखून प्रादेशिक तफावत कमी करण्यासाठी हस्तक्षेप केला पाहिजे.

**अर्थसंकल्प नियोजित वेळेआधी सादर करणे**

यावेळी केंद्रीय अर्थसंकल्प एक फेब्रुवारीला, एक महिना अगोदर सादर करण्यात आला. गेल्यावर्षीपर्यंत, नियम असल्यासारखा अर्थसंकल्प दर फेब्रुवारीत कामकाजाच्या शेवटच्या आठवड्यात लोकसभेत सादर केला जायचा. २०००पर्यंत तर ब्रिटिशकालीन प्रथा पाळत संध्याकाळी पाच वाजता केंद्रीय अर्थसंकल्प सादर होत असे; आधीच्या रालोआ सरकारच्या काळात ती वेळ सकाळी ११ करण्यात आली. एक महिना आगाऊ केंद्रीय अर्थसंकल्प सादर करण्याचा चांगला परिणाम असा होणार की त्यासाठी आवश्यक त्या सर्व कायद्यांना मान्यता मिळण्याची प्रक्रिया नवे आर्थिक वर्ष सुरु होण्यापूर्वी पूर्ण होऊ शकेल. केंद्रीय योजनांसाठीचे निधीवाटप लवकरात लवकर सुरु करावे जेणेकरून विविध मंत्रालय राज्यांना आणि इतर योजनांना निधी पहिल्या तिमाहीत मिळू शकेल. याआधी, संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात सुरु होत असे.मधल्या एका सुट्टीसह मे महिन्यापर्यंत हे अधिवेशन चालायचे. विनियोजन विधेयक अधिवेशनाच्या उर्वरित सत्रात संमत केले जायचे, ज्यामुळे संसदेच्या समित्यांच्या परवानग्या मिळविण्यासाठी मार्चमध्ये वोट ऑन अकाऊंट घेतले जायचे आणि नंतरच भारताच्या एकत्रित निधीतून पैसे काढून पुढील दोन-तीन महिन्याचा खर्च निघू शकायचा. २०१७-१८ चे केंद्रीय अर्थसंकल्प सादरीकरण एका महिन्याने आधी करण्यामागची मुख्य भूमिका अशी की, नवीन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच राज्य आणि इतर अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडे सर्व संबंधित मंत्रालयांकडून निधी वेळेत पोहोचला पाहिजे.

पण ह्यामध्ये काही आव्हाने आहेत. अर्थसंकल्प सादर करण्याची तारिख आधीची ठरवणे यातला तोटा म्हणजे व्यापक महसूल आणि खर्चविषयक माहितीच्या उपलब्धतेचा अभाव असणे. गेल्यावर्षीपर्यंत, अर्थसंकल्प मांडणीची प्रक्रिया फेब्रुवारीच्या १५ तारखेपर्यंत अंतिम टप्प्यात पोहोचायची आणि तोपर्यंत त्या आर्थिक वर्षातल्या पहिल्या नऊ महिन्यांचा महसूल संग्रह आणि खर्च ट्रेंड डेटा उपलब्ध होत असे.पण यावर्षी, अर्थव्यवस्थेतील जीडीपी आणि क्षेत्रीय विकासाचा वापरलेला डेटा आर्थिक वर्ष २०१६-१७ मधल्या फक्त पहिल्या दोन तिमाहीवर आधारित असण्याची शक्यता आहे. याशिवाय, अन्य खूप अडचणींनी भरलेला असू शकतो. संसदेला आणि स्थायी समित्यांना ह्यावर चर्चा करण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल की नाही हादेखील प्रश्न आहे.

अर्थसंकल्पीय भाषणात प्रथमच सर्व मंत्रालये आणि डिपार्टमेंट्स चे एकत्रित अर्थसंकल्प सादर करण्यात आले. ह्या बजेट चे उद्देश सार्वजनिक खर्चाच्या परिणामांवर लक्ष केंद्रित ठेवणे, विशेषत: विकास कार्यक्रम आणि अन्य योजनांतर्गत होणारा खर्च. ह्यामुळे, सरकारी कार्यक्रमांतर्गत खर्च होणाऱ्या लोकांच्या पैशाबद्दल माहिती मिळू शकेल.

**अर्थसंकल्प प्रभावी करण्यासाठी इतर पावले**

अर्थसंकल्पीय प्रक्रियेतील काही बदल सार्वजनिक खर्च व्यवस्थापन सुधारण्यावर लक्ष देतील आणि म्हणूनच त्या दिशेने हा एक योग्य पर्याय आहे. पण फक्त ही पावले सामाजिक क्षेत्रातील सरकारने केलेल्या खर्चाचे योग्य आणि चांगले परिणाम देण्यासाठी पुरेशी नाहीत. ह्या सगळया प्रक्रियेत जिल्हा नियोजन समितीचे बळकटीकरण महत्त्वपूर्ण असेल. सरकारी खर्चाबद्दलची विस्कळीत माहिती समजून घेणे हे जिल्हा पातळीवरचे एक मोठे आव्हान आहे. ही सर्व माहिती वेळेत सार्वजनिक रित्या उपलब्ध करून देण्याने विकास योजनांसाठी होणाऱ्या निधीच्या वापरावर लक्ष अधिक चांगल्या पद्धतीने ठेवता येईल. ज्याचा परिणाम सार्वजनिक खर्चावर होईल. हे महत्वाचे उद्दिष्ट एकीकृत करून अर्थसंकल्पीय प्रक्रियेत आणणे आवश्यक आहे.

■■■

*लेखक नवी दिल्ली स्थित आर्थिक-प्रशासनिक विषयक धोरण संशोधन संस्थेत कार्यरत आहेत.*

e-mail: happy@cbgaindia.org

# केंद्रीय अर्थसंकल्प एक मूल्यमापन

सुभाष राठोड



***'अंदाजपत्रक म्हणजे पूढील वर्षी होणारा महसूल व खर्च ह्याबाबतचा अंदाज होय.' याचा अर्थ असा आहे की, अंदाजपत्रकात सरकारचे उत्पन्न व खर्च याबाबतची अंदाजीत आकडेवारी असते भारतात नविन आर्थिक वर्ष 1 एप्रिल-2017 ते 31 मार्च-2018 हे वर्ष सुरु होण्यापूर्वी अर्थमंत्र्याला जनतेचे निवडून दिलेल्या प्रतिनिधी समोर अंदाजपत्रक सादर करावे लागते. हे अर्थसंकल्प एका वर्षासाठी मांडले जाते. हे बजेट मांडण्यापूर्वी सरकारी धोरण नूसार अंमल करावा लागतो.***

अंदाजपत्रकात सरकारच्या उत्पन्न व खर्चाचा समावेश असतो. सरकारच्या आर्थिक परिस्थितीचे चित्र अर्थसंकल्पावरुन स्पष्ट होते. अर्थसंकल्प यालाच अंदाजपत्रक किंवा इंग्रजीत 'बजेट' म्हणतात. जो पर्यंत अर्थमंत्री या योजना व योजनात्तर आर्थिक नियोजन लोकसभेला सादर करत नाही तो पर्यंत या योजना गुप्त राहतात. देशाच्या अर्थकारणाला योग्य वळण देण्याकरीता, आर्थिक स्थैर्य निर्माण करण्यासाठी तसेच आर्थिक विकासाचा वेग वाढवण्यासाठी राजकोषीय धोरणाचा उपयोग होतो.

**भारतीय अर्थसंकल्पाचा इतिहास**

भारतात पहिला अर्थसंकल्प एप्रिल-१९६० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने, ब्रिटीश राजसत्तेकडे केला. पहिला भारतासाठीचा अर्थसंकल्प १८ फेंब्रुवारी-१९६९ ला जेम्स विल्सन या ब्रिटीश अधिकाऱ्याने मांडला भारताचे पहिले अर्थमंत्री सर आर.के. षण्मुखम चेट्टी हे होते. त्यांनी स्वतंत्र भारताचा पहिला अर्थसंकल्प २६ नोव्हेंबर-१९४७ ला मांडला. तिसरे अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांनी १९५१-५२ साली भारताचा आंतरीम अर्थसंकल्प मांडला.

भारतीय संविधान कलम ११० नूसार 'धन विधेयक' या प्रकारच्या प्रयोजनार्थ, एखाद्या विधेयकात केवळ पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींशी संबंधीत असलेल्या तरतुदी असतील तर ते धन विधेयक असल्याचे मानले जाते.

A) कोणतेही कर बसवणे, बदल करणे त्याचे विनिमय करणे.

B) भारत सरकारने पैसा कर्जाऊ घेणे, किंवा कोणतीही हमी देणे यांचे विनिमय अथवा भारत सरकारने पत्करलेल्या कोणत्याही वित्तीय योजनामध्ये सुधारणा करणे.

C) भारताचा एकत्रित निधी किंवा आकस्मित निधी यांची अभिरक्षा करणे, निधीत पैशाचा भरणा करणे किंवा त्यातून काढणे.

D) भारताच्या एकत्रित निधीतील पैशांचे विनियोजन.

E) कोणताही खर्च भारताच्या एकत्रित निधीवर भारीत असलेला खर्च म्हणून घोषित करणे किंवा अशा कोणत्याही खर्चाची रक्कम वाढवणे.

एखादे विधेयक हे, धन विधेयक आहे किंवा नाही असा प्रश्न उद्भवल्यास

लोकसभेच्या अध्यक्षाचा त्यावरील निर्णय अंतीम असेल. प्रत्येक धन विधेयक, अनुच्छेद १०९ खाली राज्यसभेकडे पाठविण्यात येईल तेव्हा अनुच्छेद ११० खाली राष्ट्रपतीस, त्याच्या अनुमतीकरीता सादर करण्यात येईल तेव्हा ते धन विधेयक आहे, असे लोकसभेच्या अध्यक्षाच्या स्वाक्षरीने प्रमाणपत्र त्यावर पृष्ठांकीत केलेले असेल.

संविधान कलम ११२ नूसार 'वार्षिक वित्तीय विवरणपत्र' राष्ट्रपती प्रत्येक वित्तीय वर्षाबाबत, भारत सरकारची त्या वर्षापूरती अंदाजीत जमा व खर्च यांचे 'वार्षिक वित्तीय विवरण पत्र' म्हणून संसदेच्या दोन्ही सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील. म्हणजेच भारताच्या एकत्रित निधीवर प्रभारीत असलेला खर्च म्हणून उपयोग केला जातो. जो खर्च भारताच्या एकत्रित निधीतून करावयाचा असे प्रस्तावित केले असता असा अन्य खर्च भागविण्याकरीता आवश्यक असलेल्या रक्कमा, वेगवेगळ्या दाखवण्यात येतील, आणि महसूली लेखावरील खर्च अन्य खर्चाहून वेगळा दाखवण्यात येईल. असा स्पष्ट उल्लेख संविधानात करण्यात आला आहे म्हणून 'वार्षिक वित्तीय विवरणपत्र' च्या माध्यमाने अर्थमंत्री बजेट जाहीर करत असतो.

स्थूलमानाने अंदाजपत्रक म्हणजे पुढील वर्षी होणारा नियोजीत खर्च यांचे अंदाज ठरवून जमा व खर्च यांची तयार केलेली यादी होय. प्रा. हॅनसन च्या मते: 'अंदाजपत्रक म्हणजे पूढील वर्षी होणारा महसूल व खर्च ह्याबाबतचा अंदाज होय.' याचा अर्थ असा आहे की, अंदाजपत्रकात सरकारचे उत्पन्न व खर्च याबाबतची अंदाजीत आकडेवारी असते. भारतात नविन आर्थिक वर्ष १ एप्रिल-२०१७ ते ३१ मार्च-२०१८ हे वर्ष सुरु होण्यापूर्वी अर्थमंत्र्याला जनतेचे निवडून दिलेल्या प्रतिनिधी समोर अंदाजपत्रक सादर करावे लागते. हे अर्थसंकल्प एका वर्षासाठी मांडले जाते. हे बजेट मांडण्यापूर्वी सरकारी धोरण नूसार अंमल करावा लागतो. सरकारी धोरण म्हणजे. 'देशातील जनतेचा सर्वांगीण विकास घडविणारी निती होय' यामध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, औद्योगिक प्रशासकीय इत्यादी क्षेत्रात विकास अपेक्षित आहे. सरकारी धोरणानूसार विकासाचा उल्लेख उंचावतो. दरवर्षी बजेट मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते. गेल्या वर्षी १९ लाख कोटी रुपयाचा अर्थसंकल्प होता. यावर्षी म्हणजे १ एप्रिल-२०१७ ते ३१ मार्च-२०१८ साठी १ फेंब्रुवारी-२०१७ रोजी अर्थमंत्री अरुण जेटली यांनी लोकसभेत अर्थसंकल्प मांडला. त्यामध्ये आर्थिक वर्षासाठी २१ लाख ७४ हजार करोड रुपयांची तरतूद जाहीर करण्यात आली आणि आर्थिक विकास दर ७.५% पर्यंत नेण्यात येईल असा अंदा वर्तवीला आहे.

---

***स्थूलमानाने अंदाजपत्रक म्हणजे पुढील वर्षी होणारा नियोजीत खर्च यांचे अंदाज ठरवून जमा व खर्च यांची तयार केलेली यादी होय. प्रा. हॅनसन च्या मते: 'अंदाजपत्रक म्हणजे पूढील वर्षी होणारा महसूल व खर्च ह्याबाबतचा अंदाज होय.' याचा अर्थ असा आहे की, अंदाजपत्रकात सरकारचे उत्पन्न व खर्च याबाबतची अंदाजीत आकडेवारी असते.***

---

नोटाबंदीनंतर सर्वांचे लक्ष लागलेल्या बजेटमध्ये तीन महत्वाच्या घोषणा आहेत-

१) ३ लाखांपेक्षा अधिक रोखीने व्यवहार करता येणार नाही. कारण ही मर्यादा अधिकची असल्यास समांतर अर्थव्यवस्था निर्माण होते. असे अर्थमंत्री जेटली यांनी मत मांडले.

काळा पैसा घेतलेला निर्णय कितपत योग्य आहे, यावर सामाजिक कार्यकर्ते यांचे मत सुध्दा अयोग्य आहे. केवळ पैशाची मर्यादा ठेवल्याने काळा पैसा निर्माण होणार नाही असे ठामपणे कोणीही सांगू शकत नाही. यावर अर्थमंत्री म्हणतात,

नई दुनिया है,<br>
नया दौर है,<br>
नई है उमंग....<br>
कुछ थे पहीले के तरीके,<br>
तो कुछ है आज के रंग ढंग,<br>
रोशनी आके अंधेरी से जो टकराई है,<br>
काले धन को भी बदलना पडा आज अपना रंग !६

२) राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्या यामध्ये पारदर्शकता यावी यासाठी राजकीय पक्षांना फक्त २०००/- रुपये पर्यंतचे निर्बंध घातले आहे. म्हणजेच २०००/- रुपये पेक्षा अधिक रोखीने व्यवहार करता येणार नाही. त्यापेक्षा अधिकचे व्यवहार कॅशलेसने करावे लागेल व त्यांना हिशोब द्यावा लागेल, ही मर्यादा पूर्वी २०,०००/- हजार रुपये होती.

३) प्राप्तिकर रचनेत महत्वाचे बदल करण्यात आले.

| उत्पन्न रुपयात | प्राप्तीकर २०१६-२०१७ | प्राप्तीकर २०१७-२०१८ |
|---|---|---|
| २,५०,०००/- | ० % | ० % |
| २,५०,०००/- ते ५,००,०००/- | १० % | ५ % |
| ५,००,०००/- ते १०,००,०००/- | २० % | २० % |
| १०,००,०००/- च्या पुढे.. | ३० % | ३० % |

वार्षिक उत्पन्नावर शिक्षण उपकर + दुय्यम कर आणि उच्च शिक्षण उपकर असे ३% एकूण प्राप्तिकर वर आकारला जाईल. वार्षिक उत्पन्न ५० लाख रुपये ते एक कोटी रुपयांच्या दरम्यान एकूण प्राप्तीकराच्या वर १०% सरचार्ज आणि वार्षिक उत्पन्न एक कोटी रुपयाहून अधिक असल्यास एकूण प्राप्तीकर यावर १५% सरचार्च राहील.

तसेच प्राप्तिकर विवरणपत्रे छाननी (स्क्रुटिनी) करण्यासाठी असणारी २१ महिन्यांची मुदत १८ महिने करण्यात आली आहे. म्हणजेच असेसमेंट २०१५-२०१६ ची छाननी ऑक्टोंबर-२०१७ पर्यंत पूर्ण करावी लागते. आता दिलेल्या मुदतीनंतर प्राप्तिकर विवरणपत्र भरावयाचे असल्यास ते जास्तीत-जास्त आर्थिक वर्षानंतर एक वर्षांत भरता येईल. पूर्वी ही मुदत २ वर्षा होती. तसेच उशिरा भरलेल्या विवरणपत्रासाठी आता दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

अर्थसंकल्पामध्ये संगणकीकरण, आधुनिक तंत्रज्ञानाचे वापर, कॅशलेश, व्यवहार यांच्यावर थर असून तंत्रज्ञान आधारित भारत विकसित करण्याच्या दृष्टीने वाटचाल करणार असल्याचे दिसून येते. ऑनलाईन, डिजिटल यंत्रणेसाठी आगामी आर्थिक वर्षासाठी नविन दृष्टीकोन पुढील प्रमाणे आहेत.

१) डिजिटल पेमेंट साठी पेमेंट रेग्यूलेटरी बोर्ड स्थापन करणार.

२) 'टेक इंडिया'

३) भिम ऍपशी निगडीत 'आधार पे' लवकरच सुरु होणार.

४) ज्येष्ठ नागरीकासाठी हेल्थ कार्ड सुरु करणार.

***प्राप्तिकर विवरणपत्रे छाननी (स्क्रुटिनी) करण्यासाठी असणारी २१ महिन्यांची मुदत १८ महिने करण्यात आली आहे. म्हणजेच असेसमेंट २०१५-२०१६ ची छाननी ऑक्टोंबर-२०१७ पर्यंत पूर्ण करावी लागते. आता दिलेल्या मुदतीनंतर प्राप्तिकर विवरणपत्र भरावयाचे असल्यास ते जास्तीत-जास्त आर्थिक वर्षानंतर एक वर्षांत भरता येईल.***

५) आधारकार्ड द्वारे खरेदी करता येणार, डेबिट कार्ड प्रमाणे त्याचा वापर करता येईल.

६) पोस्ट ऑफीस मूख्यालयातून पासपोर्ट मिळणार.

नविन आर्थिक वर्षासाठी वरील सहा निर्णय अर्थसंकल्पा नमूद करण्यात आले आहेत.

**ग्राम सुधारणा, शेती, रस्ते व महामार्ग**

प्रत्येक गावात इंटरनेट जोडण्यासाठी 'डिजीगांव' योजना, एक लाख ५० हजार ग्रामपंचायती 'हॉटस्पॉट ने जोडणार', मायक्रो सिंचन निधीसाठी ५ हजार कोटींची तरतूद, महामार्गासाठी ६४ हजार ९०० कोटींचा निधी, वाहतूक मार्गाच्या विकासासाठी २ लाख ४१ हजार ३४७ कोटी, दहा लाख शेततळ्याचे उद्दिष्ट; निम्मे उद्दिष्ट पूर्णत्वाच्या मार्गावर, प्रत्येक गावात २०१८ पर्यंत वीज, त्यासाठी ४५०० कोटींची तरतूद, दूध प्रक्रिया उद्योगासाठी आठ हजार कोटीची तरतूद, पीक विम्यासाठी नऊ हजार कोटी उपलब्ध करुन देणार. केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी कृषी आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी काही घोषणा केल्या. आगामी वर्षासाठी शेतकऱ्यांच्या पतपूरवढ्यात ११ टक्यांनी वाढ करुन दहा लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. कृषी आणि शेतकऱ्यासाठी ५८,६६३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात ५२,८२१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच शेतकऱ्यांना कृषी कर्जासाठी १५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. असे पीक कर्ज अल्प मुदतीसाठी देण्यात येणार आहे.

पूढील आर्थिक वर्षात कृषी दर ४.१ टक्के राहणार आहे. मान्सून चांगला राहणार असल्याने कृषी उत्पादनात वाढ होणार असल्याची आशा अर्थमंत्री अरुण जेटली यांनी व्यक्त केली. सांगितली. तसेच संकटापासून शेतकऱ्यांना सुरक्षा देण्यासाठी पीक विमा योजना सुरु करण्यात आली आहे.

वर्षासाठी पीक विमा योजनेत ९ हजार कोटी रुपयाचे वाटप करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचा विकास होत असेल तर कृषी दर वाढेल. परंतू प्रत्यक्षात असे दिसून येते की, शेतकरी अधिक गरीब होताना दिसून येतो. केवळ सिंचन सुविधा वाढवल्यामुळे कृषीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांचा विकास झाला हे म्हणणे चूकीचे आहे. हवामानातील बदलामूळे धोक्यात आलेल्या शेती पीकासाठी विशेष पाऊल उचण्याची गरज होती. त्यासाठी शेतकऱ्यांना पाच लाख रुपयांपर्यंत कर्ज हे बीगर व्याजी देणे गरजेचे होते.

पंतप्रधान कृषी सिंचन योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या अंतर्गत २८.५ लाख हेक्टर जमीन सिंचनासाठी आणण्यात येणार आहे.

आगामी वर्षात कृषी दर ४.१ टक्के राहणार आहे. नैसर्गिक आपत्ती शेतकऱ्यांना सुरक्षा देण्यासाठी पीक विमा योजना सुरु करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात ३० टक्के भरपाई, आगामी वर्षासाठी ही मर्यादा ४० टक्क्यांवर तर पूढील वर्षात ५० टक्के करण्यात येणार आहे. पंतप्रधान पीकी विमा योजनेसाठी ९ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना ८.५ लाख कोटीवरुन १० लाख कोटी रुपये कर्ज वाढवून दिले आहे. मनरेगा अंतर्गत १० लाख तलाव बांधण्याची घोषणा सुध्दा करण्यात आली आहे. मनरेगासाठीची तरतूद ४० हजार कोटींवरुन ४८ हजार कोटी रूपये करण्यात आली आहे.

**सारांश :**

वेगवान विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भांडवल व तंत्रज्ञानाची गरज आहे. ती पूर्ण करण्यासाठी विदेशी गुंतवणूकीवर अवलंबून न राहता स्वत:चे तंत्रज्ञान विकसीत करण्यासाठी संशोधनावर भर देणे गरजेचे आहे. तसेच २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्रात सुधारणा करताना केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी उच्च शिक्षण संस्थामध्ये प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या सर्व परीक्षांसाठी स्वतंत्र आणि स्वायत्त राष्ट्रीय परीक्षा संस्था स्थापित करणार, अशी घोषणा केली. विशेषतज्ञ डॉक्टरांची वाढती गरज पाहता वैद्यकीय शिक्षणात पदव्यूत्तर शिक्षणासाठी दरवर्षी ५००० हजार अतिरिक्त जागा निर्माण केल्या जाणार आहेत.१२ युवकासाठी ३५० ऑनलाईन पाठ्यक्रम सुरु करणे यासाठी तंत्रज्ञानाच्या माध्यमाने शिकवण्या घेत त्यांना डीटीएच आणि इंटरनेटशी जोडण्याचा प्रस्ताव आहे.

भारतातील 'मजूर' व कंपनी क्षेत्रातील लोकांना त्याच्या पात्रतेनूसार मोबदला मिळावा. असावा. कृषी क्षेत्रातील उत्पादीत वस्तूला हमी भाव मिळाला पाहीजे. शेती क्षेत्रात जे उत्पादन होते त्या वस्तूची किंमत ठरवताना शेतकऱ्यांनीच ठरवणे आवश्यक आहे.

दरवर्षी संतूलीत अंदाजपत्रक असावे. अशा वेळी देशाच्या अर्थव्यवस्थेला निश्चीत दिशा देता येईल. गृह कर्जावरील व्याजदर २ टक्के पर्यंत कमी होणे गरजेचे आहे. ग्राहक व बांधकाम व्यवसायीकांना अनेक मागण्या अपूर्णच आहेत. ग्राहक व गृहबांधणी उद्योगाला सर्वांगीन लाभ मिळणे आवश्यक आहे.

■■■

*लेखक प्रतिष्ठाण महाविद्यालय, पैठण, येथे अर्थशास्त्र विभाग प्रमुख आहेत.*
e-mail: drushtikon2018@gmail.com

**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

| | पुस्तकाचे नाव | मूल्य रु. |
|---|---|---|
| १ | तिरुक्कुरल (हिंदी) | ८५ |
| २. | प्राचीन भारत(हिंदी) | १२० |
| ३. | भारत-२०१७ (हिंदी) | ३५० |
| ४. | सांची कि गुडिया (हिंदी) | १३० |
| ५. | अनुवाद अध्ययन का परिदृश्य (हिंदी) | १५० |
| ६. | पर्यावरण और विकास (हिंदी) | १९० |
| ७. | भारत की लोककथाये (हिंदी) | ८० |
| ८. | India 2017 (English) | 350 |
| 9. | Indradhanush Vol. II | 1200 |

ही नवप्रकाशित पुस्तके आमच्या बेलापूर येथील कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. ही पुस्तके आगाऊ पैसे पाठविल्यास पोस्टाने घरपोच पाठविली जातील.

# दुर्बल घटकांचे कल्याण आणि विकास

श्रीकर नाईक



***अनुसूचित जाती, जमाती, स्त्रिया, मुले अल्पसंख्याक आणि अपंग या सामाजिक घटकांवर विशेष लक्ष एकाग्र करण्याची गरज आहे. या सामाजिक घटकांचे सामाजिक आर्थिक सबलीकरण करण्याचा शासनाचा उद्देश हा अर्थसंकल्प व्यक्त करतो. अर्थसंकल्पात या गटांसाठी वेगवेगळया खात्यांतर्गत भरीव तरतूद आहे.***

दुर्बल आणि शोषित घटकांसाठी २०१७-१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पाचा दृष्टीकोन हा आशावादी आहे. अर्थसंकल्पाचा एकंदर कल हा ग्रामीण भाग, पायाभूत सुविधा आणि गरीबी निर्मूलन या विषयांवर भर देणारा आहे. हा अर्थसंकल्प TEC India या संकल्पनवेर आधारित आहे TEC India म्हणजे T-Transform - yeoue, E-Energise - सबलीकरण आणि C-Clean - स्वच्छ भारत. बदल घडवून आणणे, सबल करणे आणि स्वच्छ करणे या संज्ञांचा विशेष संबंध समाजातील दुर्बल घटकांशी आहे. लोकांच्या आयुष्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रशासनाचा दर्जा उंचावण्याची गरज आहे आणि या अर्थसंकल्पात या सुशासनाची कल्पना मांडली आहे. समाजातील वेगवेगळे घटक विशेषत: शोषित घटकांच्या सषक्तीकरणाचे उद्दिष्ट यात आहे. त्यांची खरी गुणवत्ता विकसित करणे आणि त्यांच्या जीवनाचा दर्जा सुधारणे हा त्यामागचा मोठा उद्देश आहे.

अनुसूचित जाती, जमाती, स्त्रिया, मुले अल्पसंख्याक आणि अपंग या सामाजिक घटकांवर विशेष लक्ष एकाग्र करण्याची गरज आहे. या सामाजिक घटकांचे सामाजिक आर्थिक सबलीकरण करण्याचा शासनाचा उद्देश हा अर्थसंकल्प व्यक्त करतो. अर्थसंकल्पात या गटांसाठी वेगवेगळया खात्यांतर्गत भरीव तरतूद आहे. या तरतुदीतील काही वाढीव तरतुदी खालीलप्रमाणे :

i) अनुसूचित जातींच्या कल्याणाची तरतूद यापूर्वी याचे नाव अनुसूचित जाती उप योजना वर्श २०१६-१७ असे होते. ही तरतूद २०१६-१७ मध्ये ३८८३३ कोटी (BE) होती ती आता २०१७-१८ मध्ये ५२३९३ कोटी (BE) आहे म्हणजे एकंदर ३५ टक्के वाढ यात आहे.

ii) अनुसूचित जमातींच्या कल्याणची तरतूद यापूर्वी याला आदिवासी उप योजना (TSP) म्हणत.) ही २०१६-१७ मध्ये २४००.३९ कोटी (BE) होती ती आता २०१७-१८ मध्ये रु.३१९२० कोटी (BE) म्हणजे ३३% वाढवली आहे.

iii) लैंगिक समानता अर्थसंकल्प तरतूद ही २०१६-१७ मध्ये ९०७६९.८० कोटी (BE) होती ती आता ११३३२६.६५ कोटी (BE) म्हणजे २४.८५ टक्के इतकी २०१७-१८ मध्ये वाढवली आहे.

iv) बालक कल्याण तरतूद २०१६-१७ मध्ये ६५७५८.४५ कोटी (BE) होती ती २०१७-१८ मध्ये ७१३०५.३५ कोटी (BE) केली आहे

म्हणजे एकंदर वाढ ८.४४ टक्के आहे.

v) अल्पसंख्यांक विभाग मंत्रालयासाठी २०१६-१७ मध्ये ३८७७ कोटी (BE) तरतूद होती ती आता २०१७-१८ मध्ये ४१९५ कोटी (BE) इतकी म्हणजे साधारण ८.७६ टक्के वाढवली आहे.

२६ केंद्रीय मंत्रालय/विभागांनी अनुसूचित जातींच्या कल्याणसाठी तरतूद केली आहे तर ३२ केंद्रीय मंत्रालय/ विभागांनी अनुसूचित जमातींच्या कल्याणासाठी तरतूद केली.

एकंदर सर्वसाधारण तरतुदीत वाढ आहे. यात षेती, पेयजल पुरवठा, घरनिर्माण, आरोग्य शिक्षण इ. क्षेत्रातील योजनांकडे आपले लक्ष वेधले जाते. याची माहिती अनुसूचित जाती आणि जमातीबाबत दर्शवलेल्या अनुक्रमे १ आणि २ कोष्टकात मांडली आहे.

पंतप्रधान पीक विमा योजना (PMFBY) पंतप्रधान कृषी सिंचन योजना (PMKSY) या योजनात २०१६-१७ मधील तरतुदींपेक्षा २०१७-१८ मध्ये ४१ टक्के वाढ आहे. शेतकऱ्यांना दिलेल्या लघुमुदत कर्जांच्या व्याजासाठी अर्थसहाय्य ही २०१७-१८ मध्ये सुरू होणारी नवीन योजना आहे. यासाठी एकंदर १५००० कोटींची तरतूद आहे. यातील २४३० कोटीची तरतूद ही अनुसूचित जातींसाठी आहे. इतर योजनांपैकी ज्यात अनुसूचित जातींसाठी विषेश तरतूद असलेल्या योजना म्हणजे स्वच्छ भारत योजना ग्रामीण) ५५ टक्के वाढ, पंतप्रधान निवास योजना (PMAY) ग्रामीण ५० टक्के वाढ आणि पंतपधान कौशल्य विकास योजना (PMKSY) ५१ टक्के वाढ.

*कोष्टक १ अनुसूचित जातींसाठी विविध योजनांखालील तरतूद*

(रुपये कोटीमध्ये)

| मंत्रालय/विभाग | योजना | 2016&17 | 2017&18 | वाढ टक्के) |
|---|---|---|---|---|
| शेती सहकार शेतकरी कल्याण | पंतप्रधान पीक विमा योजना | ९२१ | १४८४-६७ | ६१-२० टक्के |
| शेती सहकार | | | | |
| शेतकरी कल्याण | शेतकरी अल्पमुदत कर्ज व्याज अर्थसाहाय्य योजना) | - | २४३०-०० | नवीन योजना |
| शेती सहकार | | | | |
| शेतकरी कल्याण | पंतप्रधान कृषीसिंचन योजना (PMKSY) | ३९१-३२ | ५५०-८० | ४०-७५ टक्के |
| पेय जल आणि अस्वच्छ जल नि:सारण योजना | स्वच्छ भारत योजना ग्रामीण | १९८० | ३०६८-६२ | ५४-९८ टक्के |
| पेय जल आणि अस्वच्छ जल नि:सारण योजना | राष्ट्रीय ग्रामीण पेय जल योजना | ११०० | १३३१-०० | २१ टक्के |
| आरोग्य आणि कुटुंब कल्याण | राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजना | ३९३१-०२ | ४२७२-९३ | ८-६९ टक्के |
| ग्रामविकास | पंतप्रधान निवास योजना | ५११६-७४ | ७६५२-७२ | ४९-५६ टक्के |
| कौशल्य विकास | पंतप्रधान कौशल्य विकास योजना | ३११-०० | ४७०-०० | ५१-१२ टक्के |
| शालेय शिक्षण आणि साक्षरता | नवोदय विद्यालय समिती | ३८०-०० | ४१८-२७ | १०-०७ टक्के |

या सर्व योजनांमध्ये अनुसूचित जमातींच्या कल्याणाचीही भरीव तरतूद आहे. पंतप्रधान पीक विमा योजनेत यासाठी ८३ टक्के वाढ आहे. पंतप्रधान कृषी सिंचन योजना (PMKSY) यात ४५ टक्के वाढ आहे. स्वच्छ भारत योजना ग्रामीण) यात ५५ टक्के वाढ आहे. पंतप्रधान गृह योजना ग्रामीण) यात ३९ टक्के वाढ आहे. तर पंतप्रधान कौशल्य विकास योजना (PMKVY) यात २०१६-१७ पेक्षा ५१ टक्के वाढ आहे. शेतकऱ्यांनी घेतलेल्या अल्प मुदतीच्या कर्जाच्या व्याजासाठी अर्थसहाय्य ही योजना या वर्षात नवीन आहे. २०१७-१८ मध्ये या योजने अंतर्गत अनुसूचित जमातींसाठी १२०० कोटीची तरतूद खाली दाखवलेल्या कोष्टक २ मध्ये नमूद केली आहे.

**कोष्टक २ - अनुसूचित जमातींच्या कल्याणासाठी वेगवेगळया योजनांखालील तरतूद**

(रुपये कोटीत)

| मंत्रालय/विभाग | योजना | 2016&17 | 2017&18 | टक्केवारीत वाढ |
|---|---|---|---|---|
| शेती सहकार शेतकरी कल्याण | पंतप्रधान पीक विमा योजना (PMFBY) | ३९२-८६ | ७१९-०४ | ८३-०२ |
| शेती सहकार | | | | |
| शेतकरी कल्याण | अल्प मुदतीच्या शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाच्या व्याजासाठी अर्थसाहाय्य | - | १२००-०० | नवीन योजना |
| शेती सहकार | | | | |
| आणि शेतकरी कल्याण | पंतप्रधान कृषी सिंचन योजना (PMKSY) | १८७-२० | २७२-०० | ४५-२९ |
| पेय जल आणि अस्वच्छ जलनि:सारण | स्वच्छ भारत योजना ग्रामीण | ९००-०० | १३९४-८३ | ५४-९८ |
| पेय जल आणि अस्वच्छ जलनि:सारण | राश्ट्रीय ग्रामीण पेय जल अभियान | ५००-०० | ६०५-०० | २१ |
| आरोग्य आणि कुटुंबकल्याण | राश्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान | २१२५-२२ | २३३२-२८ | ९-७४ |
| ग्रामविकास | पंतप्रधान निवास योजना ग्रामीण (PMAY) | ३८२३-४३ | ५३१८-२८ | ३९-०९ |
| कौशल्य विकास | पंतप्रधान कौशल विकास योजना (PMKVY) | १५७-७५ | २३८-१५ | ५०-९६ |
| शालेय शिक्षण साक्षरता | नवोदय विद्यालय समिती | २०३-०० | २२३-८१ | १०-२५ |

जे विभाग/मंत्रालय अनुसूचित जाती जमाती इतर मागासवर्ग अल्पसंख्याक आणि अपंग यांच्या संबंधित काम बघतात त्यांच्या खर्च करण्याच्या क्षमतेत या अर्थसंकल्पात भरीव वाढ झाली आहे. कोष्टक क्र.३ मध्ये या सर्व सामाजिक गटांसाठी या अर्थसंकल्पात

केलेली तरतूद दाखवली आहे.

कोष्टक ३ - सामाजिक मंत्रालय/विभाग २०१७-१८ व्यय तरतूद

(रुपये कोटीत)

| मंत्रालय/विभाग | अर्थसंकल्पीय तरतूद 2016&17 | अर्थसंकल्पीय तरतूद 2017&18 | टक्केवारीत वाढ |
|---|---|---|---|
| सामाजिक न्याय आणि सबलीकरण | ६५६६-९५ | ६९०८-०० | ५-२० |
| आदिवासी संबंधित कामकाज विभाग | ४८२७-०० | ५३२९-०० | १०-३९ |
| अल्पसंख्याक विभाग | ३८२७-०० | ४१९५-०० | ९-६१ |
| अपंग सबलीकरण विभाग | ७८४-०० | ८५५-०० | ९-०५ |

शिक्षणाचा अभाव हे अनुसूचित जाती आणि जमातींच्या मागासलेपणाचे एक कारण आहे. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्याचे शाळा सोडून जाण्याचे प्रमाण हे राष्ट्रीय सरासरीपेक्षाही जास्त आहे. या कुटुंबांची अत्यंत गरीबी हे ही त्याचे प्रमुख कारण आहे, अनेक वेळा आई वडील शिक्षणाचा भार पेलू शकत नसल्याने मुले शाळा सोडतात किंवा कुटुंबाच्या उत्पन्नात भर घालण्यासाठी पैसे मिळवायला लागतात आणि शाळा सोडतात. अर्थसंकल्पात या प्रश्नाचा समग्र विचार केला आहे. उदाहरणार्थ या अर्थसंकल्पात दुर्बल घटकांसाठी शिष्यवृत्ती योजनांसाठी भरीव तरतूद आहे. इयत्ता दहावीनंतरच्या शिक्षणासाठी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी २०१७-१८ मध्ये रु.३३४८ कोटीची तरतूद केली आहे ही तरतूद २०१६-१७ मध्ये रु.२७९१ कोटी होती म्हणजे मागील वर्षापेक्षा ही तरतूद २० टक्के जास्त आहे.

घरापासून शाळेचे अंतर हे ही एक शाळा सोडून जाण्याचे प्रमुख कारण आहे. विशेषत: मुलींच्या बाबतीत हे कारण महत्त्वाचे ठरते. २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात याकडे लक्ष वेधले आहे. अनुसूचित जातीच्या मुलामुलींसाठी बांधण्यात येणाऱ्या वसतीगृहांसाठी २०१६-१७ मध्ये ४५ कोटी तरतूद होती तर २०१७-१८ मध्ये ती तरतूद रु१५५ कोटी आहे. अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाला चालना मिळावी यासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्तीची तरतूद आहे. २०१६-१७ मध्ये ही तरतूद २०० कोटी होती तर २०१७-१८ मध्ये ही तरतूद २३० कोटी आहे.

पंतप्रधान संशोधन शिष्यवृत्ती ही उच्च शिक्षण विभागाकडून राबवण्यात येणारी नवीन योजना आहे. या योजनेसाठी २०१७-१८ मध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी बारा कोटीची तरतूद आहे. अनुसूचित जातीच्या व्यक्तींना तथाकथित उच्च वर्णीय लोकांकडून वेगवेगळया प्रकारे अत्याचारांना तोंड द्यावे लागते. त्यांच्या नागरी हक्कांचे रक्षण करण्याबाबत शासनाने २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात प्राधान्य दिले आहे. नागरी हक्क संरक्षण कायदा १९९५ आणि दलित अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ यांच्या अंमलबजावणीसाठी यंत्रणा मजबत करण्यावर भर दिला आहे. २०१६-१८ मध्ये यासाठी तरतूद १५० कोटी (BE) होती तर २०१७-१८ मध्ये ती तरतूद ३०० कोटींची (BE) आहे.

याचप्रमाणे अनुसूचित जमातींसाठी ही अनेक धोरणे आखली आहेत. दहावीनंतरच्या शिक्षणासाठी (PMS) शिष्यवृत्तीसाठी वाढीव तरतूद ही त्यापैकी एक. २०१७-१८ मध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीसाठी १३४७ कोटीची (BE) तरतूद आहे तर २०१६-१७ मध्ये ती १२०० कोटी होती. ही तरतूद मागील वर्षापेक्षा १२.२५ टक्के जास्त आहे. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती आणि उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती या योजने अंतर्गत अंतर्भूत रक्कम २०१६-१७ मध्ये ५० कोटी होती ती २०१७-१८ मध्ये १२० कोटी इतकी वाढवली आहे म्हणजे १४० टक्के वाढवली आहे. आदिवासी समाजाच्या विकासासाठी जी धोरणे आणि कार्यक्रम आखायची त्यासाठी काही प्राथमिक आणि परिणामकारक माहितीची गरज असते त्यासाठी आदिवासी संशोधन संस्थांना चालना देण्याचे उद्दिष्ट या अर्थसंकल्पात स्पष्ट केले आहे. अशा (TRI) संशोधन संस्थांसाठीची तरतूद २०१६-१७ मध्ये २१ कोटी होती तर २०१७-१८ मध्ये ती ८० कोटी करून साधारण पाचपट वाढवली आहे.

२०१७-१८ चा अर्थसंकल्प अल्पसंख्यांकाच्या शैक्षणिक आणि कौशल्य विकासावर भर देतो.

अल्पसंख्यांक विभागासाठी असलेली या वर्षाची तरतूद ४१९५ कोटी आहे. ही २०१६-१७ च्या ३८२७ कोटींपेक्षा ९.६ टक्के जास्त आहे. अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक सबलीकरणासाठी २०१७-१८ मध्ये रु.२०५४ कोटीची तरतूद आहे. जी २०१६-१७ मधील १९४९ कोटी तरतुदीपेक्षा १०५ कोटीने जास्त आहे. त्याचप्रमाणे कौशल्यविकास आणि उपजीविका यासाठी केलेली तरतूद २०१६-१७ मध्ये रु.५४२ कोटी होती तर २०१७-१८ मध्ये ती रु.६३५ कोटी म्हणजे १७ टक्के जास्त आहे.

शारीरिक दृष्टया अपंगांचे सबलीकरण करणारा विभाग हा दिव्यांग या सामाजिक गटासाठी काम करतो. दिव्यांगांसाठी शासन विशेष प्रयत्नशील आहे. शासनाने यांच्यासाठीची तरतूद १० टक्क्यांनी वाढवली आहे म्हणजे २०१६-१७ मध्ये ती ७८४ कोटी होती तर २०१७-१८ मध्ये ती रु.८५५ कोटी केली आहे.

प्रत्येक कुटुंबाला डोक्यावर छप्पर मिळावे यासाठी शासन कटिबद्ध आहे. हे अमलात आणण्यासाठी पंतप्रधान निवास योजना (PMAY) ग्रामीण या योजनेतून सर्वांना परवडणाऱ्या घरांचे काम चालू आहे. वरच्या कोष्टक १ आणि २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अनुसूचित जातींसाठीची तरतूद PMAY मध्ये ५० टक्क्यांनी वाढवली आहे तर अनुसूचित जमातींसाठीची तरतूद ३९ टक्क्यांनी वाढवली आहे.

गरीब कुटुंबाना LPG ची नि:शुल्क जोडणी हा महत्त्वाचा आणि यषस्वी उपक्रम शासन राबवते. हा उपक्रम उत्तम रीतीने चालू राहावा यासाठी पंतप्रधान उज्ज्वला योजना (PMUY) राबवली जाते. २०१७-१८ मध्ये या योजनेची तरतूद रु.५०० कोटी होती तर २०१७-१८ मध्ये ती रु.५२० कोटी आहे म्हणजे ती मागील वर्षापेक्षा वीस कोटींनी वाढवली आहे. दोन वर्षात ५ कोटी घरांमध्ये ही जोडणी पुरवण्याचे लक्ष्य आहे.

अनुसूचित जाती जमाती आणि इतर सामाजिक गटांना रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी पुरवणे हे सुद्धा या अर्थसंकल्पाचे एक उद्दिष्ट आहे. रोजगार वाढावा यासाठी केलेले प्रयत्न खालीलप्रमाणे

● स्टँड अप इंडिया - अनुसूचित जाती आणि जमातींमध्ये उद्योजकतेला रुजवणे. यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद २०१६-१७ मध्ये रु.५००० कोटी होती तर २०१७-१८ मध्ये ही तरतूद रु.५२० कोटी आहे.

● STRIVE (Skill Strengthening for Industrial Value Enhancement) २०१७-१८ मध्ये या अभियानाचा दुसरा टप्पा सुरु होईल त्यावर २२०० कोटी खर्च होणार आहेत. औद्योगिक तंत्र प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणाचा दर्जा वाढावा ते आजच्या उद्योगांशी सुसंगत राहावे आणि शिकाऊ उमेदवार कार्यक्रम हे उद्योग केंद्र समूहाच्या धोरणातून बळकट व्हावे हा त्यामागचा उद्देश आहे.

● संकल्प (Skill Acquisition and knowledge awareness for livelihood promotion programme) उपजीविका वृद्धीसाठी कौशल्य प्राप्ती आणि माहितीबाबत जागृती) हे अभियान २०१७-१८ मध्ये राबवले जाईल याचा निधी ४००० कोटी असेल यातून ३.५ कोटी तरुणांना रोजगार मिळेल.

दुग्धशाळा पायाभूत सुविधा विकास आणि प्रक्रिया निधी नाबार्डमध्ये उभारला जाईल. याचा निधी तीन वर्षासाठी ८००० कोटी असेल यातून प्रक्रिया आणि पायाभूत सुविधा पूर्ण देशभर पुरवल्या जाऊन दुग्धशाळांचा विकास होईल. सुरुवातीला या निधीत २००० कोटी असतील.

समाजातील इतर काही वर्गासाठी या अर्थसंकल्पात काही महत्त्वाच्या तरतुदी आहेत. त्या खालीलप्रमाणे :

१- ज्येष्ठ नागरिकांसाठी आधार कार्डशी निगडित स्मार्टकार्ड यात त्यांच्या आरोग्याचा तपशील असेल. याबाबतची सुरुवात पंधरा जिल्हयात २०१७-१८ मध्ये होईल.

२- अन्त्योदय अभियान - महात्मा गांधींच्या दीडशेव्या जयंतीच्या निमित्ताने १ कोटी कुटुंबांना दारिद्र्यरेशेच्या वर २०१९ पर्यंत आणायचे आहे. त्याचप्रमाणे ५०००० ग्राम पंचायती दारिद्र्यातून मुक्त करायच्या आहेत. प्रत्येक वंचित कुटुंबासाठी पोषक उपजीविकेसाठी अत्यंत सूक्ष्म केंद्रित आखणी केली जाईल.

३- पंतप्रधान मुद्रा योजना - या योजनेतून अर्थसंकल्पात २०१५-१६ तील कर्जाच्या दुप्पट कर्ज प्रस्तावित आहे. २०१७-१८ चे कर्ज लक्ष्यांक २.४४ लाख कोटी आहे. यात प्राधान्याने दलित आदिवासी मागास, अल्पसंख्याक आणि स्त्रियांना लघु उद्योग सुरु करण्यासाठी कर्ज दिले जाईल.

थोडक्यात २०१७-१८ च्या केंद्रिय अर्थसंकल्पात शिक्षण, परवडणारी घरे, कौशल्य विकास आर्थिक मदत इ. मूलभूत आणि प्राधान्याच्या विषयांवर लक्ष दिले आहे. अर्थसंकल्पातील तरतुदी आणि निर्णय प्रक्रिया परिणामकारकरित्या राबवणे हे शासनाचे प्राधान्याचे विषय आहेत त्यामुळे समाजातील दुर्बल आणि शोषित घटक त्यांच्या जीवनाचा दर्जा सुधारण्याची अपेक्षा करु शकतात.

■■■

*लेखिका निती आयोगाच्या सल्लागार आहेत.*

email: shrikara@gov.in

# अर्थसंकल्पात आरोग्य तरतुदीत वाढ

राजीव आहुजा



***गेल्या पंधरा वर्षात आरोग्य तरतुदीत एवढी वाढ कधीच झाली नव्हती ती 2017-18 च्या अर्थसंकल्पात झाली आहे. वैद्यकीय चलनवाढ गृहित धरली तरी ही वाढ पुढील आर्थिक वर्षात स्थिर राहण्याची शक्यता आहे. 2004-05 मध्ये केंद्रीय आरोग्य तरतूद वाढ बघितली तर तेव्हापासून 2017-18 पर्यंत ती कमीच होती. 2005-06 मध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य व इतर सेवांमुळे ती वाढली त्यावेळी आर्थिक वाढ जास्त होती व सरकारी महसूलही जास्त होता.***

यंदाच्या २०१७-१८ या वर्षासाठीच्या अर्थसंकल्पात आरोग्य क्षेत्राची तरतूद ५०२८३ कोटी रूपये आहे. याचा अर्थ ती गेल्या वर्षीच्या तुलनेत २७ टक्के वाढली आहे. गेल्या वर्षी ही तरतूद ३९५३३ कोटी रूपये होती. गेल्या पंधरा वर्षात आरोग्य तरतुदीत एवढी वाढ कधीच झाली नव्हती ती २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात झाली आहे. वैद्यकीय चलनवाढ गृहित धरली तरी ही वाढ पुढील आर्थिक वर्षात स्थिर राहण्याची शक्यता आहे. २००४-०५ मध्ये केंद्रीय आरोग्य तरतूद वाढ बघितली तर तेव्हापासून २०१७-१८ पर्यंत ती कमीच होती. २००५-०६ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य व इतर सेवांमुळे ती वाढली त्यावेळी आर्थिक वाढ जास्त होती व सरकारी महसूलही जास्त होता. २००४-०५ ते २०१७-१८ चा काळात आरोग्याची आर्थिक तरतूद वर्षाला दहा टक्के वाढल्याचे दिसून येते, त्याला २०१३-१४ व २०१५-१६ ही तीन वर्षे अपवाद आहेत., या तीन वर्षांच्या काळात केंद्रीय प्रशासन बदलले. करांचा वाटा राज्यांना जास्त प्रमाणात देण्याची शिफारस चौदाव्या वित्त आयोगाने केली होती. कराचा जास्त वाटा राज्यांना देण्यात आला त्यात आरोग्य सेवेवरचा खर्च ही एक अट होती.केंद्रीय. आरोग्य तरतुदीत २०१०-११ पर्यंत कमी वाढ होती तेव्हापासून २०१५-१६ पर्यंत ती कमीच राहिली. ती आता वाढली आहे. २०१६-१७ मध्ये आरोग्य खर्चाचे आकडे उपलब्ध नाहीत पण सुधारित अंदाजानुसार या वर्षीचा आरोग्य खर्च हा १७ टक्के असावा . २०१५-१६ मध्ये आरोग्य तरतुद १५ टक्क्यांनी घसरली वाढीचा दर ऋण १५ टक्के होता. आरोग्य खर्च ९ टक्के होता. त्यातही सुधारित अंदाज वेगळाच होता. ही सगळी पार्श्वभूमी बघितली तर २०१७-१८ मध्ये आरोग्य तरतुदीत केलेली २७ टक्के वाढ ही चांगली आहे. जर केंद्रीय आरोग्य खर्च नियोजनाप्रमाणे झाला तर ती फलदायी बाब ठरणार आहे. आरोग्य तरतुदीच्या वापरात गेल्या दोन वर्षात वाढ झाली आहे. ती पाहता हा विश्वास आपल्याला देता येतो.

| अर्थसंकल्पीय तरतुदीचा वापर दर | २०१०-११ | २०११-१२ | २०१३-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सुधारित अर्थसंकल्पीय तरतुदीचा वाटा | ९९.६ | ९२.९ | ८४.९ | ८२.६ | ८१.५ | १०५.० | १०३.७ |
| प्रत्यक्ष अर्थसंकल्पीय तरतूद | ९७.२ | ८५.० | ८०.७ | ८०.९ | ८१.९ | १०५.७ | |

**आर्थिक तरतूदीचा आढावा**

अर्थसंकल्पातील आरोग्य व कुटुंब कल्याण तरतुदींचा आढावा घेतला तर ९४ टक्के तरतुदीत आपल्याला काही वैशिष्ट्ये दिसून येतात.

अर्थशीर्ष सुलभ करण्यात आले असून त्यामुळे तरतुदी समजण्यास सोपे जाते.

केंद्र पुरस्कृत योजनात ५९ टक्के पैसा राज्ये व केंद्रशासित प्रदेशांकडे हस्तांतरित केला आहे. त्यात राष्ट्रीय आरोग्य योजना व राष्ट्रीय आरोग्य संरक्षण योजना यांचा समावेश आहे.

प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना पीएमएसएसवाय अनुसार एम्ससारख्या संस्था स्थापन करणे व वैद्यकीय महाविद्यालयात सुधारणा करणे यासाठी केवळ १५ टक्के तरतूद केली आहे.

आरोग्यासाठीचे मनुष्यबळ व वैद्यकीय शिक्षण यावर खर्च वाढवला असून तो ३४२५ कोटी केला आहे, त्यानंतर एनआरएचएमसाठी ३१०० कोटी तर पीएमएसएसवाय साठी १५२५ कोटी रूपये दिले आहेत. या तीन अर्थशीर्षात ८० टक्के तरतूद वाढ दिसते.

वैद्यकीय कर्मचारी व अधिकारी डॉक्टर्स यांची संख्या कमी आहे. त्यामुळे मनुष्यबळाचा मुद्दा केंद्राला महत्वाचा वाटतो त्यामुळे वर्षाला पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणाच्या जागा ५००० ने वाढवल्या जाणार आहेत. वैद्यकीय शिक्षण व मनुष्यबळ यावर सर्वात जास्त तरतूद दाखवण्यात आली आहे.

एनआरएचएमला ४५ टक्के तरतूद मिळाली आहे. आरोग्य सुविधांसाठी ही योजना महत्वाची आहे. त्यामुळे ही वाढ समर्थनीय ठरते.

अर्थसंकल्पातील भांडवली खर्च ३५१० कोटी करण्यात आला आहे जो २०१६-१७ मध्ये १७६० कोटी होता. रूग्णालयांवरील भांडवली खर्चासाठी ही वाढ केली आहे त्यात पीएमएसएसवायचा समावेश आहे.

कारण भारताचा सार्वजनिक आरोग्यावरचा खर्च मुळातच कमी आहे दुसरे म्हणजे राष्ट्रीय आरोग्य संरक्षण योजनेशी संबंधित कुठलीही घोषणा नाही अलिकडेच जाहीर केलेल्या काही कार्यक्रमांबाबत तरतुदीचा उल्लेख नाही त्यामुळे साहजिकच तरतुदीत वाढीच्या अपेक्षा होत्या.

भारतात सार्वजनिक आरोग्यावरचा खर्च कमी आहे- सरकारी आरोग्य खर्चाचा कुठलाही निकष विचारात घेतला तरी आपला आरोग्यावरचा खर्च फार कमी आहे. २०१४-१५ मध्ये तो सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या १.३ टक्के तर २०१४-१५ मध्ये ४.८ टक्के होता. २०१३-१४ मध्ये दरडोई आरोग्य खर्च हा २० डॉलर पेक्षा कमी होता. भारतात सार्वजनिक आरोग्यावरचा खर्च मुळातच

आरोग्य व कुटुंब कल्याण विभागासाठी अर्थसंकल्पातील तरतुदी

| | | Budget 2016-17 | Budget 2017-18 | Absolute Change | % age Change |
|---|---|---|---|---|---|
| | | Rs. in crores | | | |
| | | A | B | B-A | in % |
| 1 | केंद्राचा आस्थापना खर्च | 3804 | 4731 | 927 | 24.4 |
| 2 | केंद्रीय योजना प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा | 4789 | 6967 | 2178 | 45.5 |
| | | 2450 | 3975 | 1525 | 62.2 |
| 3 | इतर केंद्रीय योजनांचा खर्च जो वैधानिक व स्वायत्त संस्था करतात | 6607 | 7965 | 1358 | 20.6 |
| | | 100 | 171 | 71 | 71.0 |
| | | 5174 | 6088 | 914 | 17.7 |
| | | 1333 | 1706 | 373 | 28.0 |
| 4 | केंद्र पुरस्कृत योजना अ अधिक ब- अ) राष्ट्रीय आरोग्य योजना, राष्ट्रीय शहरी आरोग्य योजना, इतर शुश्रुषा जना ब) राष्ट्रीय आरोग्य संरक्षण योजना | 21862 | 27691 | 5829 | 26.7 |
| | | 20362 | 26691 | 6329 | 31.1 |
| | | 18087 | 21189 | 3102 | 17.2 |
| | | 950 | 752 | -198 | -20.8 |
| | | 725 | 725 | 0.0 | 0.0 |
| | | 600 | 4025 | 3425 | 570.8 |
| | | 1500 | 1000 | -500 | -33.3 |
| | Total | 37062 | 47354 | 10292 | 27.8 |

*Source: Central budget 2017-18*

आरोग्य क्षेत्राची तरतूद २७ टक्के वाढवली असली तरी काही संबंधित घटक त्यावर समाधानी नाहीत त्यांना जास्त तरतुदीत अपेक्षा होती. अर्थसंकल्पीय तरतुदीच वाढीची अशी अपेक्षा का होती. कमी आहे , त्यामुळे काही अर्थसंकल्पात ती त्रुटी भरून निघेल अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. आरोग्य तरतुदीचा केवळ एक तृतीयांश भाग केंद्र सरकार खर्च

करते दोन तृतीयांश भाग हा राज्ये खर्च करतात. त्यामुळे यात राज्यांची भूमिका महत्वाची आहे. चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशी बघितल्या तर राज्यांचा आरोग्य सुविधातील वाटा वाढला आहे. राज्यांमध्ये आरोग्याचा प्रश्न केवळ अर्थपुरवठ्याशी निगडित नाही तर राज्यांनी आरोग्यसेवाही तशा पुरवणे गरजेचे आहे. आरोग्य सेवा पुरवठा व प्रत्यक्ष खर्च यांच्यातील दरी दूर करावी लागेल. अंमलबजावणी संस्थाचे काम सुधारले पाहिजे. आरोग्य सेवा पुरवठा व आर्थिक पुरवठा ही दोन चाके आहेत. ती सारखीच धावली पाहिजेत. राज्यांची आरोग्य सेवा सुधारण्याची गरज आहे. केवळ आरोग्य पुरवठा सेवेतील त्रुटी दूर करून भागणार नाही तर त्यात काही मूलभूत बदल हवेत. लोकांना ज्या गरजा आहेत त्या पूर्ण झाल्या पाहिजेत. आरोग्य सेवांचे उत्तरदायित्व वाढले पाहिजे. व्यवस्थापन सुधारले पाहिजे, त्यासाठी राजकीय वचनबद्धता व खंबीर नेतृत्व असलेल्या नेत्यांची राज्यांमध्ये गरज आहे.

राष्ट्रीय आरोग्य संरक्षण योजना (एनएचपीएस)- ऑगस्ट २०१६ मध्ये स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात पंतप्रधानांनी आरोग्य विमा योजनेची घोषणा केली त्यात गरिबांना १ लाखांचे विमा संरक्षण देण्यात आले. फेब्रुवारी २०१६ मध्ये अर्थसकल्पीय भाषणात अर्थमंत्र्यांनी त्यांच्या सरकारला एनएचपीएस योजना गांभीर्याने राबवायची असल्याचे सांगितले. जास्तीत जास्त लोकांना या योजनेत आणून त्यांचा रूग्णालय खर्च कमी करण्याचा हेतू त्यात होता. त्यामुळे २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात या योजनेबाबत घोषणांची अपेक्षा होती पण त्याबाबत काही घोषणा न केल्याने लोकांचा अपेक्षा भंग झाला आहे. या योजनेची अर्थसंकल्पीय घोषणा वगळली नसावी तर लांबणीवर टाकली असावी. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमुळे कदाचित त्यांना ही वेळ योग्य वाटली नसावी. ही योजना जाहीर केल्यास तो लोकप्रियतेचा मार्ग ठरेल व मतदारांना आकर्षित करण्यासाठी घोषणा केली असे होईल म्हणून ते टाळले असावे. ज्या नवीन योजना जाहीर करण्यात आल्या आहेत त्याबाबत काहीच स्पष्टीकरण अर्थसंकल्पात नाही. गर्भवती मातांना सरकारी रूग्णालयात प्रसूती व लसीकरण यासाठी सहा हजार रूपये हस्तांतरित केले जाणार होते . काला आजार व फिलॅरॅसिस २०१७ पर्यंत, कुष्ठरोग २०१८ पर्यंत, गोवर इ.स २०२० पर्यंत तर क्षय २०२५ पर्यंत नष्ट करण्याचे उद्दिष्ट आहे पण त्यासाठी तरतदू कोठे केली आहे हे समजत नाही, जेव्हा कृती योजना जाहीर केल्या जातात तेव्हा त्यासाठी तरतूद करणे अपेक्षित असते. देशातील आरोग्य उपकेंद्रांचे रूपांतर आरोग्य व कल्याण केंद्रात करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. या दीड लाख केंद्रांचे असे रूपांतर करण्यासाठी कुठलीही कालमर्यादा ठरवली गेली नाही. केवळ ही कल्पना मांडली असावी व त्याचा निधी नंतर काही वर्षात दिला जाणार असावा. औषधे व सौंदर्यप्रसाधने नियम बदलण्यात येणार आहेत. त्यामुळे औषधे रास्त दरात मिळतील व प्रजातीय औषधांना उत्तेजन मिळेल अशी अपेक्षा आहे, वैद्यकीय उपकरणांचाही उल्लेख त्यात आहे, पण त्याचे फार परिणाम होणार नाहीत.

***आरोग्य सेवा पुरवठा व आर्थिक पुरवठा ही दोन चाके आहेत. ती सारखीच धावली पाहिजेत. राज्यांची आरोग्य सेवा सुधारण्याची गरज आहे. केवळ आरोग्य पुरवठा सेवेतील त्रुटी दूर करून भागणार नाही तर त्यात काही मूलभूत बदल हवेत. लोकांना ज्या गरजा आहेत त्या पूर्ण झाल्या पाहिजेत. आरोग्य सेवांचे उत्तरदायित्व वाढले पाहिजे. व्यवस्थापन सुधारले पाहिजे, त्यासाठी राजकीय वचनबद्धता व खंबीर नेतृत्व असलेल्या नेत्यांची राज्यांमध्ये गरज आहे.***

थोडक्यात अर्थसंकल्पातील आरोग्य तरतुदी या चांगल्याच आहेत पण आता सर्वांचे लक्ष्य राज्यांच्या अर्थसंकल्पांवर लागले आहे. आरोग्याला प्राधान्य देऊन राज्ये अर्थपुरवठा करतात का हे पाहणे महत्वाचे आहे, त्याचबरोबर आरोग्यसेवा लोकांपर्यंत पोहोचवणे हे राज्यांचे काम आहे.

■■■

*लेखक विकास अर्थतज्ञ असून ते बिल व मेलिंडा गेटस फाउंडेशन व जागतिक बँक यांच्यासाठी कार्यरत आहेत.*
e-mail: ahujaahuja@yahoo.com

FORM IV

(See Rule)

**Statement About Ownership and other Particulars About Yojana (Marathi)**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Place of Publication | : | Munbai |
| 2. | Periodicity of Publication | : | Monthly |
| 3. | Printer's Name | : | Dr. Sadhana Rout |
| | Nationality | : | Indian |
| | Address | : | Publications Division, Soochna Bhavan, New Delhi - 110 003. |
| 4. | Publisher's Name | : | Dr. Sadhana Rout |
| | Nationality | : | Indian |
| | Address | : | Publications Division, Soochna Bhavan, New Delhi - 110 003. |
| 5. | Editor's Name | : | Umesh Ujgare |
| | Nationality | : | Indian |
| | Address | : | Yojana Marathi 701, B Wing, 7th Floor Kendriya Sadan, Belapur Navi Mumbai – 400614. |
| 6. | Name & Address of Individual who own the newspaper and Partner or shareholder holding more than one Percent of the total capital. | : | Wholly owned by Ministry of Information & Broadcasting, Government of India, New Delhi - 110 001. |

I, Sadhana Rout , hereby declare that the particular given above are true to the best of my Knowledge and belief.

(Dr.Sadhana Rout )


Signature of Publisher

Dated:-


go online (free Shipping*) www.ksagar.com
www.facebook.com/ksagarbooks

३५ वर्षांच्या प्रदीर्घ लेखनानुभवातून आता साकारलीयत– नव्या अभ्यासक्रमाचा परामर्श घेणारी आयोगाच्या नव्या प्रश्नधर्तीनुसार व वाढलेल्या काठिण्यपातळीनुसार रचना केलेली पुस्तके...


...ज्यांना पर्याय नाही!





पृष्ठे ९५२ ₹ ५९९




पृष्ठे २३२ ₹ १८०





पृष्ठे ४५६ ₹ ३२५





पृष्ठे ९६८ ₹ ५५०





पृष्ठे ३२० ₹ २२५




पृष्ठे १०४० ₹ ५२५





पृष्ठे २२४ ₹ १९५




पृष्ठे ४८० ₹ ३००




पृष्ठे ५३६ ₹ ३४५




पृष्ठे २९६ ₹ २३५

## के'सागरीय संदर्भ

- तुम्ही आहात कालचे विद्यार्थी अन् आजचे कर्तबगार अधिकारी काल तुम्ही अभ्यासलेली पुस्तके आज आहेत तुमच्या मुलांच्या हाती...
- अधिकाऱ्यांच्या पिढ्यानुपिढ्या घडविणारे संदर्भ..
- १९८६ पासून एमपीएससीत पहिल्या येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने अभ्यासलेले संदर्भ...

स्पर्धा पुस्तकांसंदर्भात योग्य मार्गदर्शन करू शकणारे अभ्यासू विक्रेते
सर्व स्पर्धा परीक्षांची सर्व प्रकाशनांची
सर्व पुस्तके असणारी महाराष्ट्रातील दोन स्वतंत्र दालने–

**क्लास कोणताही लावा, यश मिळवायचे असेल तर पुस्तके अभ्यासा के'सागरचीच!**

K'Sagar बुक सेंटर
K'Sagar बुक्स एजन्सीज्
K'Sagar's हाऊस ऑफ बुक्स

अप्पा बळवंत चौक, पुणे
८०८७७२२२७७, ९५४५५६७८६२/६३,
(०२०) २४४५३०६५/२४४८३१६६

RNI No. MAHMAR/2009/32156
Reg No.G/NMD/137/2016-18
Published Date: 12th March, 2017
Date of Posting : 21st March, 2017






Editor - **Umesh Ujgare**

Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.